नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

दिवाळी अंक-१९६५

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

या अंकात

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

यु ग वा णी

संपादक :
मा. नी. गलगलीकर

संपादक मंडळ

श्री. बाळासाहेब ढवळे — श्री. वसंत वऱ्हाडपांडे
मा. भू. तु. ना. काटकर — श्री. श्रीकान्त गाय
श्री. व्यं. नी. पंडित — प्रा. पुंडरीक धुमाळे

वर्ष २०] नोव्हेंबर १९६५ [अंक ७

स्मृतिसौरभ

पसायदान

आता विश्वात्मके देवे । एणे वाग्यज्ञे तोषावे
तोषौनि मज देयावे । पसायदान हे !

जे खळांची वाकडै मोडे । तेया सत्संगी रति वाढे
भूता परस्परे पडे । मैत्र जीवाचे !

दुरितांचे तिमिर जाऊँ । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
वांछिल ते ते लाहो । प्राणिजात !

वर्षते सर्वमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियळी
अनव्रत भूतळी । भेटोतु भूता !

चळो कल्पतरूचे आरव । चेतनाचिंतामणिचे गाव
बोलते पां अर्णव । पीयूखांचे !

चंद्रमे जे आलंछन । मार्तंड जे तपहीन
ते सर्वा ही सदा सज्जन । सोयरे होतु !

किंबहुना सर्वसुखी । पूर्णा होउनि तिहिं लोकी
भजिजो आदिपुरुषी । अखंडित !

—ज्ञानेश्वर

सपादकाय

नोव्हेंबर महिन्याचा अंक कथाकाव्य–विशेषांक म्हणून काढीत आहोत. विदर्भातील नामवंत कथालेखक आणि कवि यांच्या सक्रिय सहकार्यामुळे आम्ही हा अंक काढू शकलो आहोत. युगवाणी लेखनाचा मोबदला देऊ शकत नाही आणि इतर ठिकाणी कथा आणि काव्य पाठविल्यास निश्चित मोबदला मिळतो असे असूनही कित्येक नामवंत कथालेखक आणि कवींनी या अंकासाठी लेखनसाहाय्य केलेले आहे. युगवाणीवरील त्यांच्या प्रेमाची ग्वाही आणखी कोणत्या भक्कम पुराव्याने आम्ही सिद्ध करायला पाहिजे? सर्व कथालेखक आणि कवि यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत. आणि हा उपचार नाही.

× × ×

युगवाणी लेखनाचा मोबदला देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. पण ही वस्तुस्थिती किती दिवस चालायची? माझे एक कविमित्र म्हणाले की मला माझ्या कवितेचा चार आणे तरी मोबदला द्या. मी निश्चित कविता तुम्हाला देतो. त्यांच्या म्हणण्यातली खोच मला समजली. पण ती आपणा सर्वांना उमजायला हवी आहे. तीन रुपये वार्षिक वर्गणीमध्ये सभासदत्वाचे सर्व हक्क कायम ठेवून पुन्हा युगवाणीचे, अंक बारमहा पुरवायचे हे महाकर्म कठीण आहे. सभासदत्वा-व्यतिरिक्त युगवाणीसाठी वेगळी वर्गणी घेण्याची सोय आम्हाला उपलब्ध झाली पाहिजे. त्यासाठी जे काय घटनात्मक बदल करायचे त्यासंबंधीची काळजी वि. सा संघाच्या सभासदांनी घ्यावी अशी त्यांना नम्र विनंती आहे. युगवाणी वृडित खर्चाचे माध्यम होऊ नये हा विचार या विनंतीच्या बुडाशी आहे. खर्चाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने आम्ही युगवाणीत जाहिराती घेण्यास सुरवात केली. त्या पाहून कित्येकांनी नाके मुरडली. नाक मुरडणे सुलभ आहे पण मार्ग दाखवणे दुर्लभ. युगवाणीची आर्थिक बाजू मजबूत करण्याचे कारण नाही अशी भूमिका घेतल्यास प्रश्नच खुंटला. दर्जाबद्दल बोलायला नको, मोबदल्याची गोष्ट नको. चलती का नाम गाडी.

× × ×

या अंकात कलामहर्षि विनायक मसोजी यांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. आज पंधरा वर्षांपासून मसोजी नागपुरात स्थायिक झाले आहेत. टागोरांच्या शांतिनिकेतनमध्ये विकसित झालेले मसोजींचे व्यक्तिमत्व म्हणजे एक विलक्षण गोष्ट आहे. केवढा विनम्र, निरहंकारी पुरुषोत्तम! त्याचे

अनुक्रमणिका

कवढ भूषण नागपूरकराना वाटल पाहिजे ! एवढ्या मोठ्या कलावंताला सर्व-साधारण सुखसोयीसुद्धा उपलब्ध असू नयेत, त्यांच्या कलाकृतींचं वार्षिक प्रदर्शन भरविण्याचा हट्ट नागपुरातील कलावंतांना सुचू नये यापेक्षा कलेचे आणि कलावंतांचे दुर्भाग्य कोणते ? कलावंतांची बूज राखणाऱ्या आमच्या महाराष्ट्र शासनालासुद्धा हे कसे सोसवते ? ८×१२ च्या आपल्या गोपालनगरमधल्या तुटपुंज्या खोलीमध्ये त्यांनी आपले कलाविश्व निर्माण केले आहे. ना खंत ना खेद. असल्या विरक्तीमध्ये हा महात्मा कालक्रमणा करीत आहे. आम्हीही त्यांच्या बाबतीत ना खंत, ना खेद या अवस्थेत आहोत. हे आमचे भाग्य ! जातिवंत भारतीय कलाकार म्हणून त्यांचा परदेशीयांनी गौरव करावा आणि आम्ही मात्र उदासीन असावे, हे आमच्या आंतरिक दारिद्र्याचे लक्षण आहे. मसोजींची मुलाखत या अंकात देता आली नाही याबद्दल दिलगीर आहोत. त्यांच्या कैलास यात्रेचे मनोज्ञ दर्शन आपणास घडवावे हा आंतरिक कोऽपि हेतु आहे. गुरुदेव टागोरांच्या सान्निध्यातले काही सुंदर क्षण वेचता आले तर हवे आहेत. बघूया. काळ अनंत आहे.

× × ×

शरच्चंद्र मुक्तिबोधांचा ' मेरे बडे भाई, धनंजय नाकाडे ' यांचा कलावंता-पुढील समस्या, अनंत पाटील यांचा एक ललित निबंध तसेच नेहमीची आमची काही सदरे या अंकात देता आली नाहीत. पृष्ठसंख्येचे बंधन आणि इतर काही समस्या हे निमित्त झाले आहे. श्री. मासोजींच्या कलाकृतींचे blocks कसे उतरतील हा सुद्धा एक मुद्दा क्षमायाचनेचे निमित्त ठरू शकेल. अर्थात क्षमा-याचनेशिवाय दुसरा पर्याय नाही.

मा. नी. गलगलीकर

टीप—

' झंप्या ' एकांकिकेच्या प्रयोगासाठी दि. ३१–३–६८ पर्यंत वि. सा. संघाच्या सरचिटणीसांची परवानगी आणि रु. १५ आवश्यक.

— अभिनंदन —

दीपावलि ! भारतीयांचा आनंद
द्विगुणित करणारा सण ! !

ऋतुचक्राचे महान पर्व या दिवाळीच्या रूपाने साकार होते, याचा प्रत्यय प्रत्येक दिवाळीला नव्याने येतो. या दिवाळी निमित्त 'युगवाणी' तर्फे सर्व सभासदांचे आणि वाचकांचे शुभचिंतन.

संपादक मंडळ
'युगवाणी' वि. सा. संघ

अनुक्रमणिका

An Revoir रामराम

कै. गो. रा. दोडके

माझ्या प्रेमळ मित्रांनो, रामराम. तीन महिनेपर्यंत आता आपली ना गाठ ना भेट. परीक्षेचा शेवटला दिवस संपला की मग आपण पुन्हा भेटू. नोवर मी तुम्हाला नेऊन ठेवीन त्या ठिकाणी राहा. परंतु तुम्हाला नजरेपुढून दूर सारण्याचा, कुठेतरी लांब ठेवण्याचा माझा निश्चय होत नाही. वाटते की तुम्हाला जवळच ठेवावे. परंतु त्यामुळे अहितकर परिणाम मला भोगावे लागतील. आणि माझ्या मित्रांनो ! तुम्हाला नजरेपुढून दूर करावे असाच विचार होतो. माझा दुबळेपणा आणि अप्पलपोटेपणा—मी क्षमा मागतो आपली.

चिपळूणकर, आपटे, गडकरी, फडके, टिळक, उमरखय्याम, गटे ! तुम्हा सर्वांना मी आज हद्दपार करणार आहे. हद्दपार ! होय होय. का ? चपापला-तसा ? आणि खेदही वाटलेला दिसतो आहे तुम्हाला. तुम्हाला हद्दपार करून मी उपकारच करीत आहे. आजचे दिवस हद्दपारी, गोळीबार, कारागृहाचे. तुम्हाला मी तुरुंगात घालायचा नाही, की तुमच्यावर गोळीबार करायचा नाही. तुम्हाला शिक्षा इतकीच की माझी खोली तुम्हाला बंद. माझे चिमुकले राज्य तुम्हाला काही काळपर्यंत राहायला नाही.

अशा रीतीने तुम्हाला दूर सारताना मला अत्यंत वाईट वाटते. आजवर तुम्ही मला नानाप्रकारे उपकारी झाला. दुःखकाली माझ्या दुःखाचा परिहार करून मला आनंदी केले, हसविले. अंतःकरणातील काळोख आपल्या तेजस्वी करांनी मालविला. शरदबाबू, मी आपल्याला वंदन करतो. आपल्या हेमांगिनीने माझ्या-वर मातेसमान गाढ आणि विमल प्रेम केले. जेव्हा जेव्हा अंतःकरणाला क्षते पडत तेव्हा तेव्हा हेमांगिनी मातेने आपल्या देवतातुल्य, प्रेमळ आणि अमृतमय हस्तांनी ती नाहीशी केली. शरदबाबू ! आपल्या सृष्टीमध्ये मी जेव्हा वावरतो तेव्हा मला माझे जीवन किती गोड आणि सुखासीन वाटते. ह्या सृष्टीत दुःखे आणि संकटामध्ये देखील सुखाचे धागे अनुस्युत असतात. कारण जीवनाला हवी असलेली अनुकंपा, सहानुभूति या सृष्टीत पुरेपूर आहे. इतका गोड आपल्या-विषयी बोललो खरा, परंतु आपल्याला प्रथम जावे लागेल. कारण माझी परीक्षा उत्तीर्ण व्हायला आपणच अडथळा कराल. खांडेकर आणि दिवाकर कृष्ण ! तुम्हीहि पण त्यांच्या मागोमाग जा. आपण 'प्रेमलक्ष्मी' निर्माण केली. परंतु मी

जर आपल्या 'प्रेमलक्ष्मीच्या' मागे लागलो, तर मला दोन्ही गोष्टी साध्य व्हावयाच्या नाहीत. नंतर 'आंधळ्याची भाऊबीज' मात्र पदरी येईल. कारण परीक्षेत जर अयशस्वी झालो तर भोवतालची माणसे डोळ्यात अंजन घालतील आणि तेहि इतके जालीम की दुसऱ्या वर्षीची भाऊबीज आंधळ्यानेच करायचा प्रसंग यायचा. दिवाकर कृष्ण ! आपली 'वेड्याची कहाणी' अंतःकरण हलवून टाकते. परंतु माझे पाऊल, इतरांच्या दृष्टीने वेड्याप्रमाणे पडू लागले तर मला धोंड्याशिवाय कशाचाच लाभ व्हायचा नाही. आणि म्हणूनच मी आपल्याला विनंति करतो की माझ्या अंतःकरणावर मात करू नका. गटे ! मी तुझा Faust आणि Margret यांच्यावरोबर किती आनंदाने काळ कंठिला आहे ! आणि त्यांच्या सहवासात असताना unhappy Faust I know thee no more. असे आपल्याच ओठांशी स्वतःला फाऊस्टच्या ठिकाणी कल्पून घोळले आहे. तुझा वेर्टर माझा जिवलग मित्र. त्याच्यावरोबर माझा काळ किती सुखात जातो. त्याच्यावरोबर सहल करण्यात व त्याच्या दृष्टीने सृष्टी बघण्यात किती आनंद वाटतो. मला जर जन्माला यायच्या अगोदर देवाने विचारले. " कायरे, तुला कोणत्या भूमिका घेऊन जगात रहावेसे वाटेल ? " तर मी म्हणेन एक वेर्टर आणि दुसरा जाँ ख्रिस्तफाँ. गटेइतके माझे प्रेम आहे तुझ्या वेर्टरवर. त्याच्या सुखासीन वृत्तीत मी हसतो, त्याच्या तल्लीन वृत्तीत मी डुलत राहतो व त्याच्या जीवनाचा विपरीत व शोकमय अंत बघून माझ्या डोळ्यातून अश्रूंची झरणी वाहू लागते. वेर्टरचे शेवटचे पान वत्र, नुसते गोठलेल्या अश्रूंनी भरलेले आहे.

परंतु आता आपला सहवास पुरे. नेहमीकरिता नाही काही. आपण पुन्हा लवकरच भेटणार. तीन महिन्यांचा अवधी गेला की संपले. परंतु दिवस, महिने, वर्ष ! किती अनिश्चित परिमाणे आहेत ही कालमापनाची ! कित्येकदा तीन महिनेच तीन कल्पांप्रमाणे वाटू लागतात. तर कित्येकदा वर्षानुवर्षांची मापणी एखादा निमिषच नाही का करीत ? बरे, काहीहि असो. तीन महिनेपर्यंत तुमच्यावरोबर फिरायचा नाही किंवा तुमच्याकडे यायचा नाही. कित्येक विद्यार्थी असेच करतात ना ? पहिले सात आठ महिने उटाणटप्पूपणा करण्यात, चकाट्या पिटण्यात, कुणा तरी तरुणीमागे फिरण्यात अथवा एखाद्या तरुणीवरोबर प्रेमालाप अथवा संसार करण्यात घालवितात. परंतु नंतरचे चारपाच महिने मात्र ह्या उपाधींना अंतःकरणात थारा देखील देत नाहीत. गटे तुझा फाऊस्ट माझ्या हृदयाच्या गवाक्षावर येऊन ठोठावील, हाक मारील, मी त्याला 'ओ' देणार नाही की काही नाही. त्याला आणि तुला दोघांनाहि मी आताच सांगून ठेवतो की, Midnight shall see our compact end. तुला हद्दपार करण्यात येईल. तुझ्यावरोबर तुझ्या मानसपुत्रांना देखील. याचप्रमाणे इतर सगळ्यांना.

माझ्या चार भिंतीमधील चिमुकल्या साम्राज्यातील, कपाटातील तुमची चारखणी व राहूत उठविण्यात येईल.

मला वाटते अखंड तुमच्याच सहवासात असावे. इतर काही करू नये. तुम-च्याशी हसावे, खेळावे, बोलावे. परंतु हे व्हावे कसे ! मनातील आशा आकांक्षा दाबून धरून दुसऱ्याच्या मनाप्रमाणे आपल्याला जावे लागते. कुचकामाच्या परीक्षा. परंतु त्यांनाच पार पाडण्याकरिता आयुष्याचा अत्यंत मोल्यवान काळ व्यर्थ घालवावा लागतो. मला तरी परीक्षा जनांकरिता करावी लागते. माझ्या मनाकरिता नव्हे. परंतु तिला वश करणे आपल्याला आवश्यक असते. आपण आपल्या मनाकरिता किती थोड्या गोष्टी करीत असतो !

मित्रांनो, तुम्ही दुःखी होऊ नका. मी तुम्हाला माझ्या लहान भावाच्या राज्यात नेऊन सोडणार आहे. तो सहृदय आणि सुंदर जीव आहे. तुम्ही त्याच्या जवळ रहा. तो तुमची काळजी घेईल. सुखात, आनंदात, मजेत रहाल तुम्ही.

मी मुखाने सर्व म्हणतो आहे. परंतु अंतःकरण जड झाले आहे. माझ्या डोळ्यात अश्रू उभे आहेत. माझ्या अंतःकरणाला मात्र मी पाझर फुटू देणार नाही. कालच मी एका मातेचा तुरुंगात जाण्याचा प्रसंग पाहिला. घरातून बाहेर पडतेवेळी तिच्या चिमण्याने टाहो फोडला. सहृदयांनो ! बालकाचा टाहो मातेच्या अंतःकरणाला कसा जाचतो हे तुम्ही जाणताच ना. ती मोटारीत जाऊन बसली आणि तुरुंगाकडे निघून गेली. माझ्या मित्रांनो ! तुमच्या बाबतीतदेखील मी हीच कर्तव्यकठोरता प्रकट करणार आहे. दुःख दोघांनाहि सहन करायला नको का ?

आणि तुम्ही गेल्यानंतर तुमची जागा तुमचेच काही बांधव घेतील. पण त्यांना बांधव म्हणणे योग्य होईल का ? तुम्ही मला आवडता. त्यांचा मला राग येतो. त्यांच्याविषयी तिरस्कार वाटतो. तुमचा सहवास खूप मिळावा असे वाटते, तर त्यांना जवळ करताच ती दूर सारावीशी वाटतात. असे हे आमचे विचित्र बांधव कोण म्हणून म्हणता होय ! सांगूच का ? रागावू नका बरे. ती अभ्यासाची पुस्तके बघितली ? तीच. मित्रांनो, एक मौज सांगू तुम्हाला ? जोवर तुम्ही आमच्या अभ्यासक्रमात शिरत नाही तोवर तुमचा सहवास प्रियतम वाटतो. परंतु एकदा का तुमचा शिरकाव विद्याखात्याने अभ्यासक्रमात केला की तीच तुम्ही तिरस्कारार्ह वाटू लागता. मी माझे अंतःकरण तुम्हाला सांगितले. राग मानू नका हं. उलट मी सांगितलेली गोष्ट ध्यानात ठेवून आपला शिरकाव अभ्यास-क्रमांत होऊ देऊ नका.

आता अभ्यासक्रमात शिरलेले तुमचे जातभाई माझा सूड घ्यायला सुरवात करतील. त्यांच्याकडे आजवर दुर्लक्ष केल्यामुळे ते मला भीति दाखवितील. आणि

माझ्या अंत:करणावर जबर ओझे ठेवतील. जर तुम्ही आनंदाने निघून गेला तर त्यांची सेवा करायला मला कोणतीही अडचण पडणार नाही. त्यांची एकनिष्ठ सेवा करून प्रसन्न करून घेईन. आणि कार्यभाग झाला म्हणजे दूर सारून तुमच्याच संगतीचे सेवन करीन. तोवर शांत रहा, मित्रांनो ! तोवर शांत रहा.

तुमचे अंत:करण, तुमचा देह म्हणजेच ज्ञान. मी जर तुम्हाला Rousseau च्या एकदोन वाक्यांची आठवण दिली तर तुम्हाला हसू येईल. नाही का ? पण सांगतोच मी. त्याने आपल्या Confessions मध्ये एक सुंदर गोष्ट सांगितली आहे.

I remember Madame de Luxuembourg told me one day in raillery of a man who used to leave his mistress that he may have the satisfaction of writing to her. सद्‌गृहस्थ आपल्या प्रियतमेला पत्रे लिहायला मिळावी म्हणून विरहदु:ख सोसायला तयार व्हायचा. आपण असे समजू की दीर्घ वियोगानंतरचे अत्यंत आल्हादकारक मीलनसौख्य अनुभविता यावे म्हणूनच हा प्रसंग प्राप्त झाला आहे.

आता तुम्हाला दूर करण्याचा समय प्राप्त झाला आहे. तो बघा माझा भाऊ तुम्हाला न्यावयाला आला आहे. माझ्या मित्रांनो ! आता तीन महिनेपर्यंत विरह आणि नंतर भेट. अश्रूंचा थेंब डोळ्यांमध्ये साचतो आहे. तुमच्या मूर्ती मला अंधुक आणि कापऱ्या दिसताहेत. असल्याच स्थितीत तुम्हाला निरोप देणे भाग आहे. रामराम.

आसावरी

सौ. तारा शास्त्री

पुढल्या रांगेत मी मध्ये बसतो. माझ्या उजव्या हाताला सदानंद आणि डाव्या हाताला श्रीकांत तंबोऱ्यावर बसलेले असतात. मागच्या तिघा–तिघांच्या दोन ओळीत, सतारीचे दोघे, व्हायोलिनचे दोघे, बासरीचा एक आणि तबल्याचा एक, अशा रांगा ठरलेल्या आहेत. शिवाय जमेल तसं आणखी दोघा–तिघांना, वेळेनुसार माझ्या इच्छेप्रमाणे मी समाविष्ट करून घेत असतो. ह्या वृंदवादनाचं नेतृत्व माझ्याकडे आहे. माझं वाद्य हातात घेऊन माझ्या मध्यवर्ती जागेवर मी येऊन बसलो की मन सहिरं बहिरं झाल्यासारखं वाटतं. हातातल्या वाद्याच्या स्पर्शानं अंगावर रोमांच उभे राहतात. बोटं हळुवारपणे वाद्यावर फिरत राहतात.

मला जाणीव असते, सभास्थानी, आमच्या मागे–पुढे आणि दोन्ही बाजूंना श्रोतृवृंद बसला आहे. सदानंद मध्ये असूनसुद्धा त्याच्या पलिकडे खुर्च्यांवर बसलेल्या श्रोत्यांशी जवळिक मला जाणवते. इशारा मिळताच मी आमची लोकप्रिय झालेली धुन—तिची पहिली ओळ वाजवून साथीला सूचना देणार आहे. हा एवढा वृंदवादनाचा तास माझा—सर्वस्वी माझा आहे.

लोकांना करुण स्वर का आवडतात समजत नाही. पण लोकांना आवडतात त्यापेक्षा ते मला आवडतात हीच नवलाची गोष्ट आहे. वाद्य सुरू आहेत. निःस्तब्धता प्रत्येक क्षणाला वाढते आहे. धुन गती घेते आहे. वातावरणात एकतानता झाल्याची जाण येते आहे. बाहेरचं सगळं जग हरपलं आहे. श्रोते वाद्यवृंदात अधिकाधिक विलीन होत चालले आहेत—

—आणि—सदानंदाच्या पलिकडे बसलेल्या श्रोत्यांपैकी एका स्त्रीच्या तोंडून नकळत हुंदका बाहेर पडला आहे. वातावरणाला धक्का न बसेल अशा बेताने !

माझं सहिरं बहिरं झालेलं मन त्या हुंदक्याचीच वाट पहात असतं की काय कोण जाणे ! बाहेर पडू पहाणारा माझा हुंदका मी दाबतो आहे. आवंढ्यावरांवर गिळतो आहे. पण तो दावण्याच्या खटपटीत, दाटून आलेलं पाणी डोळ्यावाटे बाहेर निसटणार बहुतेक असं वाटतं आहे. नाही, नाही ! हात वाद्यावर गुंतले आहेत. डोळे पुसता यायचे नाहीत. पण तेहि माझ्या हाती राहिलेलं नाही.

आश्चर्य वाटतं, डोळ्यांच्या खाचा झालेल्या आहेत. मात्र अश्रू ढाळायची त्यांची ताकद कमी व्हायच्या ऐवजी वाढते आहे. दृष्टि गेली आणि दुनिया पारखी

अनुक्रमणिका

झाली. पण पुष्कळदा वाटतं, आत कुठे तरी, एक नवीच दुनिया जागी झाली आहे. हे असं ह्या वाद्यावर वसलो, हे आजच्यासारखे असे हे स्वर छेडले, की आतल्या आत कढ येऊ लागतात. त्यांचा अर्थ लागत नाही. सुख ? दुख ? त्या कंठाची भावनाच कळत नाही. नुसती ओढ, अनिवार ओढ ! त्या ओढीमुळे पंचप्राण अनावर झाल्यासारखे वाटतात. एकावर एक उठणाऱ्या लाटांमुळे, शरीराचे सारे बंध कोसळणार की काय असं वाटू लागतं. पण कशासाठी ? काय हवं आहे ? काही कळत नाही, काही कळत नाही.

कुणीतरी चहा आणून देतं. घेतल्यावर वरं वाटतं. आतला शोष कमी होतो. या चहाच्या दुनियेशी नातेसंबंध जुळविण्यात मी वरीच प्रगति केली आहे. ही दुनिया माझं कौतुक करते. त्यांना माझ्या दुनियेत ओढून नेण्याचं कसब मी साधलं आहे म्हणून. त्यांच्याशी हस्तांदोलन करताना त्यांच्या वृत्तीतली ऊब मला जाणवते. माझ्याहि वृत्ति उल्हसित होतात. एकदा तर, ह्या हाताला भाग्यवश, रेशमी हातांचा स्पर्श झाला होता. तो क्षण सुखाचा होता.

ह्या सुखाच्या आठवणींचा मी संग्रह करू पहात आहे. माझ्या मनाला हिशेब करण्याची एक प्रकारची चटक लागलेली आहे. सुखदुःखाचा हिशेब मांडून वसावं, आणि सुखाची बाकी शिल्लक ठेवण्याच्या अट्टहासात गणित चुकतं आहे ह्याकडे जाणून–बुजून दुर्लक्ष करावं, असा माझ्या मनाचा स्वतःशीच लपंडाव चालला आहे. कधी कधी ह्या लपंडावाकडे तिऱ्हाइताच्या नजरेने पहावं, मन विषण्ण होतं. कधी, स्वतःलाच फसविणाऱ्या बालिश मनाचं ह्या तिऱ्हाइत, प्रौढ मनाला हसू येतं. आयुष्यातल्या विसंगतीकडे पाहून हसू फुटलं तर 'जिंकलं' म्हणावं, नाही का ?

पण 'जिंकलं' म्हणताना पुनः स्वतःच्या खोटेपणाची साक्ष पटते. आतून ओरड सुरू होते. 'जिंकलं नाही, जिंकलं नाही !' हा आतला आवाज दावायचं सामर्थ्य नाही माझ्यात.

'सुखाची मला हवी असलेली बाकी शिल्लक ठेवून मला गणित वरोवर करायचं असेल तर हा माझा आंधळेपणा मला स्विकारायला हवा' असं स्वतःला सांगताना मला भास होतो, कुणीतरी दाटून, खडसावून मला विचारीत आहे—

"स्वतःचा आंधळेपणा मान्य केला आहेस तू ?"

"मेलेली दृष्टि आता पुनः परत यायची नाही असं निक्षून स्वतःला वजावलं आहेस ?"

"आता पहायचं ते डोळ्यांनी नव्हे. पटलं आहे तुला हे ?"

आणि खालच्या मानेनं, अपराधी स्वरात माझा मीच उत्तर देताना मला ऐकू येतं आहे.—" हो."

मानलं आहे नाही तर काय ? मानावंच लागलं !

त्या दिवशी डोकं मनस्वी दुखत होतं. कानशीलं तडतडत होती. अंथरुणावर पडवेना, म्हणून उठलो. धडपडत, चाचपडत खोलीच्या बाहेर आलो. दरवाजाच्या चौकटीत हात टेकून उभा राहिलो. थंडगार वाऱ्याची झुळूक अंगाला थरथरणारा स्पर्श करून गेली. सारं शरीर सुखावलं, डोकं शांत झालं. वाटलं, धावत जाऊन गच्चीवर आपली सावट पसरणाऱ्या कडुलिंबाच्या झाडाखाली जाऊन बसावं. लिंबोण्या टपटप पडतात. अंगावर पडल्या की गंमत वाटते—

आणि मग 'डोळे पहात नाहीत' हे स्वीकारायला माझं हट्टी मन काही केल्या तयारच होईना. प्राणांतिक वेदनांनी तडफडावीत, अशी ही डोळ्यांची पाखरं पंख फडफडवू लागली, झेप घेण्याकरता पंखांना ताण देऊ लागली. शरीरातल्या साऱ्या शक्ति डोळे होण्याकरता धडपडू लागल्या, शरीराच्या रंध्रातून बाहेरच्या दुनियेचं टिपण साधण्याकरता वेध घेऊ लागल्या. आणि पुन: डोक्यात वेदना थैमान घालू लागली. मी आता आठवतो आहे त्या वेदनेचं स्वरूप.—

—डोक्यातल्या ह्या इथल्या भागात ती गोळा झाली होती. सूक्ष्म होत चालली होती. इतकी सूक्ष्म की लांबी, रुंदी, जाडी नसलेल्या परंतु अस्तित्व असलेल्या बिंदूसारखी तिची व्याख्या करावी. वेदना ! ना रंगाची—ना रूपाची. पण तिच्यातली ताकद. केवढ्या ताकदीची ! नुसती, निर्भेळ, निखालस ताकद ! डोक्याच्या ह्या इथल्या भागात घनीभूत होऊन प्रक्षेपणाकरता सिद्ध झाली होती जणू !

शाळूच्या अंगावरचे काटे तिच्या भक्षाच्या रोखाने अणकुचिदार शरसंधान करतात. मस्तकातल्या त्या वेदनेला सहस्र काटे फुटले होते. आणि त्या वेदनेच्या शरसंधानाने कवटीचा विच्छेद होतोसं वाटू लागलं होतं. मी डोकं दाबून धरलं होतं. ओरडत होतो, बेभान झालो होतो. कडुलिंबाकडे धावत होतो. डोक्याच्या चिंध्या उडाल्यासारखं वाटू लागलं. कडुलिंबाच्या बुंध्यावर माझं डोकं आदळलं. जखम झाली असावी. ते रक्त मला पहायचं होतं. लाल लाल रक्त ! वेताळाच्या गोष्टीत 'तुझ्या मस्तकाची शकलं होऊन तुझ्याच पायापाशी पडतील' असं वेताळ राजाला सांगतो. तशी शकलं माझ्या पायापाशी पडली आहेत का, हे मला पहायचं होतं. माझंच रक्त, मलाच दिसत नव्हतं. कपाळाशी हात नेला. जखमेवर दाबताच चिकट द्रवाचा स्पर्श हाताला झाला. स्वत:च्या रक्ताची ओळख पटली आणि मग अचानक वेदना नाहीशी झाली. डोळ्यापुढचा अंधार मात्र अधिक गाढ झाला.

अनुक्रमणिका

त्यानंतर मी मनाला समजावलं. ह्या अशा उद्रेकांच्या अधीन होऊन चालायचं नाही. मला आणि सगळ्यांनाच त्यापासून त्रास होतो आहे. मग तंबोऱ्याची आराधना सुरू केली. मन त्यात रमू लागलं, हरपून जाऊ लागलं. वृत्ति नरम पडू लागल्या. मला पहायचं आहे. पहायची इच्छा मरायची नाही, मला मारायचीहि नाही. पण ह्यापुढे आता मी कानांनी पाहणार आहे, हातांनी पहणार आहे, चारी इंद्रियांना एकवटून मी पाहण्याचा प्रयत्न करणार आहे.

हे माझ्या हातातलं वाद्य ! हे मला पहाता येत नाही असं म्हणायची छाती आहे कुणाची ? डोळसांनाहि दिसत नाही इतकं ते मला दिसतं. त्याच्या अंतरीच्या खुणा मीच समजू जाणे !

ओळखीचे लोक मला दिसतात. त्यांचे आवाज माझ्या परिचयाचे झाले आहेत. त्यांच्या उपस्थितीची दिशा मला कळते. एकेकाच्या सवयी—लकबी मी पाठ करून ठेवल्या आहेत. आमच्या काकांना फरशीवरून पाय घसरत चालायची सवय आहे. त्याचा खस् खस् आवाज मी हेरून ठेवला आहे. माझ्या मनात पुष्कळदा येतं, काकांच्या तळव्यांना सर्वसाधारणपणे सगळ्यांच्या पायांना असतो तसा वाक नसावा. त्यामुळे उचलताना आणि ठेवताना पावलं घासली जात असावीत. आमच्या संस्थेच्या एक स्त्री सदस्या आहेत. नाडकर्णी त्यांचं नाव. त्या सभेत आल्या की माझ्या चटकन् लक्षात येतं. पावलागणिक त्यांची साडी फट्फट् आवाज करते. आणखी एक गरुडसाहेब आहेत. सतत त्यांच्या तोंडात सिगरेट असते. त्यांचा ठरलेला ब्रँड आहे. काय त्याचं नाव कोण जाणे ! पण त्याचा वास मी अचूक हेरू शकतो. सिगरेटची राख झाडण्याकरिता भावे टिचकी वाजवितात. सदानंदाला वसल्या वसल्या बोटं मोडण्याचा चाळा आहे. काकूंना तर मी बांगड्यांच्या आवाजावरून ओळखतो.

खोलीत येणाऱ्या माणसाचं ‘ वसा ’ म्हणून मी स्वागत करू शकतो. कारण त्याच्या आवाजाच्या उंचीवरून तो वसला किंवा उभा असल्याचं मला चटकन् समजतं.

दैनंदिन जीवनातला परावलंबीपणा मी झुगारून दिला आहे. माझ्या खोलीतल्या वस्तु हात घालावा तिथेच सापडतील अशा त्या ठेवल्या आहेत. वस्तूंची जागा न वदलण्याचा माझा अट्टाहास माझ्या पथ्यावर पडला आहे. त्यामुळे एक प्रकारची निश्चितता वाटते. अंथरुण घालणं, कपड्यांना साबू लावणं, खोली झाडून घेणं ही माझी कामं, काकू ‘ नको नको ’ म्हणत असताना सुद्धा स्वतःच करण्याचा मी कटाक्षाने आग्रह धरीत आहे.

मुळात माझी वृत्ति कशी होती कुणाला ठाऊक ! पण परावलंबीपणाचं दुःख कमी सहन केलं नाही मी. मन असं नाजूक झालेलं ! दुसऱ्यांचा आधार घ्यावा

लागला की स्पर्शाद्वारे त्या आधारामागची इच्छा, अनिच्छा पडताळून पहाण्याचा चाळा माझं मन करू लागे. इच्छेच्या जाणिवेनं बरं वाटतं न वाटतं तोच अनिच्छेच्या संशयाने मन खचल्यासारखं होई. आणि त्याचा परिणाम म्हणूनच की काय, कधी, अधिक असहाय, पांगळं झाल्यासारखं वाटे. कधी नवा विश्वास जागा होई. आता मी शिकलो आहे. स्वावलंबन माझं मीच मिळवलं पाहिजे, वाढवलं पाहिजे. ते जितकं वाढेल तेवढा माझा विश्वास आणि माझं सुख वाढणार आहे. माझा चहा मी माझ्या हाताने करू लागलो आहे हा आणखी एक माझा विजय आहे.

आता दिवसरात्र माझ्या लेखी सारखे राहिलेले नाहीत. दिवसभर मी काम करतो आहे. विद्यार्थ्यांना शिकवितो आहे. सूचना देणं, थोडंफार देखरेखीचं काम करतो आहे. डोळे मिटायला लागले की रात्रीचे दहा वाजलेले कळतात. बरोबर सहाला जाग येते. उठायची घंटा, प्रार्थनेची घंटा, चहाची घंटा आणि नंतर प्रत्येक कामाचा तास संपला आणि सुरू झाल्याची घंटा, शाळेच्या आवारातून, गेल्या आणि येणाऱ्या प्र. तासाची प्रत्यहि जाणीव देते आहे. संस्थेच्या आवारातली सगळी जमीन ह्या पायांना सरावाची झाली आहे. ह्या इमारतीच्या जिन्याच्या पायऱ्यांची संख्या डोळस मंडळींना सांगता येणार नाही. त्यांना मला विचारावं लागेल.

आणि ह्या सगळ्यानंतरहि अपुरेपणाची उरली सुरली रुखरुख नष्ट करण्याकरता, खोलीत परत येऊन, तंबोऱ्यावर जीवनाच्या संगीताची तार छेडून पहातो आहे. भैरवीच्या मृदुमुलायम स्पर्शाने कधी पहाटेला जाग आणतो आहे, तर भस्मर्चचित भैरवाच्या आराधनेकरता पांढऱ्या स्वच्छ होत चाललेल्या सकाळी, तंबोऱ्यावर ध्यान करून बसतो आहे. सुट्टीच्या दुपारी, आकाशात प्रकाशाच्या समुद्राला, सूर्य, भरती आणीत असतो त्यावेळी खोली, सारंगाच्या सुरांनी भरभरून ओसंडावी म्हणून मी आपलं कौशल्य पणाला लावीत असतो. सांजवातेला पूरिया धनाश्रीची आणि पूर्वरात्रीला यमनाच्या निराश सुरांची साथ देत असतो.

यमनाच्या सुरांनी पुष्कळदा मन विकल विव्हल होऊन जातं. अंतःकरणात हुरहुर दाटून येते. मन स्वप्नीच्या देवतेचा ध्यास घेऊन बसतं. आसावरीत आळवणी करावी आणि आसावरीच्या रूपानेच तिने प्रकट व्हावं असा काहीतरी साक्षात्कार घडल्याची ग्वाही मन देऊ लागतं. वाटतं, निरांजनाच्या स्निग्ध ज्योती डोळ्यात घेऊन ती आली होती. खरंच आली होती ? का सारी स्वप्नच ? बाकी स्वप्नीची देवता स्वप्नीच भेटायची नाही तर कुठे ?

उच्छृंखल मनाला, लावणी ठुमरीच्या रंगीबेरंगी ढंगानं भडकवावं, उत्तेजित करावं, तृप्त करू नये, आणि आसावरीनं स्वप्नातल्या तरल–विरल दर्शनाने

भेटीची हुरहुर आणि विरहाची वेदनाच तेवढी वाढवावी, हे असंच का सगळं चालायचं ? आयुष्याचा तोंडवळा फक्त हा असाच का ?

पण जीवनाच्या मैफलीत रंगता रंगता, मी हा असाच मधुन मधून भरकटत जातो. आणि मग स्वतःचीच क्षमा मागायचा मोह होतो मला. मी ठरवलं होतं ना ? स्त्रीचं दर्शन आई, काकू आणि नंदिनीच्या रूपानं जेवढं मला घडलं आहे, तेवढं ह्या जन्मीकरता पुरेसं आहे ? दुरून अनेक मला भेटतात, जवळिकीची आस मला नाही, अशी मनाची ग्वाही मी कितीदा तरी घेतली नाही का ? मग आता हे असं का ?

चुलत भाऊ एका उन्हाळयाच्या सुट्टीत घरी आला, तेव्हा येताना आपलं गुपित घेऊन आला होता. घरातल्या मंडळींमध्ये त्यावरून कुरबूर सुरू असलेली दुरून दुरून माझ्या कानावर येत होती. वातावरण तंग झालेलं माझ्या लक्षात येत होतं. त्याची चिड्विड् त्यात भर घालीत होती. एक दिवस मीच त्याला एकीकडे नेऊन विचारलं,—

" रमेश, काय भानगड आहे ? "

तो सांगायला उत्सुक होता. पण माझ्या प्रतिक्रियेबद्दल साशंक होता. म्हणाला—

" सांगून काही फायदा होणार आहे, का आपलं... ..?

मी त्याला मध्येच अडवून म्हटलं— " सांगून पहा तर एकदा.

त्याच्या मनात थोडा विश्वास थोडी नवी आशा निर्माण झाली असावी. आपला कलकत्त्यात एका बंगाली मुलीशी प्रेमसंबंध जडल्याचं त्याने सांगितलं. आणि मग रोषाने पुढे म्हणाला,

" मुलगी केवळ बंगाली आहे म्हणून ती आईला नको आहे. ती कशी आहे, काय आहे "

" खरंच कशी आहे रे ती ? " मी उत्सुकतेने मध्येच विचारलं.

कुणी त्याला हा प्रश्न विचारला नव्हता. विचारायचं कुणाच्या मनातहि आलं नाही. ज्या गावाला जायचं नाही त्या गावच्या पंचायती कशाला, अशी सगळ्यांची भूमिका असावी.

माझ्या प्रश्नातली उत्सुकता त्याला आवडली. मनापासून म्हणाला,

" फार छान आहे रे. "

" असायला... ? "

" हो असायला आणि दिसायलाहि ! आणि मग आपल्याच नादात पुढे म्हणाला—

" थांब, तुला फोटो दाखवतो. "

" दाखव. " मी म्हटलं.

तो उठला आणि मग एकदम दचकला. म्हणाला,

" माफ कर विसू. सध्या माझं मन स्वतःच्याच भोवती घिरट्या घालत आहे. वेड्यासारखं बकलो मी काहीतरी. "

" नाही रे. " मी समजूत काढीत म्हटलं " तू आण फोटो. मला पहायचा आहे. "

" म्हणजे... ? "

मी त्याला अडवीत म्हटलं—" जा. लवकर आण. मला दाखव. जा. आण जा.

ओशाळलेल्या स्वरात तो म्हणाला. " अगदी खरं म्हणतोस तू हे ? पण तुला कसं...? "

" अगदी खरं म्हणतो आहे. ऊठ लवकर. " मी म्हटलं.

त्याने फोटो आणला. मी तो हातात घेतला. म्हटलं—

" सांग आता, डोळे कसे आहेत रे तिचे ? "

तो लाजला असावा. म्हणाला, " चेष्टा करू नकोस हं पण खरंच सांगतो हरिणाक्षी कुणाला म्हणतात ते तिच्याकडे पाहून मला प्रथम कळलं. "

" आणि नाक—? आणि कपाळ......जिवणी... ? "

तो उत्तर देत होता.

मी म्हटलं, " आता रंग कसा आहे तो सांगून टाक.

तो उल्हासाने म्हणाला, " अरे तिचं खरं सौंदर्य तर तिच्या रंगातच आहे. अगदी Golden Colour म्हणतात ना तसाच समज. "

त्याच्या उल्हासाला प्रतिसाद देत मी म्हटलं, " छान मुलगी मिळवली आहेस. खरंच सुंदर आहे. "

तो मनापासून हसला.

त्यानंतर तो माझ्याकडे वारंवार येऊ लागला. तिची आणि त्याची भेट कुठे आणि कशी झाली, तिच्या डोळ्यात व्यक्त होणाऱ्या प्रेमामुळे त्याला धीर कसा मिळाला, त्यानं प्रेम तिच्याजवळ उघडं कसं केलं, 'डायमंड बीच'वर जायचा योग कसा घडवून आणला...किती तरी गोष्टी ! तिचं पत्र आलं की त्याला नवा हुरूप चढत होता. कथांना आणखी रंग भरत होता. मीहि रंगत चाललो होतो. प्रणयाच्या त्या नवरंग दर्शनाने तृप्त होत चाललो होतो.

एक दिवशी काकूंना म्हटलं,

" काकू, हा कसला दुराग्रह धरता आहात तुम्ही ? "

" अरे तुम्ही मुलं हेच म्हणणार आम्हाला. पण लक्ष्मी घरात यायची ती अशी तशी आणून... "

" अशी तशी नाही ती काकू, खरोखरीच लक्ष्मी आहे ती. "

" अरे, तो सांगणार आणि तू ऐकणार ! डोळचावर झापड बांधली की समोर आलेली मुलगी लक्ष्मी दिसू लागते. बाकी वयाचा दोष हा. तुम्हाला तरी काय दूषण द्यायचं. "

मी मुद्याला निराळ्या तऱ्हेने हात घातला. म्हटलं,

" काकू, माझं हे असं ! आपल्या घराण्यात एकुलती एक सून नांदायला यायची. रमेशचं मन मोडून तिला आणण्यात काय आनंद आहे, त्याच्या मनानं होऊ द्या. दोघांचं खरोखरीच फार प्रेम आहे एकमेकांवर. दोघंहि एकमेकांवरच्या विश्वासानं परस्परांच्या फार जवळ आली आहेत. आपल्या मुलाला तिची प्रतारणा करायला भाग पाडणार आहात का तुम्ही ? "

काकूंचा विरोध आधीच बोथट झाला होता. माझ्या शब्दांनी त्यांच्या डोळचात पाणी आलं. म्हणाल्या,

" अरे, शेवटी तुमच्या सुखातच ना आमचं सुख ! "

रमेशला काकूंचे शब्द मी जसेच्या तसे सांगितले. आनंदातिशयाने त्याने माझ्या गळचाला मिठी मारली. आता तो परत कलकत्त्याला जायची घाई करू लागला. एक दिवस हातातलं पुडकं माझ्याजवळ देत म्हणाला––

" ही साडी घेतली आहे तिच्याकरता. "

" रंग कोणचा आहे ? " मी विचारलं.

" निळा. " तो म्हणाला.

मी ५० रुपये त्याच्या हातात देत म्हटलं––

" हिरवी साडी घे. तिच्या वडील दिराकडून साखरपुडचाची साडी ! "

रमेशच्या लग्नानं मी फार आनंदलो होतो. तृप्त झालो होतो. प्रणयाचा अटी–तटीचा खेळ रमेश खेळला. मी पाहता पाहता रंगून गेलो. नंदिनी मला आवडली. नमस्काराकरता, रमेशनं, माझ्यापुढे तिला कितीदा तरी वाकवलन्. तिच्या रेशमी साडीची सळसळ, डोक्यात माळलेल्या मोगरीच्या फुलांचा वास, वर–खाली होणाऱ्या हातातल्या बांगडचांची किणकिण, तोंडातून हळूच बाहेर पडणारे अस्पष्ट नाजूक शब्द ! हळदीकुंकवाच्या पावलांनी घरात आलेली ही लक्ष्मी खरोखरच लक्ष्मी होती.

काका–काकू मी, आम्ही तिघेहि कृतार्थतेच्या सारख्याच आनंदात मग्न होतो. सुनवाई, नवऱ्याला माडीवर चहा नेऊन देण्याच्या आधी आमच्यापुढे चहाचे कप आणून ठेवीत होती. रिकामे कप परत घेऊन जाण्याकरता, अगत्याने तिष्ठत उभी राहत होती. आणि ती गेल्यावर, जेवणघरात, आम्ही तिघे सुनवाईच्या गुणगानात एकमेकांशी स्पर्धा करीत होतो.

आंधळेपण आल्यापासून फार आत्मकेंद्री झालो आहे मी. स्वतःच्या भावना माझ्या मीच समजावून घेत असतो. अर्थ–निष्पत्तीकरता त्यांचा कीस काढीत असतो. रमेशचं लग्न झाल्यापासून, मला मी काका–काकूंच्या पातळीवर आल्या-सारखा वाटत होतो. काका–काकूसारखं माझं मन पोक्त झालं होतं. आयुष्याच्या उतरणीवर लागलेल्यांना आपलं कर्तव्य संपविल्यानंतर वाटावी तशी कृतकृत्यता मला वाटत होती का ?

रमेश माझा धाकटा भाऊ. मी त्याला वडिलांच्यासारखा. त्याला हवं ते त्याला मिळालं हा खरोखरी माझा आनंद होता का ? अपत्याच्या सुखात सुख मानण्याचा तो आनंद होता का ? मला तो तसा वाटला नाही.

रमेशनं आपलं मन माझ्यापाशी उघडं केलं आणि त्यानंतर तो कलकत्त्याला गेला. तो इथं होता तो एक महिना उत्कट अनुभवाचा महिना होता. प्रणयानु-भवांनी रंगला होता. हा नवरंगी खेळ भान विसरून मी पहात होतो असं मी म्हटलं. पण पाहता पाहता, पहाणाऱ्यांची तिऱ्हाइत भूमिकाच मी विसरलो होतो. एकापरीने मीच तो खेळ खेळत होतो. प्रियेचं सौंदर्य न्याहाळीत होतो, तिच्याशी गुजगोष्टी करीत होतो. न संपणाऱ्या रात्री रंगवीत होतो. रमेश असेपर्यंत त्याच्या विश्वात असून सुद्धा मी माझ्या 'आमच्या' विश्वात रंगत होतो. तो गेल्यानंतर स्वप्नांची तरल विरल सृष्टीसुद्धा खऱ्या सुखाचा अनुभव देत होती.

आयुष्यात तारुण्याचे भोग असे उत्कटतेने भोगले मी. आणि मग काका काकूसारखा तृप्त, पोक्त झालो. म्हणूनच मधून मधूनच भरकटत जाणाऱ्या माझ्या मनाचं मीच आश्चर्य करीत आहे. का–? असं का ? मी विरक्त नाही, विटलो नाही, मी तृप्त आहे. मग हे आश्चर्यच नाही का ?

संस्थेच्या कामात मी अधिक ओढला जात आहे. आमच्या वृंदवादनाचे चहाते वाढताहेत. माझे स्वतंत्र कार्यक्रम नावारुपाला येत आहेत. माझी पैशाची आवक वाढते आहे. हाहि एक चमत्कारिकच अनुभव आहे.

मी धरून चाललो होतो. मला फक्त स्वावलंबी व्हायचं आहे, स्वतःचं काम स्वतः करायचं आहे. स्वतःच्या गरजा स्वतः भागवावयाच्या आहेत. गरजा—!

मला हसू येतं. गरजांची त्यावेळची माझी व्याख्या अन्न, वस्त्र व निवाऱ्यापलिकडे गेली नव्हती. मनाचं सुख ? माझ्या वाद्याच्या रूपाने तेहि मी हातात घेतलं होतं.

एका चहात्याने देणगीदाखल मला एक टेपरेकॉर्डर घेऊन दिला आहे. वसंत वहारातली मी सतारीवर वाजविलेली गत, देणगी देताना, त्यानं वाजवून दाखविली. मी तृप्त मनानं ऐकत होतो. माझ्या मनात वसंत–वहार फुलला होता. देणगी देणारा गेला. उत्साहाने मी मनाशी यादी करीत होतो. मला आणखी काय हवं आहे ?–एक–दोन–तीन.

यादी संपेल असं वाटेना. अन् मग उगीचच चीड मनात उसळून आली. थकवा जाणवू लागला. उठलो. आरामखुर्चीवर जाऊन पडलो. थकवा घालविण्या-करता डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळयांसमोरही यादीची पाठीमागे लागलेली लांवण नाचू लागली. विचार नको म्हणून नाहीसा होईना. कंटाळून, मन दुसरीकडे लावण्याचा विचार केला. वसंतवहाराची गत पुनः सुरू केली. पण ऐकण्याइतपतही मन एकाग्र होईना.

दिवेलागण झाली. काकूंच्या बांगडयांचा आवाज आणि वटन खाली दाव-ल्याचा आवाज आला. मी दचकलो. पण सरावाने हात जोडले आणि डोळे मिटून घेतले. त्या मिटल्या डोळयांसमोर क्षणभरच निरांजनातली इवलीशी प्रकाश–ज्योत उजळल्यासारखी वाटली. अन् पुनः कायमचा अंधार.

संध्याकाळी घरी परतलं, की पुष्कळदा थकवा जाणवतो. मन उदास होते. कसली तरी हुरहूर जागी होते. वाद्य हातात घ्यावं, सूर काढावे. बेचैनी वाढत जाते. आतल्या आत वादळ सुरू झाल्यासारखं वाटतं.

ज्या सुरांनी सान्त्वना दिली होती, तेच सूर आजकाल छातीत कालवाकालव निर्माण करीत आहेत. नकळत करुण सुरावरचा माझा भर वाढतो आहे. त्यांच्यात सारं वातावरण भारून टाकण्याची ताकद उत्पन्न झाली आहे. आधी शून्य शांतता, मग हुंदका अन् मग वादळ ! छातीत न सामावणारा आवेग आणि मग थकवा !

काल रात्री स्वप्न पडलं. डोळयात निरांजनाची आरती उजळीत आसावरी खोलीत माझ्या अगदी जवळ येते आहे. मला मिठी घालून माझ्या छातीवर आपलं डोकं टेकते आहे. मी तिला हळूच आपल्या डाव्या हातावर उचलून घेतो आहे. तिच्या मिटलेल्या टपोऱ्या डोळयावरून आणि पापण्यावरून हात फिरवीत. तिच्याकडे एकाग्रतेने पहातो आहे—

मला डोळे आले आहेत.

झंप्या

(एकांकिका)

'यक्ष'

[स्थळ:— एक जुजबी हॉटेल, मजुरासाठी लावून दिलेलं. मोटरस्टँडवर असतं तसं, पण कामचलाऊ. मालक-पोऱ्या एकच. नेहमीचीच चौकोनी छोटी टेबलं, त्यांच्या भोवती बाक, एक त्यातल्या त्यात बरं टेबल, त्याभोवती म्हणजे बाजूला समोरसमोर दोन खुर्च्या. खास साहेब लोकांसाठी टेबल. वेळ सकाळची. आठाचा सुमार. प्रवेश करतात-दोन मजूर, नेहमीचे गिऱ्हाईक]

१ मजूर—मालक, एक कोप चा, दोन बशा.

२ मजूर—एक पलेट कांदा भज्या.

१ मजूर—आधी कांदाभज्या, मंग चा, दोन गिलास पानी.

मालक—आज जादा खुषी दिसतेय, खायला आधी नि कामाला कधी. आज सुद्धा सुट्टी आहे तुम्हा लोकांना. मजा आहे लेको तुमची, नाहीतर आम्ही एक कप चहा-कांदा भजिया सुटत नाही आमचं.

१ मजूर—पैसा कसा मिळते हरामाचा! (मालक त्याच्या अंगावर गमतीनं धावतो.) आजबी काम बंद. विलायती मशिनं आनतात लेकाचे. आन् मगदूर नाही चालवायचा.

२ मजूर—इंजिनेर साह्यब लागलाय खटपटीला, आपल्यास काय? हजेरी लावून आलो आम्ही टाइमकिपरपाशी, तवा म्हटलं या चा पिऊन आन भजी खाऊन.

मालक—म्हणजे तिकडे ते इंजिन बंद पडलं, अन् तुम्ही आलात इकडे आपल्या इंजिनात कोळसा दडपायला.

१ मजूर—आमचं हें इंजिन शाबूत आहे म्हणून त चालतं तुम्हा लोकाहिचं. नाहीतर कोन येते या हाटेलात चा पियाला.

२ मजूर—काहून म्हन्तं? आपल्या मजूर लोकांसाठी तर खोललं हे हाटेल, कंत्राटदारानं मालकास सांगून. आपलं हे रेलवाईच्या पुलाचं काम एकदा संपलं—

मालक—की पुन: आपलं विचवाचं बिऱ्हाड पाठीवर. सालं जवळपास एक गाव नाही मोठं, की कधी सिनेमा पाहूं. वीज नाही, रेडियो नाही, वर्तमानपत्र नाही. जंगलात पडलाय माणूस, (भजी देतो, पाण्याचे ग्लास आदळतो या वाक्याला.)

१ मजूर—असं शहरातल्या बाबूवाणी बोलून कसं व्हईल ? मालक, आज तुम्ही गेले म्हंजी आपल्या सारजाबाईचं कसं व्हईल ?

(बिडी काढतो, एक मालकास आणि दोस्तास, मालक आपल्या आगपेटीनं पेटवतो.)

मालक—तिचं काय व्हायचं सटवीचं गावभवानीचं. आताच भेटलाय तिला दुसरा माझ्याहून सवाई.

२ मजूर—म्हंजी तुमचं भांडण झालं व्हय ? अबा ! अजूनं कसं कळलं नाही आपल्या झंप्याकडून.

मालक—बोल तं म्हणा त्या झंप्याला ह्याबद्दल. एकाची दोन तोंडं करून देईन साल्याची.

१ मजूर—ही गोष्ट सोडा मालक. झंप्याच्या ताकदीचा तर इचार करा. तो मानूस का हाये. बैल हाये बैल ! ताकदीनं अशी मुसंडी मारील !

मालक—तसा गरीब आहे बिचारा. म्हणून तर देतो त्याला मी आला की एक कप चहा.

१ मजूर—आन एक पलेट कांदा भज्या बी.

२ मजूर—म्हंजी असं, की जादा बोलू नको माझ्याबद्दल ! आम्हाला बी कळतं.

मालक—तू साल्या बदमाशच आहेस. तुला कुठं चांगलं दिसायचं नाही. कावळ्याची दृष्टी आहे तुझी.

२ मजूर—एकलटिक्याले दुसरा धन्दा कोंचा आहे जी. पन अजून पोत्तर झंप्या कसा आला नाही बा.

१ मजूर मले एकलटिक्याले धंदा नाही ? आन तुझा धंदा मोठा चांगला, झंप्याचं बोलणं ऐकायचा.

२ मजूर—का बा मी काय ऐकतो ?

मालक—हं आटपा झटपट. तुम्हाला नाही काम ! पण लोकांना आहे ना ! त्या पहा अक्कासाहेब आणि शिलूताई चालल्या बगीच्याकडे दमणीतून. काय पण गोऱ्हे आहेत दमणीचे.

१ मजूर—मोठी मालकीन म्हंजे लाखातली बाई आहे.

२ मजूर—ते गोऱ्हे आताच त घेतले जत्रेत. दो दाती झाले नाहीत अजून.

मालक—पण चपळ किती ! आवरता आवरत नाहीत.

१ मजूर—पण घुऱ्यावर धर्माजीच आहे ना जी ! त्यास आगोटलेन ते गोन्हे.

२ मजूर—हा धर्माजी मातर कसा सरळ आला सुतावाणी. असा वागे गावात ! पाणोठ्यावर पोरी नाही ठैरायच्या. पण आता खाली नजर लावून उभा असतो आक्कासाहेबासमोर.

मालक—आक्कासाहेब आहेतच तशा. काय दरारा आहे त्यांचा ह्या पंचक्रोशीत. शिलुताई मात्र अगदी सौजन्याच्या मूर्ती ! बोलताना चेहेऱ्यावरचं हसू कधी मावळायचं नाही.

२ मजूर—आक्कासाहेबाच्या बोलण्यावर जाऊ नका, मालक. परवा माहा पोरगा एकदम बिमार झाला. मज काही सुचेना. मी बसून होतो पोरापाशी. माही अस्तुरी गेली आक्कासाहेबांच्या वाड्यात त्याहीस सांगाले. वाड्यातच काम करते ते. आक्कासाहेबास कळण्याचीच देरी. खुद्द आल्या पोरास पाहाले. दवा बी देली. अन डागदर साहेबासबी बोलावणं धाडलं. तवा म्हंतो—

१ मजूर—काहो म्हणू नकोस, आक्कासाहेबासमोर उभं राहायची आपल्या बाची बी छाती नाही होत. आता पहा, शिलूताईबद्दल बोललास—

२ मजूर—तू पाहिलं नाहीस शिलूताईला त्या दिशी, धर्माजीशी बोलताना. अशी खरड काढली लेकाची त्या दिशी. माही अस्तुरी म्हणत होती,...

१ मजूर—आली पुन्हा तुही अस्तुरी. साऱ्या गावास ठाऊक झालं काय झालं त्या दिशी.

मालक—काय झालं ? आम्हास तर सांगा ही वाड्यावरची बात.

१ मजूर—म्हंजी असं, हा धर्माजी पाणोठ्यावर बसे. आन छेडखानी करे गावातल्या पोरीह्याची. एक दिवस टांगा चालला होता शिलूताईचा वाजूनं, त्यांनी हटकलं त्याला. जास्त बोलल्या नाहीत. पण एक दोन शब्दांनी त्यांच्या, दुनिया पालटून गेली त्याची. यावर्षी तर त्याच्याकडं आहे त्यांची वावरं बटइनं. आन बगिच्याची देखभाल त्याच्याचकडं आहे म्हंतेत.

२ मजूर—आक्कासाहेबाची निगराणी आहेच. पण बाईमाणसास आधार लागतेच कोणाचा तरी.

१ मजूर—थांब लेका, ही आली सारजाबाई, बाईमाणूस आधार घ्यायाले.

२ मजूर—पन दिवसा ? दिवसा का बा ? चांद कसा दिवसा उगवला बा ?

(एकमेकाला खुणावतात. १ मजूर मालकाला डोळा घालतो.)

सारजाबाई—का–जी मालक; कैची छाप उची सीझर आहे का जी तुमच्याकडे ?

१ मजूर—(लघळपणे) आज तुम्ही आल्या सिगरेटची डबी न्यावाले, सारजाबाई, का वा ?

बाई—तुले कोनी सांगतला चोमडेपणा लख्या; आज येईन–उद्या येईन. भीति आहे तुही—

१ मजूर—माही काहून ? पन साह्यव आहे ना ? तशा तुम्ही काल पोत्तर येत नव्हत्या या हाटेलात ? (हळूच) पन दिवसा नाही–रात्री.

मालक—(ओरडून) लख्या, लेका, तुला काही लाज !

सारजाबाई—तुले सांगून ठेवते लख्या, माही छेडखानी करू नको. साह्यवास कळण्याचीच देरी, ठेकेदार ठेवणार नाही तुले रोजगारीवर.

२ मजूर—जा ना तुम्ही सारजाबाई, आपल्या रस्त्यानं. हा लख्या म्हंजी असा मानूस आहे—लहान मोठं काऽऽही पाहत नाही.

सारजाबाई—जसं काही मी तुम्हास वळखतच नाही ? मोठे शहाजोग. तुम्हीबी त्याचेच साथीदार.

(फणकऱ्याने जाते)

१ मजूर—ती सिगरेटसाठी आली म्हणता का ? आली तुम्हास भेटाया. आर् आपलं गिऱ्हाइक टिकून ठेवाया लागतं काही झालं तरी.

(टाळी देतात).

मालक—हसा लेको हो, इंजिनिअरजवळ खाईल चुगली, मग बसा

२ मजूर—काय करील ? काढून टाकील. जाऊ आक्कासाहेबाच्या जागलीवर खेतावर.

१ मजूर—हा इंजिनेर दिसते मोठा साळसूद. पन मानसाच्या पोटातलं नाही कळत. मातर सारजाबाई......

[झंप्या प्रवेश करतो. केस पिंजारलेले, दाढीमिशाचं जंगल. लाळ गळते आहे. डोळ्यातून पाणी. कपड्याच्या चिंध्या, एक ध्यान आहे नुसतं अर्धवट.]

झंप्या—चा, चा. (प्रत्येकासमोर हात पसरतो.)

१ मजूर – आज साल्या तुला चहा नाही. फारच माजला आहेस तू.

झंप्या—(रडत) भेटत नाही. भेटत नाही. आज चा भेटत नाही. (टेबलाजवळ येतो.)

झंप्या – [मालक—सारजा भांडणाची नक्कल वठवतो]

[**सारजा**—माहा हात सोडा. तुमची नियत कळली मला. तुम्हास पसा प्यार आहे. गल्ल्यावर बसा आन् बसा आपल्या हातानं पैसा मोजत. माहा हात सोडा.

मालक—का ? का ? त्या नव्या साहेबावर भाळलीस म्हणून, तो तुला राजाच्या राणीसारखाच वागवीत असल नाही ? तुझ्या पेटकाडान अशी एक लाथ ठेवून देतो.

सारजा—तू लाथ देणार. तोंड पाह्य आरशात. असा कल्ला करतो आता ह्या वक्ती. तोंड लपवशील माह्याच पदरात.]

मालक—(त्याच्या अंगावर ओरडून) झंप्या–झंप्या–साल्या थांब. काय बकतो आहेस. हा चहा घे. ढोस एकदाचा.

१ मजूर– (२ ऱ्या मजुराला डोळा घालीत) एखादं बिस्कुट द्या नं असलं तर.

मालक—तू गप बैस.

[झंप्याला वस्तू मिळतात. तो बाजूला जाऊन चहा पितो, नि खात बसतो बका बका. नंतर लगेच चिरगुट पांघरून घेऊन लवंडतो आणि एखाद्या गाठोड्यासारखा पडून राहतो.]

२ मजूर– हा झंप्या साला, एखाद्याची मान एखाद्या वक्ताला अशी कापील......

[दोन व्यक्ती प्रवेश करतात. एक सूटबुटातला इंजिनिअर, दुसरा पुढारीछाप खादी कपडेवाला.]

मालक—या या गणपतशेठ. आज गरीबाकडे पायधूळ झाडलीत, अन् साहेबसुद्धा.

गणपतराव – आज घेऊन आलो साहेबांना. हे छोटेसाहेब सेंट्रल रेल्वेच्या P. W. D. खात्यात हपीसर आहेत.

मालक—(फडक्यानं टेबल पुशीत– आधीच उठून उभे असलेल्या मजुरांना उठावे इथून, तिथं बसा त्या बाकावर, टेबल मोकळं करून द्या साहेबासाठी, बसले मोठे साहेबाच्या टेबलावर साह्यबासारखे)

[ते उठतात, आणि झंप्याला Cover करून उभे राहतात.]

गणपतराव—बरं का इंजिनिअर साहेब, ह्या हॉटेलाच्या रुपावर जाऊ नका. इथला चहा म्हणजे चीज आहे चीज. उगाच नाही बड्या कंत्राटदार साहेबानं ह्यांना इथं हे हॉटेल लावून दिलं ! इथं आले की इथला फर्मास चहा आधी घेतील, मग जातील कामाला दुसरीकडं.

इंजिनिअर—अरे वा ? मला ठाऊकच नव्हतं. कधीमधी इथून सिगरेटस् मी मागवल्या आहेत. (मजुरामध्ये नेत्रपल्लवी) पण म्हटलं चहा, चहा नको. अशा ठिकाणी चहा, म्हणजे—

मालक— साहेब पिऊन तर बघा, उगाच आपली आपणच कशाला ? त्याचं असं आहे–म्हणजे ह्या कंपनीकडे रेल्वे पुलाचं कंत्राट आलं, की माझ्याकडे तिथल्या चहाचं कंत्राट आलंच म्हणून समजावं.

इंजिनिअर— असं का ? ठीक आहे. म्हणजे मला एक बसायला स्थान झालं; (विषय तोडीत–गणपतरावाकडे वळून) काय गणपतसेठ, म्हणजे आता मला तुमचे दुसऱ्यांदा आभार मानले पाहिजेत. मघा आक्कासाहेब आणि शिलूताई ह्यांची तुमच्यामुळं ओळख झाली. त्यांच्याबद्दल मी इतकं ऐकलं होतं.

गणपतराव—माझ्यामुळं ? ती कशी काय ?

इंजिनिअर—अहो तुम्ही होता म्हणूनच त्यांनी आपला टांगा थांबवला. आणि त्यामुळं तुम्हाला त्यांची माझ्याशी ओळखच करून देता आली.

गणपतराव—अहो, त्याचं काय विशेष आहे ? वाड्यावर जाऊन त्यांची मी तुमच्याशी ओळख करून दिली असती. मला आधीच का नाही सांगितलत ? अहो, माझा पाठचा भाऊ धर्माच त्यांची शेती करीत असतो बटईनं, शिवाय बगिच्याची देखभालही त्याच्याचकडे आहे. तुमच्या जिपमधून जाऊ एखाद-वेळी आपण बगिच्यावर, तुमच्या फुरसतीनं.

इंजिनिअर—का नाही ? अहो असाच कुठं मिळायचा विरंगुळा आम्हाला या जंगलात. नाहीतर ह्या जंगलात आहे काय दुसरं !

गणपतराव—का वरं ? पेटी वाजवीत असता ना आपण ! हां–हे छान जमेल, शिलूताईनाहि गाण्याचा नाद आहे वरं का ? धर्मा सांगत होता, तुमचं नि त्यांचं छान जमेल. तुम्ही पेटी वाजवा त्या गातील. हां हा. गाण्याचा एक प्रोग्रामच घडवून आणू आपण वाड्यावर.

इंजिनिअर—प्रोग्राम वगैरे कशाला ?

गणपतराव—वा, वा ? असं कसं ? तुमची पेटी ऐकवलीच पाहिजे, आक्कासाहेबांना. (तो नाही म्हणतो) माझ्याकडे सोपवा. हां हां म्हणता मस्त कार्यक्रम होईल त्रिपुरी पौर्णिमेला. त्रिपुरी पौर्णिमेला वाड्यावरल्या मंदिरात उत्सव असतोच. त्यात हा एक प्रोग्राम.

इंजिनिअर—प्रोग्राम वगैरे कशाला हो ? पेटी म्हणजे आमचा एक छंद. पण हा तुमचा चहा कसा नाही आला अजून ?

मालक—तुमच्यासाठी स्पेशल टाकलाय, साहेब.

गणपतराव—तुम्हाला तरी कसली; घाई आहे ! ड्रेजिंग ऑपरेशन्स तर बंदच आहेत तुमची !

इंजिनिअर—आमचा तो नवा सेक्शन पंपच आज काम देत नव्हता. दुरुस्त तरी कसा करणार. आणि स्पेअर्स आणायचे म्हटले की धावा शहरात. ह्या वावपळीचा आता कंटाळा आला आहे मला. आता परत गेलो की आठ दिवसांनी परत येईन इथं.

गणपतराव—म्हणजे त्रिपुरीला तुम्ही इथे नक्की राहणार, काय ? मग प्रोग्रामचं नक्की करू ना ? (चहा येतो).

इंजिनिअर—(घुटके घेत) पण या मुलींची लग्नं झाली नाहीत वाटतं अजून ?

गणपतराव—छे हो ! ह्या मुलींचं सारं लक्ष शिकण्यात होतं आधी. मोठी आक्कासाहेब मोठी करारी, धाकटीचं हवं नको करावं म्हणून तिनं लग्न केलं नाही. आणि पुढं आक्कानं लग्न केलं नाही म्हणून धाकट्या शिलूबाईंनीहि लग्न केलं नाही.

इंजिनिअर—म्हणजे दोघींना एकमेकींचाच आधार आहे म्हणायचा.

गणपतराव—गंमत आहे नाही ? एवढ्या मोठ्या इनामदारांच्या घराण्यातून या दोन मुलीच वारस ठरल्या आहेत. शहरातच राहात होत्या आजवर. पण इस्टेट सांभाळायची जमेना शहरातून, म्हणून येऊन राहिल्या इथं.

इंजिनिअर—मोठ्या बाई मला तशा कर्तृत्ववान दिसल्याच, शिलूताईंच्या स्मितात पण काय गोडवा आहे. असा कुलीन आणि घरंदाजपणा आमच्या शहरांतून लुप्त व्हायला लागला आहे अलीकडे.

गणपतराव—अहो, शिलूताई नि आक्कासाहेब म्हणजे आमच्या गावचं भूषण, आमच्या गावची शाळा त्यांनी बांधली. गुरांचा दवाखाना त्यांनी शब्द टाकला म्हणून आमच्या गावाला आला. परवाच म्हणत होत्या गावात वीज आणायची आहे म्हणून. त्यांच्या संत्र्याच्या बगिच्यावर पंप बसवायचा आहे त्यांना. एकदा त्यांची शेतीची कामं सुरू झाली की मजूर मिळणार नाही तुम्हाला या भागातून.

इंजिनिअर—त्याची काळजी नाही. आमचे मजूर आम्ही बहुधा तेलंगणातूनच मागवतो. कामाला फार चांगले. इथले मजूर मारी कामचुकार. ते पहा ना. बसले आहेत केव्हाचे चिवडा फाकत.

(ते मजूर हे ऐकताच हसत उठतात आणि जायला निघतात. त्याक्षणी चाळवाचाळव करीत झंप्या उठतो, किलकल्या नजरेनं सभोवार पाहतो. इंजिनिअरची त्याच्यावर व त्याची इंजिनिअरवर दृष्टि स्थिर होते. तो उठतो, "मना भूक लागयी" म्हणत तो मजुराकडून—मालकाकडे—तिकडून गणपतराव आणि इंजिनिअरपर्यंत हात पसरत येतो आणि लगेच.)

झंप्या--[(इंजिनिअर–सारजा प्रेमप्रकरण नक्कल वठवतो.)

[इंजिनिअर--रात्री कसं म्हणजे करमत नाही सारजा. गाव इतकं दूर. कशाला जातेस ? पोचायला खूप रात्र होईल तुला.

सारजा---जशी काही माहीच काळजी तुम्हाला जी. आता शयरात गेला आन आपल्या मानसात पडला मंग कुठली सारजा ! हां, हां. जवळ येऊ नका; हा एवढा लाडीकपणा कशापायी समजतं मला !

इंजिनिअर--सारजे, तू भेटली नसतीस तर या जंगलात मी चार दिवस राहिलो नसतो.]

इंजिनिअर--(घाबरून–घामाघूम होतो.) अरे बापरे ! हा काय प्रकार ! अरे हा माणूस का भूतचेष्टा ! अरे याला कुणी आवरा तरी.

गणपतराव---(हसू दाबत) झंप्या, साल्या, इकडे ये. हे घे पैसे, निघ इथून. काय फालतूपणा लावला आहेस. साहेबाची खिल्ली करतोस. लख्या त्याच्या हातात दे तो भजांचा पुडा. घेऊन जा त्याला बाहेर एकदाचा.

१ मजूर---चल लेका झंप्या, हा पाह्य भजाचा पुडा. चाल, बाहेर जाऊन खाऊ. खूप केली तुवा आज.

२ मजूर---मालक, लिवून ठेवा आमच्या नावावर–दो कप चा, दो भज्या. आन दो चिवडाशेव मिक्सर. (फिदी फिदी हसत जातात.)

गणपत--जाऊ द्या हो, वाईट वाटून घेऊ नका. हा झंप्या साला अजब अवलिया आहे. मागे ऐकलेलं संभाषण कसं जसंच्या तसं निघतं त्याच्या तोंडातून, अन् बदमाश नेहमी टेहळणी करून चोरून ऐकतो, सुद्धा. बाकी ध्यान पाहिलंच आहे तुम्ही, अर्धवट आहे.

इंजिनिअर---अर्धवट आहे ? अहो म्हणता काय तुम्ही ! Black Mail चाच प्रकार दिसतो मला हा. पण ह्याला पकडत कसे नाहीत ? ह्याला मोकळं ठेवणं.

गणपत---पण पकडून करणार काय ? पागलखान्यात टाकायचा म्हणजे त्याचा खर्च कुणी घ्यायचा आपल्या अंगावर ? तसा कुणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही. कुणाच्या अंगालासुद्धा हात लावत नाही आणि ते संभाषण लक्षात मुद्दाम ठेवलं म्हणता काय ? रामाचं नाव ! लक्षात ठेवावंच लागत नाही त्याला. त्याच्या मेंदूची रचनाच तशी असावी. स्वतःचं नावसुद्धा त्याला नीट सांगता येत नाही. पण दुसऱ्यांची संभाषणं कशी खडान्‌खडा म्हणून दाखवतो. आमच्या गांवचं चालतं बोलतं वर्तमानपत्रचं आहे म्हणाना. लोकांची कुलंगडी चव्हाट्यावर मांडायला.

इंजिनिअर—पण लोकांना काही अन्न वगैरे आहे की नाही !

गणपत—(हसत) जाऊ द्या हो. त्या सारजेचं काय घेऊन बसलात. सारे ओळखतात तिला गावातले. तिचा मुळी वंदाच तसला आहे.

इंजिनिअर—खरं ? मला कल्पनाच नव्हती. मला मात्र तिला आता हाकलूनच लावलं पाहिजे आमच्या कँपमधून. काय भयंकर माणूस आहे हा तुमचा झंप्या ! मला कल्पना नव्हती.

गणपत—अहो, कुठला भयंकर न् काय ? निसर्गाची आपली एक करामत म्हणतात ना—– देवास करणी अन्– नारळात पाणी. मागं एकदा काय झालं सांगू तुम्हाला ! काश्मिरात—मागे म्हणजे फार वर्षापूर्वीची स्वराज्य मिळण्यापूर्वीची आहे ही गोष्ट—दोन साहेबांचं, गोऱ्या, भांडण झालं जंगलात.

इंजिनीअर—मग !

गणपतराव—प्रकरण गेलं कोर्टात. पण साक्षीदार मिळेना. भांडणाचं कारण काय ? कुरापत प्रथम कुणी काढली हे सिद्धच होईना. पण शेवटी एकाला साक्षीदार मिळाला तिथला एक शेतकरी किसान—मुसलमान. तो म्हणाला मला इंग्रजी येत नाही आणि समजत पण नाही. पण ह्या दोघांचं संभाषण मी तुम्हाला खडान्खडा म्हणून दाखवतो. जसं घडलं तसं. आणि त्यानं ते भाषण म्हणा—संभाषण म्हणा—म्हणून दाखवलं, तसलाच प्रकार आहे हा. वहुरत्ना वसुंधरा म्हणतात, दुसरं काय !

इंजिनीअर—तुमच्या गावचं पण रत्न म्हणजे रत्न आहे गणपतराव. उभ्या जन्मात विसरणार नाही मी त्याला. त्याला चौदावं रत्नहि दाखवावं लागेल एखादे वेळेस मला.

गणपतराव—तेवढं मात्र करू नका. शंकराला वाहिलेल्या पोळासारखा माजला आहे तो. तुम्हालाच लोळवील, शिवाय गावकऱ्यांचं ते मोठं आवडतं पात्र आहे. उगाच चिडू नका. झंप्याच्या मनात काही असतं म्हणता काय ? रामाचं नाव ! (हसतो).

[क्षणभर गडद अंधार, पुन्हा प्रकाश. स्थळ तेच. इंजिनिअर प्रवेश करतो.]

मालक—या साहेब. काय चहा ? भजी पण गरमागरम आहेत.

इंजिनीअर—जरा वेळ बसेन म्हणतो. गणपतराव येणार आहेत एवढयात. मग घेऊ चहा.

मालक—काय ? आजहि काम बंद ? काल म्हणे भयंकर अपघात झाला; दरड कोसळून.

इंजिनीअर—हो ना ! तीन माणसं दगावली. सुरुंग का उडत नाही म्हणून ती आत जायला नि स्फोट व्हायला एक गाठ पडली. काम आज बंद ठेवावं लागलं. काल तो पंचनामा वगैरे भानगडी झाल्या, उद्या गव्हर्मेंट explosive इन्स्पेक्टर्स येणार आहेत चौकशीला. तेव्हा आज धर्माजीच्या शेतावर जायचा बेत ठरला आहे आमचा. म्हणजे मुर्गी वगैरे...

मालक—(हसत) हं, आलं लक्षात. साहेबांना हे चालतं माहीत नव्हतं.

इंजिनिअर—आता म्हणजे न चालणारेच साहेब शोधून काढायला हवेत. (हसतात) हा धर्माजी माणूस कसा आहे पण ? फार हूड होता म्हणे पूर्वी.

मालक—आक्कासाहेबांचीच करामत म्हणायची. अगदी अल्लाची गाय झाला आहे अलीकडे. शिलूताईचे शब्द नुसता झेलीत असतो.

इंजिनिअर—गणपतरावांचा तर आपल्या धाकट्या भावासंबंधी एखादा प्रश्न नुसता विचारून बघा, आधीचा धर्म्या आणि नंतरचा धर्म्या ह्यावर एखादं भाषण ऐकण्याचाच प्रसंग येतो. तेव्हा म्हटलं एखाद्या तिऱ्हाइताला विचारून बघावं. आहे मात्र तरणाबांड, तालीमबाज.

मालक—अशा पोरांना मनाजोगतं काम मिळू द्या, मग त्यांच्यासारखे मन लावून काम करणारे शोधून मिळायचे नाहीत.

इंजिनिअर—मागं मी वाड्यावर जाऊन आलो. तिथली शिस्त अगदी वाखाणण्यासारखी आहे. दिवाणखाना काय लख्ख ठेवला आहे.

मालक—ती बाजू मात्र शिलूताईची हं. आक्कासाहेबांचं काम बाहेर जायचं, शेती बघायची, उन्हाउन्हातून भटकण्याची त्यांना फार हौस, पण शिलूताईना त्याची हौस नाही. त्या आणि त्यांचं कशीद्याचं काम.

इंजिनिअर—Embroidery work चे किती तरी नमुने त्या दिवशी मला पहायला मिळाले.

मालक—अहो, प्रदर्शनातून बक्षिसं मिळाली आहेत त्यांना.

इंजिनिअर—कलावंतच आहे बाई. आवाज पण किती गोड. गाण्याची तयारी पण उत्तम. माझी पेटीवरची साथ म्हणजे......(हसतो) त्यांनाच किती वेळ सांभाळून घ्यावं लागलं मला. पण धर्माजीला इतका उत्तम तबला वाजवता येत असेल ह्याची मला कल्पना नव्हती.

मालक—जिद्दी आहे तो पोर. लागला एका गोष्टीच्या मागे की लागला. गणपतरावांच्या तोंडून स्तुती ऐकायला हवी तुम्ही त्याची, आलेच वाटते गणपतराव.

(१–२ मजूर प्रवेश करतात.)

अनुक्रमणिका

१, २ मजूर—रामराम मालक, रामराम साहेब.

१ मजूर—आज वी छुट्टी ?

२ मजूर—मह्या घाटचात येणार हे कंपनी.

मालक—तुमचं काय जातं वेटचांनो, खा, प्या, मजा करा. तुमची मजुरी चुकत नाही. वोला, काय पाहिजे आवी—चहा की मजिया.

१ मजूर—चहाच द्या अगुदर.

२ मजर—भज्या नको. जलदी आहे आम्हाला. दो वशा द्या मातर.

मालक—तुम्हाला कसली जलदी ! तुम्हाला तर आरामच आहे.

१ मजूर—म्हटलं तर काम, नाही तर आराम.

मालक—ते कसं काय ?

२ मजूर—झंप्याच्या शोधावर गेलो होतो.

मालक—म्हणजे कुठे गायब झाला झंप्या ?

१ मजूर—मालकिनीच्या वाडचाकडे जाताना दिसला आज रामप्रहरी. म्हटलं हा काळा पहाड वाडचाकडे काह्यले वळला.

२ मजूर—आम्ही दवा धरून वसलो. शोधाशोध शोधलं. पण पुन: दिसला नाही. कुणीकडे साल्यानं गुंगारा दिला, नाही समजलं.

[एकीकडून गणपतराव व दुसरीकडे सगळयांच्या पाठीकडून झंप्या प्रवेश करतो.]

झंप्या—चा–चा–चा. (करीत हिंडतो, हात पसरत)

गणपतराव—(मजूरांना) हा आला तुमचा दोस्त, द्या त्याला चहा.

१ मजूर—झंप्या, लेका कुठं गेला होता सांग अगुदर.

[झंप्या एकदम चा–चा–चा म्हणत असताना झटका वसल्यासारखा एका जागेवर उभा राहतो. आणि बोलत सुटतो.]

[रागाचा आवाज–आक्कासाहेबांचा–(वाडचावरच्या मालकीणबाई) शीले, शीले, अग झालं तरी काय तुला ? शर्थ झाली बाई. इतकं विचारते आहे, पण तुला त्याचं काही आहे का ? सगळे टवकारून ऐकतात.]

गणपतराव—हा इनामदारांच्या आक्कांचा आवाज. म्हणजे झालं तरी काय वाडचावर.

झंप्या—[कुठंहि लक्ष न देता]—

[शिलू—तू सुद्धा असं बोलायला लागलीस तर मी जगू कुणाच्या भरवशांवर. आक्का—अग–पण तू कुणाची मुलगी ? दादासाहेबांचं केवढं नाव होतं या मुलखात. तुझ्या हातून असं काही घडेल—

शिलू—आक्का–मी तुला कसं सांगू ग. नको हे जिणं असं मला वाटतं आताशा. एकटं बसण्याची मला भीति वाटायला लागली आहे. पण घरी असलीस की तू आपल्या स्वत:ला कोंडून बसतेस. सकाळ झाली नाही तोच बाहेर बगीच्याकडे निघून जातेस. अशानं माझं कसं होईल ?

आक्का—मग काय सकाळी घरी राहूं ? तूं सकाळी डोकं धरून बसतेस. तुझ्या ओकाऱ्यांचं निस्तरायला घरी राहू म्हणतेस ? थोडी तरी लाज धरावी माणसानं दुसऱ्याचं उणं काढायला. घराण्याची लाज, प्रतिष्ठा सारी गुंडाळून ठेवलीस काय ? अशानं माझं कसं होईल ? तुझं काय व्हायचंय् आता ? व्हायचय् आमचं वाटोळं. तोंड दाखवायला तरी जागा आहे काय आम्हाला ? अशी कशी तूं घसरलीस ? अग—तुझं शिक्षण—तुझा दर्जा—तुझं घराणं ह्या साऱ्यांचीच कशी भूल पडली तुला !

शिलू—आक्का, तुला नाही कळायचं ग. हा निसर्गानं सूड उगवला आहे माझ्यावर.

आक्का—निसर्गानं सूड ? तुझ्या शिक्षणाचा हा फायदा आहे म्हणायचा. आधी करून टाकायचं आणि त्याचा पाठपुरावा पुढे दाखले देऊन आपलं ज्ञान घालायचं.

शिल—अशी क्रूर थट्टा करू नकोस. अक्का, अशानं मी जीव देईन. नाही तरी आताशा मला जगण्यात काही जीव नाही वाटत.

आक्का—काय ? तुझ्या त्या पोटातल्या जिवानं शिकवलं काय तुला हे तत्त्वज्ञान ? मूर्ख कुठली. आतताईपणा करू नकोस, मलाच निस्तरलं पाहिजे सारं. मी डॉक्टरांना बोलावणं पाठवलं आहे.

शिलू—(घावरून) डॉक्टरांना ? डॉक्टरांना कशाला ?

आक्का—(उपरोधानं) विचारायला ? कधी होणार आहे बाळंतपण ! कधी होणार आहे भाचा मला म्हणून !—

शिल—आक्का ! आक्का ! (सगळे स्तंभित होतात).]

गणपतराव—काय भयंकर प्रकार आहे हा ! शिलूताई ! शिलूताई ! झंप्या, साल्या कुठं, कसं ऐकलसं हे सारं.

झंप्या—(एकदम गिरकी घेत) मना चा दे—मना चा दे—नाही देत—नाही देत. नको देऊ—नको देऊ. (असं म्हणत त्याला अडवायला आलेल्या दोन्ही मजुरांना दोन्ही हातांनी साफ लोळवून हॉटेलाबाहेर पळतो. ते कसेबसे उठतात आणि त्याला पकडायला धावतात. शिवीगाळ करीत जातात.)

अनुक्रमणिका

गणपतराव—ह्याचा छडा लावला पाहिजे. म्हणजे झालं तरी काय ? हा पाजी माणूस कोण ? शिलूताई ! शिलूताई ! काय केलंस हे. आमच्या गावच्या प्रतिष्ठेचा हा सवाल आहे.

इंजिनिअर—कठीण आहे. आपण ह्यांच्याचकडे जाणार होतो ना गणपतराव !

गणपतराव—पण आता जाणं कसं शक्य आहे ? इकडे येतानाच रस्त्यात मला डॉक्टर दिसले. चालले होते टांग्यातून वाड्यावर. मी त्यांना विचारलंही की कोण आजारी आहे ? फार कठीण प्रसंग ओढवला शिलूताईंवर. शिवाय आपणाला जाऊन सहानुभूतीसुद्धा दाखवता येणार नाही.

इंजिनिअर— अडचण आहे एकंदरीत. गावची वडी माणसं, काय कुलंगडी निघतात !

गणपतराव— असं म्हणू नका. शिलूताई म्हणजे शालीनतेची पुतळी. कधी मान उचलून बघायच्या नाहीत कुणाकडे. स्वभाव तरी किती आर्जवी—लाघवी. अहो, इनामदारांचं घर म्हणजे म्हणजे आमचं वंदनीय पूजास्थान. आमच्या घरच्या पोरीबाळींना आम्ही, त्यांचा कित्ता गिरवा म्हणून सांगत असतो. त्यांची वागणूकच तशी होती. दादासाहेबांच्या काळापासून आमचा त्यांचा घरोबा. थोरल्या आक्कासाहेबांनी सुद्धा तो टिकवला. धर्माजीला त्यांनीच मार्गाला लावलं आणि आता शिलूताईचं हे असं कसं झालं ?

(झंप्या प्रवेश करतो—त्याच्या पाठोपाठ मजूर).

इंजिनिअर—पुनः कशाला आला हा ! (मजुरांना) तुम्हा लोकांना दुसरा उद्योग नाही काय ? मला गेलं पाहिजे इथून. काय गणपतराव ! चलायचं ना आपण ! माझ्या जीपमधून पोचवतो तुम्हाला. माझ्या बदलीचा हुकूम येणार आहे लवकरच, तेव्हा म्हटलं पुनः जमायचं नाही, तेव्हा—

गणपतराव—काय आपली बदली होणार इथून ! अरे वा ! आजच बोललात आपण—कुठं होणार म्हणता—

[तो पुढं बोलण्याच्या आधीच—झंप्या—पुनः झटका आल्यासारखं बोलत सुटतो, जवळपास वरळतोच.

डॉक्टर—ह्या कामासाठी मला यावं लागेल अशी कल्पना नव्हती मला आक्कासाहेब.

आक्का—मला तरी कुठं होती. मी तुम्हाला दुसऱ्याच कामासाठी बोलावलं होतं. पण हिनं हे काय भलतंच केलं ! मला नाही वाटलं, हिला तेवढं धैर्य पण नाही. ही शांत नि अबोल माणसं अशी आतल्या गाठीची असतात. पण आता धोका टळला ना ! की—

डॉक्टर—आता बरं आहे. विष तसं जालीम नव्हतं. दोन इंजेक्शनांवर निभावलं. मी Strong Emitic दिलं नाही. त्यात जास्त धोकाच. होता. आता आत स्वस्थ झोपल्या आहेत. पण त्यांची फार काळजी घ्यावी लागेल तुम्हाला. तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आली आहे आक्कासाहेब. (थांबून) मला तुम्ही आधीच बोलावलं असतं तर... आजच्या काळात विशेष काही कठीण झालं नसतं !

आक्का—अहो पण, मला तरी आधी कळायला हवं ना ? विश्वास–विश्वास –अहो ह्या विश्वासनंच विश्वासघात केला. शिलूच्या हातून असं काही घडेल हे मला स्वप्नातसुद्धा खरं वाटलं नसतं. एक दिवस मी प्रत्यक्ष तिला पाहिलं. चक्क, ओकाऱ्या होत्या त्या गर्भारबाईच्या आणि मी तुम्हाला बोलावणं पाठवलं तुम्ही म्हणता ना त्यासाठीच. म्हटलं, आमची सारी प्रतिष्ठा धुळीस मिळायच्या आधी काही तरी इलाज करून पाहू म्हणून तुम्हाला बोलावणं पाठवलं. आणि मध्येच हे दुसरं संकट उद्भवलं. थोडक्यातच निभावलं म्हणायचं.

डॉक्टर—अजून म्हणता यायचं नाही, आक्कासाहेब.]

इंजिनिअर—मी जातो आता गणपतराव. हे ऐकवत नाही मला. हे शुद्ध black-mail आहे.

गणपतराव—(मालकाला) ही नोट घ्या मालक. खायला घाला ह्याला. म्हणजे पडून राहील मढ्यासारखा. चला साहेब. आधी तुमच्या क्वार्टर्सवर जाऊ, तिथून पुढं जाऊ. फार वाईट दिवस उजाडला आज.

इंजिनिअर—(कडवटपणे) हं चला, (जातात.)

[झंप्याला माल मिळतो. तो आधाशासारखा खात बसतो. मजूर आता साहेबांच्या टेबलावर येऊन बसतात.)

२ मजूर—मालक. एक कोप चहा. दोन बशा.

१ मजूर—हा साहेब काहून हबकला बा.

२ मजूर—तुले काह्यच्या पंचायती. चा पी. चा पीत जा नुसता. अन् झंप्याच्या बाता ऐकत जा. ह्या मोठ्या लोकाइच्या गोष्टी.

मालक—तुम्हाला पचायच्या नाहीत लेकहो. झंप्या, साल्या तू सैतान आहेस.

(पुन्हा अंधःकार–त्यानंतर प्रकाश–स्थळ तेच.)

१ मजूर—चा द्या, बिगी बिगी मालक, जलदी आहे आम्हाला. आज मोठा साहेब येनार आहे. काम बघायला.

२ मजूर— इस्पेक्शन आहे. छोटा साहेब बी थांबला आहे. त्याची त म्हने बदली झाली इथून.

मालक— इतक्या लवकर? अजून तर भट्टी चालू व्हायची आहे. अन् त्या साहेबाची तुमच्या......काही तरी गौडबंगाल आहे बाबांनो, त्याची बदली झाली की त्यानं करून घेतली?

१ मजूर— सारजेस तर सोडलं त्यानं.

२ मजूर—म्हंजी आता....आता आपल्या मालकाची काळजी मिटली.

मालक—बस करा फाजिलपणा.

(गणपतराव प्रवेश करतो.)

मालक—काय मालक, एक कप चहा देऊ फर्मासदार?

गणपतराव—चहा नको. मला जरा जल्दी आहे. तुम्हाला डॉक्टरांची गाडी दिसली का, बड्या बंगल्याकडे इकडून जाताना? तुम्हाला कळलं? (सगळे प्रश्नार्थक). शिलूबाई गेल्या आपल्या. (मजूर एकमेकाकडे सार्थ नजरेने पाहतात)

मालक—खरं? म्हणजे त्यांनी आपलं म्हणणं शेवटी खरं केलं तर...! पण काय हो ..(वाक्य मध्येच सोडून देतो. पुढे म्हणतो.) मला वाटतं...

गणपतराव आक्का मात्र धीराची बाई. दुसरी एखादी बाई असती

(त्यांचं वाक्य अर्धंच राहतं झंप्या झपाटल्यासारखा प्रवेश करतो, आणि झटका आल्यासारखा बोलू लागतो.)

झंप्या—[डॉक्टर—आक्का, मन घट्ट कर. शिलू गेली.

आक्का—(हुंदके देत.) डॉक्टर हे कसं झालं हो? शिलूनं हे कसं केलं?

डॉक्टर— (शांतपणे) तिच्यावर नजर ठेवायला मी सांगितलं होतं. तिनं आढयाला साडीचं एक टोक बांधलं. पिळयाचं दुसरं टोक तिनं गळयाला बांधून मवली गाठ आपल्या एका हातात धरून ठेवली होती. तू पाहिलंस ना सारं? खरं सांग. मी तुला पुरती ओळखतो. मी म्हणतीय् तसंच घडलं ना? तू पाहिलंस ना? खरं सांग.

आक्का—हो, मी पाहिलं.

डॉक्टर—तरी विचारतेस तिनं हे कसं केलं? हे नाटक कशाला?

आक्का—एवढयाचसाठी की मलाही अंत:करण आहे हे तुम्हाला कळावं म्हणून.

डॉक्टर--तिनं लाथेनं खुर्ची ढकलून देण्याचा आवाज तू ऐकलास. खरं ना ? पण लवकर धावली नाहीस. अंतःकरण असल्याचं हे चिन्ह का ? तिला दिवस गेले होते तुला ठाऊक होतं ?

आक्का—हो डॉक्टर. म्हणूनच ना तुम्हाला मी त्या दिवशी बोलावलं होतं. तिनं त्या दिवशी तो प्रकार केला. मला धैर्यच नाही झालं तुमच्याशी बोलण्याचं. (जरा वेळ थांबून.) आता कसं होईल हो डॉक्टर ? समाजात......ह्या पंचक्रोशीत आता ह्याचा बभ्रा होणार. (मन आवरून.) डॉक्टर, समाजात हे जाता कामा नये. तुम्ही सर्टिफिकेट द्याल ?

डॉक्टर—मी सर्टिफिकेट लिहून ठेवलं आहे.

आक्का—काय ?

डॉक्टर—सेरिब्रल हॅमोरेज. रात्री झोपेत मृत्यु आला.

आक्का—डॉक्टर, तुमचे उपकार जन्मोजन्मी फिटणार नाहीत.

डॉक्टर—मी तुमचा फॅमिली डॉक्टर आहे, मिस् इनामदार.]

गणपतराव—झंप्या, साल्या, गप्प बैस. केलीस तेवढी शोभा पुरे झाली. मालक, द्या त्याच्या हातात तो भजांचा पुडा. खा लेका, नी टळ एकदाचा.

[भजी तोंडात टाकतो. मजुरांच्या मागे जाऊन जमिनीवर बसतो, ते त्याला हाकलून लावतात-]

१ मजूर--आम्हाला बी काही मिळावं म्हणतो मी.

२ मजूर--म्हंजी आमची बी पोटं रिकामी आहे.

गणपतराव--(कठोरपणे) ठाऊक आहे ! झंप्या साला अर्धवट, पण तुम्ही पक्के बनेल आहात ठाऊक आहे मला. पन तुम्ही या गावचे आहात. सांगून ठेवतो. गोष्ट या कानाची त्या कानापर्यंत गेली तर याद राखून ठेवा. वरं का मालक. या दाराच्या मागे हातभट्टीची देवघेव होते. हे ठाऊक आहे मला. (एका मजुरास)—तुझ्या घरी हातभट्टी चालते गावाच्या टोकाला. अजूनपर्यंत फौजदाराला कळलं नाही हे. फौजदाराचे हात पोचण्याच्या आधी माझे हात पोचतील सांगून ठेवतो. काय मालक ? तुम्हाला काही सांगितलं पाहिजे असं नाही.

मालक--मला काय करायच्या आहेत ह्या साऱ्या पंचायती, गणपतराव ! अहो इथल्या पुलाचं काम संपलं की आमचं विंचवाचं बिऱ्हाडं पाठीवर.

गणपतराव--पण त्या आधी नांगी ठेचायचं काम आणू नका माझ्यावर.

१ मजूर--आम्हाला बी कळतं, गनपतराव.

२ मजूर—आम्ही कधी तुमच्या शब्दाबाहेर गेलो, गनपतराव ? शिवाय इनाम-दाराचं घर म्हणजे गावचं भूषण.

गणपतराव—नशीब ! तुम्ही लोकच आहात इथं हॉटेलात, नाहीतर कठीण होतं. झंप्या कुठं गेला साला ? तो ऐकायचा बियकायचा एखादं वेळी.

[एका बाजूने इंजिनिअर व दुसऱ्या बाजूने झंप्या प्रवेश करतात.]

इंजिनिअर—माझं इथलं काम संपलं. आज मी चार्ज दिला. तुमची जीप इथे दाराशी उभी दिसली. म्हटलं, तुम्हाला भेटून घ्यावं. इथे प्रवेश करतो तर हे ध्यान समोर.

झंप्या—चा–चा–चा. मना चा दे [इंजिनिअर जवळ जातो.]

इंजिनिअर—मालक, द्या याला चहा आज माझ्याकडून. चांगली आठवण राहील याची मला.

१ मजूर—आन भजाचा पुडावी. तो त त्याचा खुराक आहे जी.

इंजिनिअर—द्या भजांचा पुडा त्याला, मालक. [मालक देतो, तो भजांचा पुडा हाती घेतो, लाच मिळाल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसतो, आणि सर्वांसमोर येऊन झटक्यात बोलू लागतो.]

झंप्या—[शिलूताई—ही धनदौलत घेऊन काय चाटायची आहे ? (सगळे टवकारून ऐकतात) असं एकट राहायचं. भकास निष्प्रेम आयुष्य कंठा-यचं नी एकदा मरायचं. असं मला मरायचं नाही, असं मी मरणार नाही. मला बाळ हवं. माझ्या बाळाच्या मुरमुरत्या जावळाचा मुका घेत घेत मी मरेन. तुम्ही काहीच का बोलत नाही ? एवढा विचार कसला चालला आहे.

नवा आवाज—ते कसं जमायचं, शिलू. तुझ्या नी माझ्या वाटा वेगवेगळ्या आहेत. तुझी वाट बंगल्याची—मोठ्या लोकांच्या वस्तीची, माझी झोपडीची—गरीबाची. या वाटा कशा जुळणार ?]

गणपतराव—(मध्येच ओरडून) झंप्या, साल्या, काय बकतोस ? हे घे, हे घे, (त्याच्या अंगावर धावून जातो.) चोर साला. कुणाचं नाव घेतोस ?

[झोंबाझोंबीत मालक–मजूर झंप्याला पकडून ठेवतात. गणपतराव त्याला ठोसे लगावतो. झंप्या त्याला लाथेनं खाली पाडतो आणि पळून जातो. मजूर त्याच्या मागे धावत जातात.]

इंजिनिअर—गणपतराव, गणपतराव, हे काय ? हा कोणाचा आवाज ? त्याचा काय संबंध ?

गणपतराव—(धापा टाकीत.) काय सांगू तुम्हांला ? हा धर्म्याचा आवाज. माझ्या भावाचा—माझ्या धाकटचा भावाचा. हरामखोर, मात्रागमनी. कुठं बोलू नका साहेव, कुणाला सांगू नका. काय पाहणं माझ्या नशीवी आलं ! कुणाला दोष द्यावा आता ! धर्म्या, धर्म्या. आइनं तुला पाडून का नाही टाकला ! मी आता कुठं तोंड लपवू ? माझी नाचक्की झाली ! मी ठार झालो !

इंजिनिअर—शांत व्हा, गणपतराव ! शांत व्हा ! कुणाच्या हातच्या का ह्या गोष्टी आहेत ? पाठचा भाऊ ! तुम्हीच मागं म्हणाला होतात ना ! बहुरत्ना वसुंधरा ! अगदी खरं आहे. नाही तर तुम्ही कुठे अन् तो धर्माजी —तुमचा भाऊ कुठे !

[पडदा].

[आधारित]

डेस्डेमोना

कुंदा पारसनीस

त्या दिवशी, वाऱ्याने कागद उडावा तशा चालीने ती माझ्या घरी आली. टराटरा फाटणाऱ्या कागदाचे दुःख घेऊन आली.

" ...माई, सगळं असह्य झालंय्. सारखी भांडणं, भांडणं ! प्रेमाचं, शांतीच वातावरणच उरलं नाही घरात. "

" हिरा, तू जर भांडली नाहीस, गप्प बसलीस तर तो एकटाच भांडेल का ? आपण शांतपणा धरावा जरा — "

" भांडेल बाई भांडेल ! लोकांना तमाशा नको म्हणून परवा मी काहीच बोलत नव्हते तर म्हणाला, आहे कुठं बोलायला तोंड ? guilty conscience आणि आरडाओरडा केलान्. प्रश्नावर प्रश्न विचारून नुसता सतावीत असतो; जसा काही प्रत्येक मिनिटा–सेकंदाचा हिशेब घ्यायचाय् त्याला ! आता ऑफिसात जाऊन काम नको का करू ? "

" हिरा, इतकी अतिशयोक्ती बरी नाही. एकाद्याला नाही सहन होत बायकोचं मनमोकळं वागणं. आणि तू तरी विचारपूर्वक वागतेस का ? तुझं कधीच चुकत नाही ? तू – "

हिरा उत्तेजित स्वरात म्हणाली, " मला माहीत आहे तू कुठल्या संदर्भात बोलती आहेस ते. गेले मी नाटकाला तर बिघडलं कुठं ? काही एकटीच गेले नव्हते कुणाबरोबर. आमच्या स्टाफवरचे साताठजण मिळून गेलो होतो. आणि राघव दूरवर जातो तेव्हा अगदी सोवळ्यासारखाच वागत असेल, नाही ? "

" अशी उसळू नकोस. हे असं बोलण्यात काय अर्थ आहे, हिरा ? आपण थोडी पड खावी. घराच्या स्वास्थ्यासाठी नरमाईनं वागावं. " मला उपदेश चांगला साधतो !

खुर्चीवर पुन्हा बसत हिरा म्हणाली, " माई, मी नमून वागत नाही असं थोडंच आहे ? पुष्कळ सहन करते. ह्याची तिरपगडी बोलणी ऐकून घेते. एकटीलाच जिथं आमंत्रण असतं तिथं सहसा जात नाही. खरं सांगू माई, नाटक–सिनेमा बघताना काय किंवा नुस्तं फिरायला जाताना काय राघवच्या संगतीत मी जितकं enjoy करते तितकं एरवी करीतच नाही ! त्याच्याच बरोबर जायला मला नेहमी आवडतं. पण कधी कधी नाईलाज होतो, हे तो का समजून घेत नाही ? "

तिला शांत करून, समजावून मी तिला घरी पाठविले आणि त्या दिवसापासून माझे ते एक कामच होऊन बसले !

जगावेगळे जोडपे, जगावेगळे प्रेम करणारे. आदिमानवांमध्ये खपून गेली असती दोघे ! —एकमेकावर इतकी सत्ता गाजविणे केवळ तेव्हाच शक्य होते !

एक दिवस हिरा तणतणतच मला म्हणाली, " आता मला गोषाच पाळला पाहिजे. काल आमच्या ऑफिसातल्या राजेला अर्धा तास लेक्चर सुनावलं राघवनं ! म्हणे माझ्या बायकोला भेटायला तू रात्रीचा घरी आलासच का ! आता overtime केल्यानंतर वेळ झाला तेव्हा आला तो बिचारा ! मला मान खाली घालावी लागते अशानं."

" पण हिरा, तूसुद्धा येवढ्याश्या कारणावरून राष्ट्राण माजवतेस. राघवनं जीपमधून त्या बाईंना नेलं तेवढ्यावरून केवढी भांडलीस !"

" पण मला नाही सहन होत त्यानं दिवसचे दिवस त्या बाईबरोबर प्रवास करावा."

" तर मग राघवलाही वाटतं की—"

" --पण तो किती क्षुल्लक प्रसंगांवरून भांडतो ! इतका संशयी स्वभाव काय कामाचा ?"

" हिरा, हे बोलण्याचा काही अधिकार आहे का तुला ? असेल राघवाचा स्वभाव संशयी, पण तूही काही कमी नाहीस ! अग, काही काही गोष्टी सोडून द्यायच्या, मनाला लावून घ्यायच्या नसतात."

" कशा ग सोडून द्यायच्या ? म्हणजेच मन बोथट करायचं, प्रेमाला गुदमरवून टाकायचं ना ? मनावर घ्यायचं नाही, अशी बेफिकिरी साधते का खऱ्या ओढीला, प्रेमाला ?"

मी ह्यांच्या बाबतीत शांत, सहिष्णु होते, मला त्याचा अभिमानही होता. हा तिचा प्रश्न मला अर्थात् रुचला नाही. मी तिला बजावले, " तुम्ही दोघंही आपल्या प्रेमाची तऱ्हा जरा बदला आता. मोठे व्हा, लहान मुलासारखं वागणं पुरे झालं."

पण लहान मुलासारखे तरी कसे म्हणायचे ? इथे नव्हती श्रद्धा, नव्हता परस्परावर विश्वास. एकमेकांवरचे जीवापाड प्रेम जगविण्यासाठी प्रेमामधूनच केवळ शक्ती टिपलेली. स्वतःला फुलविण्यासाठी स्वतःचीच किंमत द्यायची असा विचित्र प्रकार होता इथे !

ऑफिसात कसलासा समारंभ होता. हिराला परतायला उशीर झाला. एका सहकाऱ्याच्या स्कूटरवरून तिला घरी येताना पाहून राघव संतापाने बेभान झाला.

कुणातरी आयागोने अगोदर कान भरलेलेच होते. "पुन्हा हिराशी लगट करशील तर तंगडी मोडून टाकीन. चांगले भांडणच जुंपणार. पण आम्ही मधे पडलो. हिराला एकीकडे हळूच म्हणाले, "तू तरी वेकाळल्यासारखीच करतेस. राघवचा स्वभाव तुला माहितीय् मग रिक्षा करून का नाही आलीस ?"

हिराचे लक्ष होते कुठे ? चमकणाऱ्या डोळ्यांनी, फुललेल्या चेहऱ्याने म्हणत होती, "नाहीतरी राघवचं भलतच प्रेम आहे हं माझ्यावर !"

त्या भलत्याच प्रेमाबद्दलच्या ह्या भलत्याच अभिमानाचे दर्शन घेऊन मी काढता पाय घेतला.

एक दिवस झोक्याने इकडची उंची गाठली. तापलेली हिरा मला म्हणाली, "आता अगदी सहन होत नाही ! अधून मधून चपराकही देतो आताशी. मुलांना घेऊन मी आपलं वेगळं बिऱ्हाड करून राहाते."

"राघव बरी परवानगी देईल ?" मी शंका काढली.

"परवानगीची काही जरूरी नाही. साऱ्या जगाला माहिती आहे—

"पण सारं जग काही तुला त्या बाबतीत मदत करणार नाही." माझ्यातली वकिलीणबाई बोलत होती. "कायद्याचा तर आधार नाहीच अन् कोण पडेल ग तुमच्यामधे ? एकेकदा हात पोळून घेतलेत—तुम्ही भांडता भांडता अन् शेवटी गळयात गळे घालून रडता, आणाभाका घेता ! हिरा ह्याला काही अंत नाही का ?" मी कळकळून तिला विचारले, "तुझ्या मुलांच्या मनावर काय परिणाम होतोय् याचा काही विचार ? संसार काय तुमचा दोघांचाच केवळ आहे ? मुलांच्याहि आयुष्याला तू बांधलेली आहेस. हा धांगडधिंगा बस्स झाला आता !

पण तो बस्स् झाला नव्हता. एका अपरात्री दारावरची घंटा वाजली आणि हिरवे निळे अंग घेऊन हिरा आली. "मला सोडव याच्या जाचातून. राघवबरोबर राहणं अशक्य आहे !" तोल सुटून ती रडत होती. डॉक्टरांना बोलावून, इंजेक्शन देऊन तिला जबरीने झोपविले. दोन दिवस ती आमच्याकडे होती. तिसरे दिवशी तिला न्यायला राघव आला आणि ती चालती झाली !

बरेच दिवस सारे शांत. ऑफिसात चौकशी केली तर हिरा दीर्घ मुदतीच्या रजेवर गेल्याचे कळले. तिच्या घरालाही कुलुप. मला अगदी चुटपूट लागून राहिली. "काय झालं असेल हिराचं ? राघव निवळला असेल, हिरा स्थिरावली असेल—बरं झालं ! ज्याचा शेवट गोड ते सारंच गोड !"

पण कुठेतरी अभिमान डिवचला गेला. "कमाल आहे हिराची ! मला तिनं बोटभर चिठ्ठीही लिहू नये ? तिच्यासाठी मानसिक ताण काय कमी सहन केला मी ?"

हे म्हणाले, "इतका विषाद वाटून का घेतेस ? तुझ्याकडून तू केलंस. ती सुखी झाली यात समाधान मान. पण मला विचारशील तर मला नाही वाटत त्यांच्या आयुष्यात काही बदल झाला असेल. सुधारणेच्या पलीकडची माणसं आहेत ही."

नंतर हिराचे एक पत्र आले, "राघव इथल्याच ऑफिसात कायम झाला आहे. मी मात्र तिकडे येऊन पुन्हा कामावर रुजू होत आहे. तुम्हाला भेटायला येईनच. दादासाहेवांशी खास काम आहे. माझी केस त्यांनीच घ्यावी अशी इच्छा आहे......"

माझ्या शब्दाखातर हे कबूल झाले. मी आनंदले. हिराचा छळवाद थांबणार. माझ्यामुळे, माझ्यामुळे. हा अहंकार मनाला सुखवीत होता. आणि राघव पुन्हा उपटला.

माझ्या डोक्याभोवतालचे वलय विरून गेले. मार्गदर्शकाचे आसन डळमळीत झाले. विपरीत घडू नये म्हणून हिराला बोलावणे धाडले. पण राघवपुढे तिला कशाचेच भान नव्हते.

—आणि मग बरेच दिवसांनी ती आली. आमचे गप्पामंडळ ऐन रंगात आले असतानाच झाली. मी तिला थोडचा अनिच्छेनेच गप्पात सामील करून घेतली. आणि इतर मैत्रिणी गेल्यानंतर मी तिच्याकडे नुसतीच बघत राहिले.

पिकुटलेली, पण धुंद डोळयांची, ताठर पण किंचित् वावरलेल्या वृत्तीची... खिडकीजवळच्या खुर्चीत बसून तिचा हातातल्या रुमालाशी एकसारखा चाळा चालला होता. पीळ घालीत होती, उलगडत होती, बोटाभोवती गुंडाळीत होती. हिला नक्की हवंय् तरी काय ? हिच्या कुरळ्या केसांइतकीच हिच्या मनाला नागमोडी वळणं आहेत ? आणि म्हणूनच तिला फाडफाड बोलावेसे वाटत असूनही मी गप्प होते. तिला मी उमजू शकत नव्हते. ही मूर्ख आहे की धूर्त —मला न कळणारे डावपेच खेळणारी ?

तिच्याविषयीच्या बातम्या ऐकून माझे डोके भडकून गेले. मदतीची याचना करायची आणि हिताचे सांगणे, वकिली सल्ला मात्र धाब्यावर बसवायचा ! तिच्या वागण्यातल्या या विसंगतीपाठीमागचे सूत्र काय असावे याचा अंदाज घेत मी तिला निरखीत होते. मागेही दोन दिवस राहून तिने अशीच माघार घेतली होती. माझ्या डोळयाला डोळा देण्याखेरीज तिने सारे काही केले. पातळाच्या निऱ्या नीट केल्या. खिडकीबाहेर पाहिले, कुशनवरचे डिझाइन हाताळले, शेवटी असह्य होऊन ती म्हणाली, "माई, बोल ना."

मी थंडपणे विचारले, "मी काय बोलावं अशी तुझी अपेक्षा आहे ?"

" काहीही बोल–विचार, मला रागाव, पण गप्प वसून बघू नकोस अशी. मी राघवला भेटले, कळलं असेलच तुला. पण, पण मी—"

" त्याला नुसतीच भेटली नाहीस—त्याच्या हॉटेलवर गेलीस, सिनेमाला गेलीस, बागेत हिंडलीस. आता मग इथं कशाला आलीस ? तुझा प्रश्न तू सोडवलेला दिसतोयस. आता काही आमची गरज नाही तुला—तू जाऊ शकतेस." मी तट्दिशी आतल्या खोलीत जायला वळले. जाता जाता टोला हाणलाच, " तेवढं कोर्टात भेटून यांना सांग मात्र !"

हात धरून अडवीत ती म्हणाली, " नाही, नाही माई ! मला असं तोडू नकोस. तुझ्याशिवाय मला कुणाचा आधार ?" तिचा स्वर कापरा झाला, डोळचात पाणी तरारले.

" तर मग तू अशी का वागलीस, ते मला सांग. ह्यांनी तुला काय सूचना दिल्या होत्या ? जेवणाच्या वेळी आज म्हणाले की त्या हिराबाईना समजाव, अशान केस वीक होईल. आणि तू तर बोलावणं धाडलं तरी तीन तीन दिवस तोंड दाखवीत नाहीस— "

तिची मुद्रा अगदी दीनवाणी झाली. माझा हात सोडून तिने तोंडावरून खसाखसा रुमाल फिरवला व तोच ओठावर दावल्यावर तिच्या हुंदक्यांना सुस्काऱ्याचे रूप आले.

बऱ्याच वेळाने —" दादासाहेबांना भेटून बोलायचंच आहे मला. पण अगोदर तुला. माई, मला काय करावं तेच सुचत नाही. इतके दिवस तू मला नेहमी सल्ला देत आलीस. सांग, आता मी काय करावं ? माझं मन द्विधा होतंय्. एकदा वाटतं ठरवलेल्या मार्गानं शेवटास जावं. पुन्हा वाटतं, हा मार्ग बरोबर आहे ना ? मी ठरविलं ते इष्ट आहे ना ? "

बोलता बोलता हिरा कापायला लागली. तिचा चेहरा पांढरा फटक पडला. तिला फिट तर येणार नाही ना या भीतीने मी तिला धरून खुर्चीवर बसविली. हातांचे तळवे डोळचावर घट्ट रोवून ती बसली. घट्ट मिटलेले ओठ मधूनच थरथरत होते.

" राघव आला, त्यानं बोलावलं म्हणून तू आपली त्याच्या पाठोपाठ गेलीस. अग हिरा, तुझ्या ह्या वागण्याचा काय परिणाम होईल विचार केलायस ? राघवबरोबर तू दोनतीन दिवस होतील. कितीकांनी तुला पाह्यलं. आता तो कोर्टात कुणालाही साक्षीला उभा करील. तुला घटस्फोट मिळू नये म्हणूनच तो इथं आला, त्याचा एक डाव आहे, एवढंहि तुला कळू नये ? तू आपली त्याच्याकडे धावलीस—"

" नाही माई, त्याचा असा काही एक हेतू नव्हता. माझ्याशिवाय जगणं याला अशक्य झालं म्हणून तो आला. त्याची भकास मुद्रा मला पाहवेना. "

" हिरा, हिरा ! तुला कसं कळत नाही ? तू देखाव्याला भुलू नकोस· मारपीट करणारा राक्षस, त्याच्या अघोरी प्रेमाची भूल तुला कशी पडते ? "

" प्रेमिकाला भूल कशी पडते तुला नाही समजत माई ? " माझा चेहरा निर्विकार होता. " माई मला वाटत होतं मी विसरू शकेन, मी वेगळी राहीन, पण सगळं फुकट आहे ! फुकट – फुकट "

" हिरा, थोडा विचार कर. तुझं हित तुला कसं कळत नाही ? "

" माझं हित मला कळत नाही. मला एवढंच समजतं, राघव आला आहे· त्याच्याकडे जायला हवं. त्याला आधार द्यायला हवा. माझी सारासार विचार-शक्ती नाहीशी होते. फक्त तो दिसतो, राघव ! शरीरातले, मनातले सगळे कण फुटतात, पेट घेतात. "

" हिरा शांत हो. खोटया भावनेच्या आहारी जाऊ नकोस. पूर्ण विचाराअंती तू हा मार्ग पत्करला आहेस ना ? मग नेट धर. "

" पण माई, कशासाठी नेट धरू ? शांत कशी होऊ ? ही भावना खोटी नाही ग माई. जरा कमी प्रेम केलं असतं तर थोडा थंडपणा आला असता. अलिप्त-पणे पाहता आलं असतं. पण इतकं उत्कट प्रेम असणं म्हणजे एक शापच आहे. कायावाचामनेकरून प्रेम करायचं म्हणजे वेगळेपण उरतच नाही. प्रीतीची ज्योत म्हणतात––आपणच ती ज्योत होतो नि कापरासारखं जळून जातो. फार यातना होतात ग. माझं मन आता माघार घेतंय्. मला सुख हवं. शांती हवी आणि राघवही हवा. छळ मला सहन होत नाही नि एवढंसदेखील द्वैत खपत नाही. "

" तर मग मर आता डेस्डेमोनासारखं " मी वैतागून म्हणाले. तिचे प्रेम माझ्या आकलनशक्तीच्या पलीकडचे होते. " तुझा मार्ग तू ठरव आणि काय ते नक्की कर. ह्यांना ऐनवेळी तोंडघशी पाडू नकोस. "

तिने ' केस ' काढन घेतली आणि मी अंग काढून घेतले. ती येते कधीमधी. आता मी आंधळी आणि बहिरी झाले आहे.

कथा :

अंतर

उद्धव ज. शेळके

क्लासेस सुटून पाच–पंधरा मिनिटं झाली होती. मुली आवारातून कधी-च्याच निथळल्या होत्या. आता शिक्षिकांनी सटकायला घेतलं होतं. दामले सरांवाचून न करमणारी शिरभाते हिय्या करून निसटली होती. मुलीला पळवून दामल्यांना फाटकाशी थांबवलं होतं. गति लपवत शिरभाते पळू लागली होती. रिक्षावाल्याची घाई दाखवत गोखलेनं विमलाबाईंकडून परवानगी मिळविली होती. नवरा स्कूटर वाजवत उभा असल्याचं दाखवत केळकर तळमळत होती. वाजपेयी-साठी साठेनं सायकल काढली होती. ज्यांना अशी काही ओढ वा तळमळ नव्हती, असली तरी नोकरीच्या धाकात चिरडली जात होती ती माणसं — शिक्षिका अजून विमलाबाईंभोवती घुटमळत होती. कुणाच्या शिकवण्यात काय दोष आहेत व त्याची कारणं काय वगैरे शिक्षणतज्ज्ञाच्या तोऱ्यात बोलत होती. पैकी क्षीरसागरला आपल्या वायकोला नोकरीवर लावून घ्यायचं होतं. दीक्षितला एम्. ए. साठी परवानगी हवी होती. वाचाळला बदली रद्द करवून घ्यायची होती. हातोलेला हायस्कूलमध्ये जागा हवी होती. पेंढारकरनं महाराष्ट्र सरकारच्या प. स. क. कडे अर्ज टाकला होता. डिपार्टमेन्टकडून त्याला संमति हवी होती. पण विमलाबाई-समोर आपल्या गरजांबद्दल उघड बोलण्याची कुणात हिंमत नव्हती. अगदी वेळा येऊन ठेपल्याशिवाय हे करण्याचं धाडस कुणास नव्हतं. तेही त्यांची अनास्था पत्करावी लागेल या धैर्यानंच करावं लागे. निदान विमलाबाईंचा दरारा त्यांना तसं रुखरुखवून जाई.

पंधरा–वीस मिनिटं झाल्यावर विमलाबाईंनी ऑफीस बंद करून झालं की काय ते पहायला सांगितलं. काय ते पुरतं ऐकण्यापूर्वी सारी माणसं हलायला लागलीत. काही तर खिडक्या–दारांच्या कड्या पाहून परतलीत. काहींनी कुलुपं ओढून पाहिलीत. काहींनी हे विमलाबाईपर्यंत तोंडानं पोचतं केलं. त्या निमित्तानं बाहेर पडलेल्या काहींनी आपापली वाहनं पाहिलीत. साय-कलमध्ये हवा आहे, नाही, ऑटोसायकलमध्ये पेट्रोल आहे, नाही—आपापला तांगा–रिक्षा बाहेर आहे, नाही, वगैरे. काही नुसती जागच्याजागी हलल्या-सारखी झाली. मग, किल्ल्यांचा जुडगा पर्समध्ये घालून चालू लागल्यावर

विमलाबाईसोबत चालू लागली. कु. दानेनं बळेच विमलाबाईंची छत्री घेतली होती. कर्णिकनं पिशवी घेतली होती. घ्यायला काही नव्हतं तरी पांडुरंग त्यांच्यासोबत चालत होता. एखाद्या शिक्षकासारखा आसपास रेंगाळत होता.

वाहन.ओलांडून बाई चालत होत्या. यात कुणालाही नवल नव्हतं. वाटलं तेव्हा ऑफीसमधून फाटकापर्यंत त्या अशाच चालत. मागून रिक्षा येत असे. त्या आत कधी बसतील याची तत्परतेनं वाट बघत असे. त्यासाठी त्या थांबल्या की थांबत असे. चालू लागल्या की चालत असे.

आता त्या चिंचेच्या झाडाशी थांबल्या होत्या. मुलींच्या पुंजक्याकडे पाहून विचारीत होत्या,

" का ग मुली, काय करताहात इथं अजून ? "

त्यात मिसेस् पाध्येच्या वर्गातल्या दोन मुली होत्या. तिच्या चोरट्या खाणाखुणांना दाद न देता त्या पाय पसरून बसल्या होत्या. विमलाबाईंना त्वरित जवाब आला नाही तेव्हा पाध्ये बोलली,

" त्यांचा तांगा यायचाय अजून !

" आणि का ग मुली— "

आता विमलाबाई पाय पसरलेल्या मुलींना म्हणत होत्या.

" इकडे या— "

पैकी एक स्कर्ट झटकून उभी झाली. दुसरी विमलाबाईकडे पाहण्याचं टाळत होती. विमलाबाईंनी पहिल्या मुलीला उद्देशून विचारलं,

" तुम्ही कोणत्या वर्गात आहात ? "

" माझ्याच— "

नाइलाजानं पाध्येला म्हणावं लागलं.

" सहावी क मध्ये — "

" आणि अशा मॅनरलेस वागतात ! "

" त्यांना पुष्कळदा सांगत्येय. पण त्या ऐकत नाहीत— "

" हे काय उत्तर असू शकतं ? "

विमलाबाई म्हणाल्या,

" वर तुम्हा लोकांबद्दल मी असं बोलले तर चालू शकेल काय ? "

सरावाप्रमाणं पाध्ये बोलली नाही. विमलाबाईंच्या तावडीत टिकण्याचा हाच उपाय होता. त्यांनी त्यांना पाहून मुली उभ्या राहिल्या नाहीत या कारणा वरून मुलींना मॅनर्स कशा शिकवाव्यात या विषयावरच व्याख्यान सुरू केलं. त्यात काहीसा शास्त्रोक्त भाग असला तरी बराचसा नुकत्याच दुखावल्या गेलेल्या अहंकाराचा चोथाही होता. कारण त्यांना कोणत्याही बाबतीतला एवढासासुद्धा

अपमान सहन होत नसे. या मानापायी त्यांनी लग्न टाळलं होतं. याच मानापायी त्यांनी खालच्या नोकऱ्या सोडल्या होत्या. त्यांना कळत वा नकळत असेल तिथल्या पुरुषजातीचा त्यांच्या मनानं कायमचा डूख धरला होता. जिथं पुरुषाशी अजिबात संबंध येणार नाही अशा जागेवर स्थानापन्न झाल्या होत्या. पुरुषजातीची ही चीड त्यांच्यात इतकी प्रखर होती की तीमुळं त्या फार अल्प वयात एका सरकारी हायस्कूलच्या हेडमिस्ट्रेस होऊन बसल्या होत्या. जिथं पुरुषाशी फारसा संबंध येत नव्हता. आला तरी तो कनिष्ठ या नात्यानं येत होता. त्यामुळं त्यांना आपला या जातीवरला सूड उगवता येत होता. विमलाबाई हे करीतही होत्या. मॅनर्स म्हणून शिक्षिकांना त्या ऑफिसात बोलून दाटत होत्या. नव्या मुलींना समजावून सांगत होत्या. पण शिक्षकाला वर्गातल्या वर्गात उधळत होत्या. हातात बांगड्या भरून घरी बसा, वगैरेपर्यंत बोलत होत्या. पुरुषजातीशी असं घालून-पाडून बोलण्यापलीकडे त्यांना कोणतेहि संबं नको होते. इतर वेळा हा प्राणी त्यांना दृष्टीसमोर सुद्धा नकोसा वाटे! यामुळं त्या ज्या शाळेत असत तिथं माणसाची कधीच नेमणूक होत नसे. बदल्या पुष्कळांच्या होत असत. वाटल्यास बढती मिळून. त्यासाठी विमलाबाईंनी मुलींना ड्रील्स शिकवल्या होत्या. गेम्स्चे पीरियड घेतले होते. एन्. सी. सी. च्या कमांडरपदाचा राजिनामा दिला होता. काही विवाहित शिक्षिकांचं तर असंही म्हणणं आहे की विमलाबाई त्यांचासुद्धा द्वेष करतात. अविवाहित प्रौढ कुमारिका त्यांना जवळच्या वाटतात. विवाहित स्त्री त्यांना कलंकित वाटते. दिवस गेलेल्या कुमारिकेकडे बघावं तशा, काहीशा चिडक्या व काहीशा कीवभरित नजरेनं त्या एखाद्या सौभाग्यवतीकडे बघतात. 'बायांनो एवढी ही हौस असण्याचं त्यात काय आहे?' असं त्यांना म्हणायचं असतं.

या सर्वांतून विमलाबाईत केवळ पुरुषजातीचा तिरस्कार आहे असं म्हणता यायचं नाही. कदाचित् असं म्हणता येईल की स्त्रीशी त्याच्या संबंधाची घृणा आहे. त्या अवस्थेतली स्त्री त्यांना अपमानित वाटते. पुरुष वरचढ वाटतो. या तफावतीमुळं दोघात सम प्रमाणात सुखाची देवाण घेवाण होत असेल, असं त्यांना वाटत नाही. स्त्रीला पुरुषाइतकं सुख मिळत असेल, असं त्यांना वाटत नाही. तेच पुरुषाला त्याच्या वरचढपणामुळं दुपटीनं मिळत असावं असं त्यांना वाटत आलं आहे. या बाबतीत प्रत्यक्ष काही अनुभव नसल्यामुळे त्यांना तसं वाटत असावं. एखाद्या जन्मजात मानसिक विकृतीचा हा परिणाम असावा. आपल्या स्त्रीत्वाबद्दल त्यांना भारी संताप आहे. यातून म्हणजे पुरुषविषयक हेव्या-तून त्यांचा पुरुषद्वेष जन्मला आहे. इलाज नाही म्हणून केस-कपड्यांपुरत्या त्या स्त्री आहेत. विद्रूप दिसल्या नसत्या तर त्यांनी पुरुषाइतके केस ठेवले असते. पॅन्ट-मनिला घातला असता. पण निसर्ग त्यांना आहे तसेच ठेवत आहे.

निकटवर्तीयात त्या आपली मानसिक उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करतातच. अंतर जाणवणार नाही अशा बेतानं त्या पुरुषांशी वागतात. क्लबात जातात, टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, पत्ते खेळतात. अश्लिलातल्या अश्लील सिनेमात हातावर हात टाकून बसतात. पानं खातात. कित्येक पुरुषसुद्धा ओढत नाहीत म्हणून फक्त त्या सिगरेट ओढत नाहीत. पिण्याबद्दलसुद्धा हेच कारण सांगतात. खरं तर नशेत भलतंसलतं ओढवू नये म्हणून त्या त्यापासून जपतात. स्त्री–पुरुषसंबंधविषयक कोणत्याही विषयावर त्या हव्या तितक्या बोलतात. स्त्रीला संकोचून एखाद्यानं एखादा शब्द उच्चारण्याचं टाळलं की त्यांना अपमान वाटतो. तो भरून काढण्यासाठी त्या, तो शब्द कधी कधी तर फार भडकपणानं वापरतात. आम्हीही काही कमी नाही, हे दाखवून देतात.

हे सारं असलं तरी पुरुषांशी त्या ओळखून वागतात. काझीसारख्या एखाद्यानं डोळ्यातल्या सूक्ष्मातिसूक्ष्म भावावरून स्त्री जोखावी तसं त्या पुरुषाचं अंतःकरण ओळखतात. स्वतःच्या अजाणतेपणे, पण त्याला जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही इतक्या स्पष्टपणानं त्या वागायला घेतात. कधी कधी तोडून लावतात. इतराशी अधिक लगटीनं वागताना दिसतात. त्यांची सोसायटी हे समजण्याइतकी सहज 'हाय' असल्यानं विमलाबाईंवर पुढलं काही गुदरत नाही. कित्येक तर त्यांच्या अपमानातून बचावल्याच्या समाधानावर जगतात. कारण त्यांना प्रतिष्ठा प्राणाइतकी प्रिय असते. बहुधा अधिकच.

याच कारणानं त्या पुरुषाइतक्या स्वतंत्रपणे विन्हाड करून राहात असाव्यात. स्वयंपाकीण किंवा चपराशानं दाखवलेली सोबत त्यांना अपमानास्पद वाटते. वेळ पडली तर गुंडाचा मुडदा पाडण्याची धमक मनगटात असल्याचं त्यांचं तारुण्य बोलून जातं. असं असलं तरी सोबत दाखविणाऱ्याच्या हेतूवर त्या चिडतात. आपल्यात सोबत दाखविण्याची उणीव त्यांना जाणवावीच का असा विमलाबाईंना सवाल पडतो. तो त्यांचं एखाद्या पुरुषानं नसेल खाल्लं इतकं डोकं खातो. कधी कधी त्या इतक्या संतापतात, इतक्या संतापतात की दुसऱ्या दिवसापासून सूट–कोट घालून जगत राहावं असं त्यांना वाटतं. यामुळं एकदा तर त्यांनी परदेशातील लिंगपरिवर्तनविषयक ऑपरेशन्सवर डॉक्टरांशी चर्चा केली होती. हेतूचा थांगपत्ता लागू न देता, त्या वाचलेल्या बातम्यांवर तासभर चर्चा करीत बसल्या होत्या.

आता विमलाबाई नेहमीच्या रुबाबदारपणानं, पुरुषी ताठ्यात आपल्या बंगल्याशी उतरल्या होत्या. काशीबाई त्यांचं सामान घ्यायला रिक्षाशी धावत आली होती. त्यांना आतकडे चालवत बोलत होती,

"मी कधीपासनं तुमची वाट बघत आहे—जराभर नसत्या आल्या तर शाळेत येत होती— "

नि त्या कारण विचारू लागण्यापूर्वी नीच म्हणाली,

" एक साहेब आले आहे...ही चिठ्ठी लिहून ठेवली त्यांनी...रात्री जेवायला येतो म्हणून सांगून गेले मला. म्हणून भाजीचं आणायचं होतं — "

विमलाबाईंनी विनायकरावांची चिठ्ठी वाचली, सदर गृहस्थ त्यांच्या थोरल्या वहिणीचे यजमान. आता कमलाबाई हयात नव्हत्या. नंतर त्यांनी वय असून दुसरं लग्न केलं नव्हतं. दोन मुलांना वाढवत ते जगत होते. मिलिटरीत मिळवून ठेवलेला पैसा त्यांना बसून खाण्याइतका पुरेसा होता. दुसरं लग्न न करण्याच्या कारणानं असावं अगर मुलाच्या दुव्यामुळं असावं विनायकरावांचे संबंध विमलाबाईच्या घराण्याशी पूर्ववतच जखडले राहिले होते. ते विमलाबाईंच्या, आता भारतभर विखुरलेल्या नातलगांकडे अधूनमधून ये–जा करीत होते. उन्हाळ्याच्या सुटीत तर ते मुलं घेऊन कधीहि व कुठंहि टपकत असत. यात स्वतःला व मुलांनाहि विरंगुळा मिळतोसं त्यांचं म्हणणं असे. शिवाय लग्नापूर्वी त्यांनी विमलाबाईंना मागणी घातली होती. आपल्या स्वभावाप्रमाणं विमलाबाईंनी त्यांना नाकारल्यावर त्यांनी कमलाबाईशी लग्न केलं होतं. नाकारतांना त्यांना दुखावणं टाळण्यासाठी विमलाबाईंनी स्वतः कमलाबाईपेक्षा लहान असल्याचं कारण सांगितलं होतं. मोठ्या वहिणीचं लग्न आधी व्हावं हे सर्वांनी मान्य केल्यावर विनायकरावांना विमलाबाईचा नाद सोडावा लागला होता. पण कमला-बाईशी लग्न झाल्यावर या घराण्याशी त्यांचा आलेला संबंध अजून कायम होता. काही लोक म्हणत, तो अधिक वाढलेला आहे. काही म्हणत विमलाबाईचं लग्न झाल्याशिवाय तो सुटायचा नाही. तर विनायकराव म्हणत मिलिटरीतून डिस्चार्ज घेतल्यामुळं त्यांना सवड मिळते. वेळा घालविण्यासाठी ते कुठं तरी जावं म्हणून या घराण्याशी संपर्क ठेवतात. पण विमलाबाईकडे, त्या एकट्या राहायला लागल्यापासून पहिल्यांदा येत होते. चिठ्ठीत त्यांनी जेवायला वगैरे येतो असं लिहून ठेवलं होतं. आता ते इथल्या कुण्या मित्राला भेटायसाठी म्हणून बाहेर गेले होते.

चिठ्ठी वाचल्यावर अगदी प्रथमतः विमलाबाई विनायकरावांवर भडकल्या होत्या. त्यांना लॉजवर वगैरे उतरायला काय झालं ? भेटीचा इतका पुळका एकदम का आला ? आता, तुम्हा–आम्हात संबंधच ते काय, वगैरे सवाल मोहळासारखे त्यांच्या डोक्यात उठले होते. पण क्षणभरात यात त्यांना दुबळेपणा वाटू लागला. तो कदाचित् विनायकरावांच्या सभ्यतेचाही परिणाम असावा. त्या निर्भय झाल्या. त्यांच्या स्वभावातल्या दुसऱ्या बाजूनं एकदम उचल खाल्ली. वेळाच. आली तर हात–मनगटाशी संबंध आणण्याइतक्या त्या मनानं नीवर होऊन बसल्या आपल्यातल्या स्त्रीत्वाला अजिवात बाजूला ठेवून त्यांनी वेळा निभावून नेण्याचा निश्चय केला. त्या एकाएकी आनंदित झाल्या व त्या भरात काशीबाईला म्हणाल्या,

" अग, एवढ्यासाठी माझी वाट बघण्याची काय गरज होती ? काहीही घेऊन जायचं होतं भाजीसाठी–"

विमलाबाईसाठी चहा टाकत ती म्हणाली,

" मला वाटलं होतं तसंच. पण तुम्हीच सांगितलं ना की पाहुण्यासाठी त्यांच्या आवडीचा स्वयंपाक करायला हवा असतो ?"

" मग, त्यांनाच विचारायला हवं होतं––"

" विचारलं––"

काशीबाई म्हणाली,

" पण ते म्हणाले, तुम्हाला सर्व माहीत आहे––"

क्षणभर विमलाबाई बोलल्याच नाहीत. मग आपल्या नव्या पवित्र्याची आठवण घेताच म्हणाल्या,

" तर ! मी प्रत्येक पाहुण्याला काय आवडतं त्याची नोंदच तर करून ठेवली आहे ! माणसाची जात ही मूर्खच..."

मग काशीबाईसारखीपुढं काय बोलायला नको ते त्यांना आठवलं. पण स्वरावर मात्र त्याचा परिणाम झाला नाही. कारण त्या म्हणाल्या,

" जा, आणि तुला हवं ते ये घेऊन लवकर !"

काशीबाई गेल्यावर विमलाबाई बैठकीत आल्या. मर्यादित, पण कलात्मक सजावटीच्या त्या बैठकीतल्या स्वतःच्या खुर्चीत बसल्या. टेबलवरली मासिकं चाळू लागल्या. तशात त्यांचं लक्ष विनायकरावांच्या सामानावर गेलं. ते सर्व्हिस-वर असताना वापरीत त्या मोठमोठाल्या ट्रंकांची थप्पी तिथं पडली होती. वर करड्या–हिरव्या रंगाचं होल्डॉल होतं. जवळ जवळ प्रत्येक वस्तूवर 'कॅप्टन विनायक पटवर्धन' ही अक्षरं लिहिली होती. ती विमलाबाईंना नवलात पाडत होती. अशा थाटात विमलाबाईंनी विनायकरावांना कित्येक दिवसात पाहिलं नव्हतं.

अर्ध्या-पाऊण तासात एक जीपगाडी दाराशी थांबली. विनायकरावांना अंगणात सोडून निघून गेली. टाटा–बाय–बाय करून. तेव्हा कुठं विमलाबाईंना विनायकरावांच्या मित्राला आत घ्यावंसं वाटलं. पाहुण्याच्या पाहुण्याचं स्वागत हाहि एक मॅनर्सचा भाग वाटला. पण आता वेळा गेली होती. तथापि विनायक-रावांशी बोलायला काही तरी विषय हवा होता. एकाएकी इथं कशाला आले म्हणून विचारणं कसं काय दिसेल ? त्या म्हणाल्या,

" कुणाची होती गाडी ?"

" मिरासदारांची. माझे मिलिटरीतले स्नेही आहेत. इथं डॉक्टर आहेत–"

विनायकराव थांबल्यासारखे झाले. खरं तर अडले. विमलाबाईंना 'तुम्ही' म्हणावं की 'तू' म्हणावं यावर. पूर्वी ते सगळ 'तू' म्हणत. नात्याचा फायदा घेऊन. आता, विमलाबाईंचा रुबाब पाहून असेल—मिलिटरीतले असूनही विचार करून बोलले,—

"तुमची त्यांची ओळख नाही ?"

"नाही. राहतात कुठं ?"

"आश्चर्य आहे—"

विनायकराव विनोदात शिरले.

"कुमारिकांची तर शहरातल्या सर्व डॉक्टर्सशी ओळख असायला हवी."

विनायकराव मोठ्यानं हसत सुटले. याला महत्त्वाचं कारण म्हणजे आपला विनोद अलीकडल्या विमलाबाईंना रुचतो की नाही, ते ताडण्याचं होतं. विमलाबाईंना ते जाणवलं. त्यांनी नवा पवित्रा घेतला. विनायकरावांपेक्षा मोकळेपण दाखवत त्या म्हणाल्या,

"हवी, पण असल्या भुक्कड डॉक्टरांशी काय उपयोग ? जे डिस्चार्ज घेताना पोटासाठी पुढली काही तरतूद व्हावी म्हणून अधिकाऱ्यांकडून प्रॅक्टीसचा परवाना घेतात ?— "

"मिरासदार तसे नाहीत— "

"तुमचे मित्र असून ?"

"म्हणजे ?"

आता विनायकरावांच्याच आंगलट आलं होतं,—

"तू मला समजतेस काय ?"

"होते, तसेच— "

वर दिसत नसलं तरी विनायकरावांचं बोलणं अखडलं गेलं होतं. पण पाहुण्याला असं दुखवून चालणार नव्हतं. प्रथम विमलाबाईंचा तो हेतू नव्हता. सारं ओघात झालं होतं, तोच ओघ कायम दाखवत त्या म्हणाल्या,

"त्यांच्याकडे तुम्ही गेला कशाला होतात ?"

"अं— "

मग ते म्हणाले,

"अनायासे इथं आलो होतो. तेव्हा म्हटलं, बघावं त्यांनाही कॉल आला की काय ?"

"म्हणजे तुम्हाला परत कॉल आला आहे ?"

"बहुतेक सर्वांना..."

"या वयात तुम्ही तिथं काय करणार ?"

" म्हणजे ? "

वयाचा उल्लेख त्यांना परत लागला.

" मी साठी ओलांडली असं तुला वाटतं काय ? "

" तसं नाही. तितकी वर्षं सर्व्हिस झाली नि नंतर इतकी वर्षं बाहेर होतात म्हणून म्हणते... "

" तुझा हेतू मला कळत नाही.

ते प्रयत्नानं बोलले.

" पण माझा सांगतो. आता जगतो, असं जगण्यापेक्षा उरलेलं आयुष्य ज्या सरकारनं एकेकाळी आयुष्याची बेगमी करून ठेवली आहे, त्या सरकारच्या कामी आणलं तर काय हरकत आहे ? "

" स्वतःहून येतो म्हटलं होतं तुम्ही ? "

" हो. "

नि ते त्यांच्याकडे बघत म्हणाले,

" मग इथं जगून करायचं काय ?"

" मला हेच सांगायला तर नाही आलात ना तुम्ही ?"

" काय गरज आहे ? आधी सांगितलं आहे पुष्कळदा—"

" तेच म्हणतेय !"

" वाटेवर, दिल्लीच्या तू होतीस म्हणून म्हटलं घ्यावं ब्रेक जर्नी–कदाचित् शेवटलीही भेट ठरेल. शिवाय इथं आल्यापासून तुला पाहिलं नव्हतं. आलो तर काही वाईट तर नाही केलं ना ?"

" मुळीच नाही—"

कळत असावं वा नकळत असावं त्यांनी विषयाला कलाटणी दिली,

" कमलला जाऊन आज इतकी वर्षं झाली असतांना तुम्ही आम्हा लोकांशी जो संबंध कायम ठेवला आहे तो फार क्वचित् लोक ठेवतात...वसंतला भेटलात की नाही ?"

" नाही. एवढ्यात कलकत्त्याला जाणंच झालं नाही—"

" प्रभाकरकडे ?"

" तिकडेही गेलो नाही. "

" अस्सं—"

आता ती म्हणाली,

" सुभाष–सरोज कशी आहेत ?"

" आहेत—"

ते कसेबसे म्हणाले,

" त्यांच्यासारख्यांनी रहावं तसं—"
" ठेवलं कुठं त्यांना ?"
" कॉन्व्हेन्टमध्ये ठेवलं आहे सध्या—"
" अण्णांकडे का नाही ठेवलं ?"
" म्हटलं, उगाच कशाला कुणाला त्रास द्यावा—"
नंतर ते लगेच म्हणाले,
" शिवाय सध्या परीक्षा जवळ आल्या आहेत—"

" नंतर तरी त्यांना अण्णांकडे ठेवा. नाही तर उगीच आबाळ व्हायची बिचाऱ्यांची !"

" ती तर आमच्या नशिबालाच लागली आहे.
ते थांबले व म्हणाले,
" की नाही ?"
" अं. .अहो, सर्व गोष्टी ईश्वराच्या हातात असतात !"
" नाही. मनुष्य धूर्तपणानं त्या ईश्वरावर सोपवत असतो.
" बरं—"
ती एकदम उठताना म्हणाली,
" मला वाटतं, तुमच्या जेवणाची वेळा झाली असावी. चलायचं ना ?"

त्यांना उठावं लागलं, विमलाबाईनं काशीबाईला वाढण्याची घाई केली. उशीर पाहून चिडक्याशा झाल्या. शेवटी ती जेवायला बसलीत.

जेवतानाच विमलाबाई फार विचारात गढल्या होत्या. स्वयंपाकात काही चुकलं नसलं तरी काशीबाईवर धाक राहावा म्हणून त्या स्वयंपाकाबद्दल नेहमी अकारण करायच्या ती कुरबुर करीत नव्हत्या. पाहुण्याच्या ताटातलंही हवं–नको ते काशीबाईलाच बघावं लागत होतं. स्वत: काय खाल्लं ते त्यांना जेवण होईपर्यंत आठवेनासं झालं होतं. त्यांच्यातल्या ह्या घुमाकुळाची कोंडी सारं आटोपल्यावर, अगदी सहजगत्याच काशीबाईनं फोडली. बोलावं की न बोलावंशात बोलून बसली,—

" बाईसाहेब, तुमचं अंथरूण कुठं टाकायचं ? "
" कुठं म्हणजे ? "
परत, नवा तकलादू पवित्रा घेत त्या म्हणाल्या,
" नेहमी कुठं असतं ? "
" तसं नाहीजी— "
काय बोलावंशा गोंधळात ती म्हणाली,
" पाहुणे आहेत म्हणून म्हणतेय— "

त्यावेळी विमलाबाईंना वाटलं, बैठकीतले विनायकराव आपल्याकडे बघताहेत. हेतूपूर्वक खकारताहेत. निदान ओठांच्या छद्मी पुंगळीतून धुराचे गोळे सोडताहेत की पोकळ वर्तुळं ? एकामागून एक ? त्या आणखी टणक झाल्या. मुद्दाम म्हणाल्या,

" म्हणून काय झालं ? "

नि त्या एकदम बैठकीत पोचेल इतक्या मोठ्यानं म्हणाल्या,

" तेहि माणूस आहे व मीहि माणूस आहे— "

' म्हणजे काय ? ' त्याच गोंधळात पडल्या. याचा अर्थ काय घेता येईल ? इतकं धावरून चालायचं नाही,

" अग, बघत्येस काय अशी ? म्हटलं जा, माणूस माणसाला घातक नसतो म्हणून ? काही खात नाही. टाक माझं नेहमीच्या ठिकाणी... "

" आणि साहेबांचं ? "

' काय बावळट बाई आहे ! ' पण हाहि प्रश्नच आहे. विमलाबाई बैठकीच्या दारात आल्या. बोलावं न बोलावंशात म्हणाल्या,

" तुम्ही झोपणार कुठं आहात ? "

" अँज यू प्लीज— "

" व्हाट् डू यू मीन ? "

" आय मीन अॅट् यूवर कन्व्हिनियन्स— "

ते सहजपणे म्हणाले,

" तुला नको तर मी एखाद्या लॉजमध्ये जाईन. हवं तर मिरासदारांकडे व्यवस्था करेन. "

" मला इतकं लेचंपेचं समजता ? "

त्या भडकल्यासारख्या बोलल्या,

" मी विचारते, तुम्हाला अधिक कंफरटेबल कुठं, हे सांगा--

काय व कसं बोलावं ते विनायकरावांना प्रयत्नानंही कळवून घेता येईना. त्यांनाहि आपण काय बोलतो ते तितकंसं कळत नसावं. प्रयत्नानं ताळ्यावर राहात विमलाबाई म्हणाल्या,

" बैठकीत चालेल ? "

" हो. अंगणात देखील चाललं असतं. पांघरायला खूप आहे माझ्यापाशी— "

" छान. त्यामुळं मानवी जातीतल्या तफावतीचं चांगलं प्रदर्शन होईल— "

" ते आहेच मुळी ईश्वरानंच मांडून ठेवलं आहे. कपड्यालत्त्यापासून तर आवाज–भावनांच्या प्रदर्शनानं. तफावतीनं—

" मानल्याला— "

" समजा— "

" तर मग इथं टाकायला लावू ना तुमचं अंथरूण ? "

नि ते बोलण्यापूर्वी त्यांनी काशीबाईला हुकूम फर्मावला. अंथरूण टाकून झाल्यावर कधी नव्हे ते––कदाचित् काही जाणवूनमुद्धा असेल, विमलाबाईंना विचारलं,

" बाईसाहेब, मी जाऊ घरी ? "

विमलाबाई परत भडकल्या,

" रोज विचारीत असतेस काय ? "

" तसं नाहीजी— "

" मग चालायला लाग— "

याचा अर्थ त्या बाईनं विमलाबाईंना 'घाई' झाली असा लावला. कधी नव्हे त्या तडकाफडकी ती बाहेर पडली.

विनायकराव बैठकीत व विमलाबाई मधल्या घरातल्या कॉटवर पडल्या होत्या. बंगल्याच्या टोकावरली सारी दारं बंद होती. काही काशीबाईनं व शेवटलं स्वतः विमलाबाईंनी बंद करून घेतलं होतं. ते करताना त्यांची हिंमत पणास लागली होती. खरं तर हिंमत ही काय बाब आहे, हे त्याच क्षणापासून त्यांना कळायला लागलं होतं. या जाणिवेनं त्यांना विनायकरांवाशी बोलू दिलं नव्हतं. बोलत बसवलं नव्हतं. जांभया झाडीत त्या आत गेल्या होत्या. गरज नसताना चारीकडनं पांघरूण दाबून झोपल्या. कॉटवर पडल्या होत्या. डोळे, ऑपरेशनसाठी येणाऱ्या डॉक्टरांसाठी ठेवावेत त्या धाकधुकीनं उघडे ठेवले होते. पाणी येईपर्यंत पापणी हलवली जात नव्हती. विनायकरावांनी कड फेरला की त्या सावरून घेत होत्या. सिगरेट ओढायला त्यांचा उठल्याचा आवाज आला की त्या ताडकन् उठून बसत होत्या. हातांची घडी तर आरंभापासून माठल्यासारखी छातीवर आवळली होती. जशी तीत त्यांनी आपली अब्रू आवळून धरली होती.

एवढ्यानं निभेना किंवा हे सोसवेना तेव्हा त्या उठत. कधी बाथरूमकडे जात. कधी त्यांना दुधाचं उघडं असल्याचं आठवे. कधी तुपाचं खाली राहिल्याचं लक्षात येई. कधी घड्याळाला चावी भरायची राहिली असे. मनगटाच्या. कधी वाचावं असं वाटे. कधी लिहावसं वाटे. यापैकी त्या काय काम करीत कुणास माहित–पण त्या निमित्तानं उठल्या असताना कॉटवर जाण्यापूर्वी दाराच्या कोपऱ्यातून बैठकीत बघून घेत. हे एकदा, कदाचित् सर्वचदा असावं. विनायक-रावांच्या लक्षात आल्यावर ते म्हणाले होते,

" हवं तर मधलं दार बंद करून घे––"

" का ?"

त्या संतापून म्हणाल्या होत्या. कदाचित् विनायकरावांनी यापूर्वी आपल्याला असं पाहताना अनेकदा पाहिलं असल्याचं त्यांच्या लक्षात नसावं,

" मला काही कुणाची भीती नाही. माणूस काही माणसाला खात नसतो–"

अन् घाईघाईनं बोलणं तोडून त्या कॉटवर येऊन पडल्या होत्या. पूर्वीपेक्षा अधिक सावधपणानं. कारण आता त्यांचं डोकं पूर्वीच्या पायथ्याकडे झालं होतं. विनायकरावांच्या दारावर डोळे होते. जे त्यांच्यापूर्वी त्यांची पडछायाही आत येताना सहज पाहू शकले असते.

अडीच–तीनला विनायकराव घोरू लागले. पंधरा मिनिटं घोरणं ऐकल्यावर ते नाटक करीत नाही, याची विमलाबाईंना खात्री झाली. आवाज चोरीत त्या कॉटवरून उठल्या. वाजणार नाही या बेतानं दार लोटलं. कडी घातली. मग कुठं त्यांना निवांतपणे झोप लागली. कॉटवर पडतात–न पडतात तर.

उन्मळ

मनोहर तल्हार

पावसाचा जोर खूप वाढतो. तडातड् सरी कोसळू लागतात. समोरच्या डांबरी रस्त्यावर सरीतून मोठमोठी फुले फुटून वाफेत विलीन होतात. वातावरणात पांढुरक्या धुक्याचा थर अधिकाधिक गडद होत असल्याचे त्याला जाणवते. समोरच्या काचेवरून बांध फुटल्यागत ओघळ ओघळू लागतात अ णि समोरची काच पुसणाऱ्या पट्टया वेगानं इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरत असूनही रस्त्यावरले नीट न्याहाळणे त्याला कठीण जाऊ लागते.

तो गाडीचा वेग कमी करतो. घड्याळात बघतो. दोन पंचेचाळीस. दीड–पाऊणे दोन तासात त्याने बरेच अंतर कापलेले असते. याच वेगानं तो जाऊ शकता तरच तासाभऱ्यात नागपूरला पोचण्याची शक्यता असते. पण हा पाऊस मध्येच इतका वेग घेतो.

तो निघतो तेव्हा आकाश स्वच्छ असते. तळेगावला प्रथम जोरदार मेघ-गर्जना आणि विजेचा लखलखाट बघून तो थोडा नाउमेदच झालेला असतो. आणि पुढे तर पावसाने चांगलेच गाठलेले असते.

आणि आता गाडी चालविणेच कठीण झालेले असते. दुपारी चारपर्यंतच शर्मिला बालकमंदिरात असण्याची शक्यता. नागपुरातही पाऊस असाच सुरू असेल तर तिचे बालकमंदिर निश्चितच बंद असणार. आणि ते तसे असले तर ही खेप फुकट जाणार. अगदीच फुकट. तिला कसे गाठावे ?

जोरदार कोसळणाऱ्या पावसावर तो रुष्ट होतो. मैल दीड मैलानंतर कोंढाळी लागते. तिथे तो गाडी थांबवितो. गाडीची तावदाने बंद असल्याने पावसाचा तसा उपद्रव होत नसतो. परंतु आत आता कोंडल्यासारखे वाटते. जीव गुदमरल्यासारखा होतो. काय करावे काही सुचत नाही.

जीव कासावीस होतो म्हणून तो थोडा सरकून पलिकडल्या फाटकाचे ताव-दान किंचित्से खाली सरकवितो तसे पावसाच्या सपकाऱ्याने त्याची कोपरापर्यंत टेरेलिन शर्टाची बाही ओली होते. तो तावदान तसेच मोकळे ठेवतो. तेवढयाच भागातून गार हवा मुसंडी मारून गाडीत घुसते आणि त्याला एकदम बरे वाटते.

गार गार वारा त्याला हवाहवासा वाटू लागतो. शर्टाची दोन–तीन वटने तो मोकळी करतो. गार वाऱ्याचा झोत छातीवर झेलतो. मनगटावरली बाहीची वटने मोकळी करून तो बाही दुमडून घेतो. वाऱ्याच्या सपकाऱ्याने त्याला उल्हसित वाटू लागते. तो पँटमधून सिगारेट—केस काढतो. तीतली एक सिगारेट ओठात दावून तो ती लाईटरने पेटवितो. अमरावतीहून निघाल्यापासून प्रथमच तो सिगारेट ओढतो. सिगारेटच्या एकदोन दमाने त्याला तरतरीत वाटू लागते. चहाची तल्लफ आवरेनाशी होते.

तो मोठ्या उत्कटतेनं सिगारेट ओढू लागतो. समोरच्या काचेतून वघतो. पावसाचा पूर्वीचा भर आता ओसरू लागलेला असतो.

सिगारेट संपते. पाऊसही थांवतो. एकाएकी. आणि त्याला हायसे वाटते. पाऊस थांवलेला असतो परंतु कणाकणांची वारीक भुरभुर सुरूच असते.

तो झपाट्याने दार उघडतो. जमिनीवर सारा चिखल झालेला असतो. त्याची पर्वा न करता तो तडक तिथल्या एका हॉटेलात शिरतो. खुर्चीत वसतो.

पोऱ्या धावपळ करतो. एक काचेचा पेला पुन्हा स्वच्छ धुवून पाणी आणून पुढे करतो. अदवीने विचारतो—

"काय आणू ?"

"चहा !"

पोऱ्या जाऊ लागतो. तसा तो म्हणतो—

"जरा स्ट्राँग हं !"

"वरं !"

चहा येईपर्यंत तो पुन्हा सिगारेट पेटवितो. धीमेपणानं ओढू लागतो चहाला वेळ लागतो आणि तो घाईस येतो. एक एक मिनिट त्याला महत्वाचा वाटतो. कधी एकदा त्याच वेगानं निघतो असं त्याला होऊन जातं.

"जरा लौकर रे वावा !"

"हौ !"

तो सिगारेटचा धूर पोटात ढकलतो. नाकातोंडातून वाकडा तिकडा धूर सोडून तो विचारात गुंततो.

"नागपुरात पाऊस असायला नको. आणि शर्मिला वालकमंदिरातच भेटायला हवीय्. निघून गेली तर कसे ? तिला कुठे भेटावे ? घरी ? पण ते कसे शक्य आहे ? सुचित्रेचा राग अजूनही कायमच आहे."

समोर चहाचा पेला येतो. तो घाईगडवडीने चहा संपवितो. आणि पैसे देऊन हॉटेलवाहेर पडतो.

आता पाऊस पूर्णपणे थांबलेला असतो. बारीक कणांची भुरकीहि बंद झालेली असते.

तो गाडीच्या समोरच्या काचेवरील पाण्याचे टप्पोरे थेंब रुमालाने पुसून काढतो. काच स्वच्छ करतो आणि गाडी सुरू करतो. त्याच वेगानं पळवू लागतो.

" शर्मिला ! आता खूप वडवड करीत असेल. नाही नाही ते विचारून सुचित्राला हैराण करीत असेल. आपणावद्दल कधी काही विचारीत असेल. अशा वेळी सुचित्राचे उत्तर काय असणार ? तिची प्रतिक्रिया कोणती ? ती शर्मिलावर रागावत असेल काय ? तिला तसले प्रश्न विचारून भंडावून सोडते म्हणून ती शर्मिलाच्या तोंडावर चापटचा मारीत असेल काय ? "

—या कल्पनेनं तो शहारून जातो. तो कासावीस होतो. त्याचं हृदय भरून येतं. आपल्या चिमुरडचा गोळचाला एकदम पोटाशी धरावंसं त्याला वाटतं. गेल्या कित्येक दिवसात ती त्याच्या नजरेस पडलेली नसते. आता ती पूर्वीपेक्षा वरीच मोठी झालेली असते. 'तिला समज आलेली असणार, ती आपणाजवळ चटकन् येईल ? की बुजेल ? की ओळखणारच नाही ? माझी वछडी...माझ्या रक्तमांसाचा गोळा...मला ओळखणार नाही ? '

त्याचं मन आक्रंदू लागतं. आतल्या आत अतिशय व्यथित होतं. गेल्या दीड दोन वर्षात शर्मिलाची मूर्ति डोळचापुढून हलत नसते. प्रत्यक्षात शर्मिला गेली तेव्हापासनं दृष्टिक्षेत्रात सुद्धा पडलेली नसते. आणि म्हणून त्याचा जीव तिच्या भेटीसाठी...तिला एकदा वघण्यासाठी तिळतिळ तुटतो. तिला छातीशी कवटाळून तिचे पटापट मुके घ्यावेत असं त्याला तीव्रतेनं वाटतं. दावून ठेवलेल्या वत्सल भावना वाफेसारख्या वर उसळी मारू वघतात.

त्याला परवा कळतं. सुचित्रा नागपुरात गांधीनगरात असते. कुठल्याशा दवाखान्याजवळच्या ब्लॉकमध्ये आणि तिनं शर्मिलेला जवळच्याच बालकमंदिरात घातलेलं असतं. आया रोज शर्मिलेला बालकमंदिरात आणून घालते—घरी नेते. त्यामुळेच त्याचं मन उचकून जातं. कशातच चित्त लागत नाही. सारखी शर्मिला डोळचापुढे येते. त्याचं मन शर्मिलेचा ध्यास घेतं. त्याला चार महिन्यांपूर्वीच कळलेलं असतं की सुचित्रा नागपुरात प्राध्यापिकेच्या जागेवर दाखल झालीय् म्हणून. तो दोनदा नागपुरात आलेला असतो, त्याने शर्मिलेला भेटण्याचा प्रयत्न केलेला असतो. पण कॉलेजात जाऊन सुचित्राला भेटण्याची मनाची तयारी नसते किंवा तिथे तिच्या पश्चात तिच्या राहत्या घराचा पत्ता विचारण्याने आपण उघडे पडण्याची भीती असल्याने तसे करण्याची इच्छा नसते. आणि म्हणूनच त्याच्या त्या खेपा फुकट जातात. कधी तरी ती रस्त्यावरून जाताना दिसेल म्हणून तो बराच वेळ रस्त्याच्या कडेला गाडी थांबवून...शोधक नजरेनं बघत असतो. पण सारे

व्यर्थ गेले असते. ती त्याला कधीच दिसली नसते...तो पार कोलमडून जातो. जीवनाची अशी वाताहात. ज्यादा सुसंस्कृतपणा कधी कधी मागासलेपणापेक्षा किती भयंकर असू शकतो हे त्याला सुचित्रावरून पटतं. नवरा-बायकोत मतभेद होतातच. पण समजूतदारपणा अंगी असायला हवा. थोडा तरी. डोक्यात राख घालून तडकाफडकी असले निर्णय घेणे आततायीपणाचे म्हणूनच मूर्खपणाचे ठरतात. निदान सुचित्राने आपली भूमिका समजूतदारपणे समजून घ्यायला हवी होती. पण तिनं सारं घर डोक्यावर घेतलं. कारण काय तर आपले आणि नंदाचे संबंध अधिक घनिष्ट होत आहेत आणि म्हणून सुचित्रावर अन्याय होतो आहे. आपण तिची प्रतारणा करीत आहोत...तिच्याशी अप्रमाणिक आहोत. पण आपली भूमिका तिनं समजावून घेतली असती तर...पण ती काही एक ऐकायला तयार नव्हती. घराबाहेर पडण्याची तिनं अनेकदा धमकी दिली. घरातली भांडणे बाहेरच्या लोकांच्या कानावर जाण्याइतपत वाढली होती म्हणून आपणाला तसे वागावे लागले. तिच्या जाण्याला आपण संमती दिली. घरातली शांती नष्ट होऊ नये म्हणून. आणि आपण तिला रोखले असते तरी ती थांबती ना. तिच्यावर एकाच गोष्टीचा एवढा पगडा बसलेला होता की त्या संदर्भात ती आपले काही ऐकून घ्यायला तयारच नव्हती. तिला घमेंड होती वडिलांच्या संपत्तीची...स्वतःच्या बुद्धिमत्तेची...स्वतःच्या कर्तृत्वाची. सत्त्वाची अशी घमेंड नवराबायकोत असणे कधीच बरे नसते. पत्नी आपले अस्तित्व पतीच्या अस्तित्वात विलीन होऊ देते. तिचा स्वाभिमान नष्ट होतो; पतीपुढे. आणि पती-पुढे तिचा मान-अपमान याला किंमत उरत नाही, इतकी ती पतीत एकजीव व्हायला हवी असते. तिचे सारे पतीसाठी असते. स्वतंत्रपणे तिने स्वतःचा विचारच करायचा नसतो. पण सुचित्रा ही स्वतःला नेहमीच आपणाहून वेगळी समजत आलेली आहे. तिने सतत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला पोसले...जोपासले. घमेंड हा तिचा स्थायीभाव ठरला. ती घर सोडून जायला तयार झाली. गेलीही. मुलीला सोबत घेऊन. शर्मिला जणू सुचित्रेची एकटीचीच असते. आपला काही अधिकारच नाहीय्. माझी शर्मू ..माझी शर्मू...माझी वछडी...माझ्या रक्तमांसाची...माझी शर्मू...'

त्याचं मन अतिशय व्यथित होतं. पिळवटून निघतं. तो आतून संपूर्ण ढवळून निघतो. मन आतल्या आत रडू लागतं. कणाकणाने त्याच्या पापण्या ओलावतात आणि डोळ्यात टप्पोरे थेंब साचतात. त्यामुळे मघासारखी त्याची स्थिती होते. बाहेर पाऊस पडत असताना काचेतून दिसेनासं झालेलं असतं, तसं.

तो मनगटानं डोळे कोरडे करतो आणि पूर्वीपेक्षा अधिक वेगानं—शर्मिलाच्या अधिक ओढीनं तो गाडी पळवितो.

रॉंग नंबर प्लीज !

वामन इंगळे

लहानपणी मला मातीच्या मगुण्यातलं वरण खूप आवडायचे. मायनं वरणाचे भगुणे माझ्या पुढ्यात ठेवले की भाकरी येईपर्यंत भगुणे रिकामे व्हायचे. ते कुणी आताही दिले तर मी आवडीने खाईन. मातकट पिवळ्या रंगाचे डोळ असणारे ते वरण मला आता आठवले म्हणजे माझ्या मनाला खूप जिभा फुटतात. तुरट गुळचट चवीच्या पालवी तिच्यावर अंकुरायला सुरवात होतात.

पण आता तो केवळ गोड आठवणीचाच एक विषय आहे. आज ते कुणी हौशीने मागून देणार नाही. माझ्या जुन्या चवी अजून शाबूद असल्या तरी इतरांच्या सौंदर्यदृष्टी मात्र खूप बदलल्या आहेत. जेथे जे मिळणार नाही तेथेच ते शोधायची रीती वाढत आहे. एका वेगळ्या अर्थाने मीही त्याला अपवाद नाही. एखादी वस्तू खूप वर्षांपूर्वी होऊन गेली एवढ्यासाठी तिचे मोल कमी होते असे आजही काही केल्या वाटत नाही.

आज तसले वरण घरात एवढ्यासाठी मिळणार नाही कारण त्याचा रंग मातकट असतो. त्यातले डोळ स्वच्छ केलेले नसणार आणि मुख्य म्हणजे ते वरून काळ्या झालेल्या हांडीत शिजवावे लागणार. आता हे तर सगळे इतिहासजमा झाले आहेत. आता त्या मातीचा प्रवास पितळ ओलांडून स्टेनलेस–स्टीलपर्यंत झालेला. हे सगळे खरे असले तरी या एकाही चकाकणाऱ्या पात्रात स्वतःचा गुण स्वतःत शिजणाऱ्या अन्नात संक्रमण करण्याची शक्ती नाही. तो सुवास फक्त मातीलाच लाभला आहे. शिवाय तो सुवास मातीच्या अत्तरापासूनही वेगळेपणा ठेवतो. अत्तराचा घामटपणा त्यात नाही. पण हे सांगावे कोणाजवळ ?

तरीपण युक्तिवादच करतो म्हटले तर तो असा करता येईल. मातीचे भगुणे हे स्वच्छ करण्यास अतिसुलभ. त्याची किंमत तितकीच स्वस्त. कुठल्याही धान्याची वरची टरफलं सत्त्वयुक्त असतात हे आजचे खाद्यान्नशास्त्र कंठशोष करून सांगत आहे. अन्न परिस्थितीविषयी मी काही सांगावे असे नाही. आता राहिले तेवढे रंगसंगतीचे. हेही टोलविणे दुरापास्त नाही. खाद्यपदार्थालाही काही विशेष रंग असणे अपरिहार्यच का ? तसे असेल तर मग आपल्या काळ्याकुळ-कुळीत कॉफीचे काय होते ? खाद्यपदार्थाजवळून नेमकी कशाची अपेक्षा करावी ? चवीची, सत्वयुक्ततेची की सौंदर्याची ? वगैरे वगैरे.

मागे एका विचारी माणसाने चक्क सांगितले होते की विचारसौंदर्य हा शब्द चूक आहे. विचाराजवळून सौंदर्याची अपेक्षा नाही. शुद्धतेची आहे. तेव्हा पुष्कळच पाणी वाहून गेले. जिला आताशा तसले वरण करून मला वाढण्याचा संकोच वाटेल, तिच्याच लग्नाच्या वेळेची गोष्ट. वडील म्हणायचे आपल्याला गुणसौंदर्य पाहिजे. म्हणजे काय ? आता इथेही तीच गंमत आहे. विणकाम, स्वयंपाक, गाणे, मनमिळाऊपणा इ. इ. पण माझे आपले काही दुसरेच. मी वडिलांना म्हणालो, तिचे हे 'गुणसौंदर्य' आपल्याला अर्ध्या तासात कसे कळणार ? कळले तरी एकाच भेटीत ते चिरस्थायी कसे मानायचे ? ते कळण्यासाठी खरं म्हणजे पाश्चात्याप्रमाणे पूर्वसहवास नको का ? या वेळी तिचे शरीरसौंदर्य निरखून घेणे एवढेच आपल्या हातात आहे. माझ्या या उत्तरावर स्वतःला सुधारक समजणारे माझे वडील डोळे वटारून माझ्याकडे पाहू लागले.

यावरून पुन्हा एका बैठकीची गंमत आठवत आहे. त्या संगीतसभेत आधी भीमसेन जोशी गाऊन गेलेले. त्यानंतर एका प्रख्यात गायिकेची हजेरी लागणार होती. बैठकीच्या तयार वातावरणाचे बोट धरून बाई त्या दिवशी सहजच खूप तब्येतीने गायिल्या. हे सर्व ठीकच होते. दुसऱ्या दिवशी स्तंभकारांनी वेगळाच मजा केला. त्यांनी भीमसेनांच्या विद्रुप हावभावांच्या टीकेतच त्यांच्या गाण्याचेही खोबरे किसून टाकले आणि बाईंच्या गाण्यात त्यांच्या हातातील भरगच्च काकणांचा आणि कायिक विभ्रमांचाही आस्वादक मसाला मिसळून दिला.

टांग्याच्या घोड्याप्रमाणे झापडी बांधून अगदी नाकासमोर चालले पाहिजे असे कुणी म्हणत नाही. कारण रोजच्या व्यवहारात भूलचूक देणेघेणे असते. कायद्याचे अज्ञान ही जरी सुटकेसाठी सबब होऊ शकत नसली तरी अनौपचारिक स्नेहसंबंधात अशा अपराधांना क्षमा आहे. एरव्ही छकुडे तू किती गोड आहेस ग... किंवा लाडके. .तुला खाऊन टाकावेसे वाटते...अशी ललित विधानेहि युक्तिवादाच्या कक्षेत येऊ शकली असती. ती तशी येत नाहीत. कारण त्यांचा क्रीडाशील खोटेपणा हा भावनेवर आधारलेला आहे. त्यांनी सत्यात इंद्रियानुभव मिसळून त्याला भावगर्भ करून घेतले आहे. पण हे फक्त येथेच. पण म्हणून कुणी शास्त्राच्या अंगलटीस येऊन असा शास्त्रसंकर करू शकत नाही.

आणि म्हणून ज्यापासून जे मिळेल तेच मागणे इष्ट. त्यामुळे देणाराघेणाराची सोय होते. असे झाले म्हणजे मग कुणी गोष्टीपासून प्रचारबोध मागणार नाही. सुरापासून कुणी देहभाव मागणार नाही. फार काय, मग माझ्या आवडीच्या वरणाला कुणी सौंदर्याचे नियम लावणार नाही. तरीही कुणी लावतोच म्हटले तर राँग नंबरप्रमाणे त्याला चुकीची माहिती मिळण्याचा संभव राहील.

नातं

प्रा. वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे

त्या दोघांचं काय नातं होतं कुणास ठाऊक !

कितीतरी दिवसांपासून मी त्यांच्यातली ती विलक्षण आपुलकी बघत होतो. त्या दोघांमधील जवळीक न्याहाळत होतो. त्या जवळिकीनं विस्मयचकित होत होतो. नियतीनं त्या दोन जीवांना कसल्या तरी अदृश्य बंधनांनी जखडून टाकलं होतं यात काहीच शंका नव्हती !... जेव्हा जेव्हा मी त्या भागाकडे पावलं वळवीत होतो, तेव्हा तेव्हा त्यांच्यातल्या त्या निर्व्याज प्रेमाचा साक्षात्कार मला घडत होता....

मी राहातो ती जागा रहदारीच्या वस्तीहून वेगळी....साधारणत: निसर्गातील प्रसन्न एकांताची जोपासना करणारी अशी आहे. दैनंदिन जीवनाची साचेबंद वा चालताना उबगलेल्या माझ्या जिवाला विरंगुळा देणारा निसर्गाचा अफाट विस्तार माझ्या घराच्या शेजाराला वावरत आहे. माणसानं बांधलेल्या निवाऱ्याच्या टिचभर मर्यादेतून त्या अमर्याद...अथांग निसर्गाच्या सान्निध्यात पोचलं की कसं माहेरी आल्यासारखं वाटतं !—वर निळंभोर आकाश आणि खाली हिरवीगार वनश्री...दिशांच्या भिंतींनी सावरून धरलेलं हे माझं माहेर मला नेहमीच भुरळ घालतं !—त्या दिवशीहि मी असाच माझ्या त्या माहेरी गेलो होतो. माझ्या नेहमीच्या पाषाणखंडावर मी बसलो होतो. सरत्या श्रावणानं आपलं सारं कसब दशदिशांतून उधळलं होतं. कृतज्ञ पांढऱ्या मेघांनी पश्चिम क्षितिजाचे केशरी आशीर्वाद मोठ्या नम्रतेनं मस्तकी धारण केले होते. निळ्या-सावळ्या जलाढ्य मेघांनी समर्पणाचा भाव मनी बाळगीत धरणीच्या चरणावर शरणागती स्वीकारण्याची सिद्धता केली होती. आर्द्र उष्णतेनं साऱ्या आसमंतावर मोठं सुखदायक आच्छादन घातलेलं होतं. मी ते दृश्य बघत होतो. डोळ्यांच्या ओंजळीनं ते सारं सौंदर्य वेचीत होतो. निसर्ग यावेळी महाकाव्याच्या निर्मितीनं धुंद झालेला होता...त्या महाकाव्याचं रसग्रहण करीत मी मलाच विसरून गेलो होतो...

—आणि एकाएकी मी दचकलो !

भानावर येऊन मी बघत राहिलो त्या आक्रिताकडे...

एक काळाकभिन्न अल्सेशियन कुत्रा आपल्या अक्राळविक्राळ सुळ्यांचं प्रदर्शन करीत..लाहाकणाऱ्या आपल्या लांब जिभेनं त्या साऱ्या नीरवतेला जणू

वाकोल्या दाखवीत वेगानं पुढे धावत होता ..पाठलाग करीत होता. सजल मेघाच्याच रंगाचं एक कोवळं वासरू पुढे पळत होतं. चौखूर उधळलं होतं. त्या रानटी क्रव्यादाच्या वेगाशी त्या निष्पाप वासराच्या वेगाची जणू स्पर्धा लागली होती...

काही कळण्यापूर्वीच मी जवळ पडलेला एक धोंडा हाती घेतला...

— त्या क्रव्यादाला मारण्यासाठी !

आणि हातातला दगड हातातच राहिला !

ते वासरू धावता धावता थांबलं होतं. त्या क्रव्यादानं तत्काळ आपली गती थांबवली होती. त्या कोवळ्या वासराच्या लुसलुशित मांसाचा लचका आता तो क्रूर प्राणी तोडल्यावाचून राहणार नाही या आशंकेनं माझा श्वासोच्छ्वास क्षणभर थांबला होता...ते भयंकर क्रूर कर्म घडायला आता क्षणाचाच अवकाश आहे असं मला वाटत होतं...तेवढ्यात त्या वासरानं मोहरा फिरवला आणि ते स्तब्ध उभं राहिलं. जवळ आलेल्या त्या श्वापदानं क्षणभर त्या वासराचं नाक हुंगल्यासारखं करून उलट दिशा घेतली आणि ते पुढं धावू लागलं... ! आता पाठलाग करण्याची पाळी त्या वासराची होती...

म्हणजे हे भक्ष्यभक्षकाचं भीषण नाट्य नव्हतं तर ! —

तो होता एक उत्कट क्रीडाप्रकार...पाठशिवणीचा निर्व्याज खेळ ! ...दोन सवंगड्यामधला...

हातात घेतलेला दगड मी खाली टाकून दिला !

माझं मलाच हसू आलं !

मी त्या कुत्र्याच्या आक्रमणापासून त्या वासराचा बचाव करण्याला निघालो होतो. मी...एक क्षुद्र...दुबळा माणूस ! ...ज्याला शक्ती नाही. ज्याला तीक्ष्ण सुळे नाहीत...अणकुचिदार नखं नाहीत असा एक दुबळा माणूस ! —माझ्या हातातील दगडाचा नेम त्या धावत्या चैतन्याला लागणार होता का ?—माझ्या दगडाच्या आघातानं चिडून गेलेला तो रानवट प्राणी संतापून माझ्यावरच चाल करून आला नसता का ? एका वासराला वाचविण्याच्या प्रयत्नात आपण स्वतःची पारध तर करणार नव्हतो ना !—हे प्रश्न नंतर मनात उत्पन्न झाले... मन निर्धास्त झालं तेव्हा ! पण त्या एका क्षणी या प्रश्नाची पुसटशी सावली सुद्धा मनावर पडली नव्हती ! त्या क्षणी एकच भावना मनात प्रबळ झाली होती ! — या कोवळ्या गरीब पाडसाला वाचवायला हवं त्याच्यावर आक्रमण करणाऱ्या श्वापदापासून त्याचं संरक्षण करायला हवं...बस्, इतकंच ! अन् आता माझ्या त्या साऱ्या ऊर्मीचा इमला ज्या तर्कावर आधारलेला होता, तो तर्कच लटका ठरल्याचं माझ्या प्रत्ययाला आलं होतं !—ते दोन जीव परस्परांचे शत्रू नव्हते—

ते सखे होते. त्यांच्यात कसलं तरी अनामिक नातं होतं अन् त्या नात्यानंच ते असे एकत्रित आले होते...

अनिमिष नेत्रांनी मी त्यांची क्रीडा बघू लागलो.

ते वासरू आपली शेपटी उंच करून सुसाट पळत होतं. सजल मेघाच्याच रंगाचं ते कोवळं वासरू....जणू धरणीचं चुंबन घेण्यासाठी एक इवलासा मेघखंडच खाली उतरला होता. त्या वासराचं पोट आणि त्याच्या चारी पायांच्या आतला भाग निर्जल मेघासारखा पांढरा स्वच्छ !—त्यामुळे ते वेगानं धावत असताना हिरव्यागार वनराईवर सावळ्या-पांढऱ्या रंगाच्या लहरी तरंगून गेल्यासारख्या वाटत !—त्या वासराच्या मस्तकावर तळहाताएवढा मोठा पांढरा शुभ्र चांदवा होता. त्याचे टपोर चंचल डोळे कुण्याही अप्सरेच्या डोळ्यांना निस्तेज करून टाकतील इतके सुंदर होते. कान टवकारून आपल्या सवंगड्याची चाहूल घेण्याची त्याची पद्धती मोठी आकर्षक होती. अत्यंत देखणं असं ते वासरू होतं ! धावण्याच्या आवेगात कितीदा तरी ते माझ्यापुढून धावत गेल होतं... कितीदा तरी ते क्षणाच्या विश्रांतीसाठी माझ्यासमोर उभं राहिलं होतं ! आपल्या चार सुंदर वळकट काळ्याशार पायांवर आपलं धापापणारं गोंडस शरीर मोठ्या डौलानं संभाळणारं ते वासरू—चार नक्षीदार स्तंभांवर आपल्या कळसाचं डौलदार, शिल्प संभाळणाऱ्या देवळासारखं मला वाटलं !—देवळासारखं तरी कशाला म्हणू ?—देऊळच !- निर्गुण निराकार चैतन्यानं आपल्या वास्तव्यासाठी त्या गोजिरवाण्या शरीराचं देऊळ निवडलं होतं....अन् एखाद्या भाविकाप्रमाणे मी त्या देवळापुढे उभा होतो !—तो कुत्राही आता मला सौम्य वाटत होता. त्याचे भेदक डोळेही स्नेहाळ वाटत होते. त्याचं मागल्या दोन्ही पायांच्या दिशेनं खाली झुकलेलं झुबकेदार शेपूट सज्जनाच्या मनासारखं नम्र झालं होतं. तोही धापा टाकीत होता. आपल्या तीक्ष्ण सुळ्यांवरुन बाहेर लोंबकळणारी काळसर लालसर जीभ तशीच लोंबू देत तोही लाहाकत होता—मधूनच पुढे पळत होता. पुन्हा परत येऊन त्या वासराचा पाठलाग करीत होता.—वासराला आपल्या मागे धावण्याला प्रोत्साहन देत होता !—

त्यांच्या या मुक्त क्रीडेला साक्षीदार होता सारा निसर्ग. .आणि मी स्वतः. .!

मी खरोखरीच भारावून गेलो होतो.. .बेभान झालो होतो...! माझ्या नेहमीच्या पाषाणखंडावर बसून मी अतृप्त नजरेनं त्यांचा तो खेळ बघत होतो...

—आणि मी नेहमीचाच साक्षीदार झालो त्या खेळाचा !

कदाचित त्या दोघांना ते कळलं असेल. आपला खेळ रसिकतेनं पाहणारा कुणीतरी या जगात आहे या जाणिवेनं कदाचित ते सुखावलेही असतील. कारण

त्यांचा पाठशिवणीचा खेळ ऐन रंगात आलेला असताना एकाएकी मला आलेला पाहताच सुरुवातीसुरुवातीला दचकून क्षणभर थांबणारे ते भाबडे जीव आता दचकत नव्हते. .थांबत नव्हते. त्यांचा खेळ तसाच चालू राहात होता. कधी कधी मी माझ्या पाषाणखंडावर बसून बराच वेळ होऊन गेल्यावरहि त्यांचा पत्ता नसे. मर्जीला येईल तेव्हा बाहेर धाव घ्यायला माणसासारखे त्यांचे ते मुखत्यार थोडेच होते ?—अशा वेळी मी अत्यंत अस्वस्थ होई. मनाला सुचेनासं होई. का बरं आज ते मित्र आले नाहीत ? कां ? . .आणि मनाची पाकळी अनामिक आशंकेनं मिटू लागण्यापूर्वीच मन एकाएकी फुलून येई. ते दोन निर्व्याज जीव दृष्टीला दिसू लागत. कधी कधी मी जाण्यापूर्वीच कुणी तरी एक त्या माळरानावर आधीच आलेला असे. आणि आपल्या सोबत्याची मार्गप्रतीक्षा करीत उभा राही. तोही माझ्यासारखाच अस्वस्थ झालेला दिसून येई. त्याची अस्वस्थता त्याच्या हालचालीतून व्यक्त होत असे. आणि एकाएकी त्याचा जोडीदार दिसू लागे. आतापर्यंतच्या अस्वस्थतेचे बंध तट्कन तुटून जात आणि त्या आपल्या सवंगड्याला भेटण्यासाठी तो उड्या मरीत त्याच्या दिशेनं धाव घेई !—तीच त्यांच्या खेळाची सुरुवात असे ! त्यांची चपळ पावलं पृथ्वीचा परीघ मोजू पाहण्याचा प्रयत्न करू लागत. . .धावण्याला अन् पाठलागाला ऊत येई ! त्यांचं चपळपण पाहून जणू आतलं चैतन्य शरीराबाहेर उसळू पाहात आहे असंच मला वाटे !—

एकदा मी त्या माझ्या पाषाणखंडावर येऊन विसावलो होतो.

ते वासरू त्या माळरानावर एकटंच उभं होतं. त्या कुत्र्याची वाट बघत होतं. त्याची अस्वस्थता त्याच्या हालचालीतून जाणवत होती. ते क्षणभरसुद्धा एका ठायी स्थिर उभं राहत नव्हतं. थोडसं धावायचं. .धावण्याचं एखादं वर्तुळ पूर्ण करायचं. . .क्षणभर थांबून कानोसा घ्यायचा. . .आपल्या सोबत्याची वाट पाहायची. .मग पुन्हा बागडायला आरंभ करायचा. . .!—त्याची ही कृती मी तन्मयतेनं निरखत होतो. एवढ्यात कोणते तरी वेगळेच कुत्रे त्या वासराच्या मागे धावले. प्रथम वासराच्या ते लक्षात आलं नाही. त्या परक्या कुत्र्यांना त्यानं लांबून ओळखलं नाही. ते नुसतं उभं होतं. आणि ते तीनचार कुत्रे जवळ येताच ते पळू लागलं. शरीराच्या जवळ येऊ बघणाऱ्या कुत्र्यांना मागच्या पायांनी लाथाडू लागलं. क्वचित मोहरा फिरवून हुमालू लागलं. ते तीन चार कुत्रे त्याच्या भोवताल उभे राहून रागानं भुंकू लागले. वसवसू लागले संधी साधून त्या वासराच्या शरीराला झोंबण्याचा प्रयत्न करू लागले. वासरू मध्येच हुंबरत होतं.—कदाचित् ते आपल्या सोबत्याला साद देत असेल ! मधूनच पळून ते त्या कुत्र्यांच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होतं. मध्येच थांबून आपल्या मस्तकानं समोरून चालून येणाऱ्या कुत्र्याला ठोस देण्याला सरसावत होतं

लाथा झाडून एकदम इतस्ततः पळत होतं. यावेळी मी वास्तविक त्या वासराला कुत्र्यांच्या तडाख्यातून सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा होता. त्या कुत्र्यांना दगड मारून मी हाकलायला हवं होतं. पण त्या क्षणी मला तसं करावसं वाटलं नाही. ते गावरान कुत्रे भुंकतील पण चावा घेणार नाहीत, याची मला खात्री होती. वासराच्या आक्रमक पवित्र्यानं मागं सरणारे ते कुत्रे मला मोठेसे उपद्रवी वाटले नाहीत ! या कुत्र्यांना एकाकीपणे तोंड देणाऱ्या त्या वासराच्या झुंजार-पणाचं कौतुकच फक्त त्या वेळी मला जाणवत होतं. मी बघत होतो. वासरू पुढं पळत होतं. हुंबरत होतं. . .कुत्रे पाठलाग करीत होते. . .

—आणि एकाएकी तो अल्सेशियन कुत्रा त्या तिन्ही कुत्र्यांवर तुटून पडला. तो तिथं केव्हा अन् कसा आला, ते त्या कुत्र्यांप्रमाणेच मलाही कळलं नाही. त्यानं त्या कुत्र्यांपैकी एकाची मानगूट इतक्या आवेगानं धरून हिसडली की जिवाच्या आकांतानं त्यानं टाहोच फोडला. त्याला सोडून ते लगेच दुसऱ्या कुत्र्याच्या मागे धावलं. आणि मग पाहता पाहता ते गावरान कुत्रे शेपटया पायात दाबून केकाटत दिसेनासे झाले...

त्यांचा पाठलाग करण्याच्या भरीस न पडता तो अल्सेशियन परतला. त्या वासराजवळ आला. अपघातातून वाचलेलं मूल ज्या आतुरतेनं आईकडे धाव घेतं त्याच आतुरतेनं ते वासरू त्या कुत्र्याकडे गेलं. त्याच्याजवळ उभं राहिलं. त्याच्या शरीराला आपलं मस्तक घासू लागलं ! ...

जरा वेळ दोघंहि उभेच होते !

—आणि मग लवकरच त्यांचा तोच तो नित्याचा खेळ सुरू झाला.

कुणाही तिऱ्हाइताला भयंकर वाटणारा तो अल्सेशियन त्या वासराच्या बाबतीत इतका हळुवार का व्हावा ? मी पुन:पुन्हा स्वत:ला प्रश्न करीत होतो— केवळ परिचय म्हणून ? – परिचयानं स्नेह वाढीला लागतो, यात शंकाच नाही. पण परिचयाचा पहिला मुहूर्त तरी कसा काय साधला गेला ? त्या दोघांच्या पहिल्या परिचयाचे वेळी कोणतीच अडचण निर्माण झाली नसेल का ? अपरि-चयाच्या तीरावरून परिचयाच्या दिशेनं येताना कुणाच्यात्र मनात कोणतीच आशंका निर्माण झाली नसेल ? त्या वासराच्या लवलवत्या शरीराचा लचका तोडावा, असं त्या कुत्र्याच्या कधीच मनात आलं नसेल ?— की अगदी बाल्या-वस्थेत त्यांचा परिचय घडला ? – शक्य आहे. बाल्यावस्थेत वाघाची पिलं देखील जिथं कोकरासारखी गरीब असतात, तिथं मानवी जीवनाच्या स्पर्शानं सौम्य बनलेली ही श्वानजात अपवाद कशी राहू शकेल ?— माझेच प्रश्न अन् माझंच उत्तर !—पण हे उत्तर मला निरुत्तर करू शकत नव्हतं. त्यांच्या जवळिकीचं केवळ हेच कारण नव्हे. आणखीहि वेगळं कारण असलंच पाहिजे !––बालपणापा-

सूनच्या परिचयानं नव्हे, तर त्यांच्यातल्या अतूट नात्यानंच त्यांना असं एकत्र आणलं असलं पाहिजे...त्यांच्या आपुलकीमागे पूर्वजन्मीचे लागेबांधे असले पाहिजे ! ...नक्कीच...

—प्रश्नांच्या जंजाळात सापडलेलं मन दचकून भानावर आलं.

त्या वासराच्या अंगावर एका कावळ्यानं बसण्याचा प्रयत्न केला होता अन् ते पाहिल्याबरोबर त्या कुत्र्यानं रागानं गुरगुरत त्या कावळ्यावर झेप घेतली होती. कावळा कर्कश कावकाव करीत दूर उडाला होता. कुत्र्यानं जमिनीवरून काही वेळ त्या गगनगामी प्राण्याचा पाठलाग केला अन् तो परत आला.

पुन्हा तोच तो नित्याचा खेळ !

एकमेकामागे धावणं धावणं आणि पुन्हा धावणं

त्या दिवशी मात्र बराच वेळ त्या पाषाणखंडावर मी बसून राहिलो... सायंकाळ संधिप्रकाशात विरघळली...दिशा म्लान झाल्या..आकाशानं रंग पालटला...काळोखाची पिसं दिशादिशातून उडू लागणारसं वाटू लागलं...तरी ते वासरू तिथं आलंच नाही. तो कुत्रा कितीतरी वेळापासून माझ्यासारखाच वाट बघत होता. भिरभिर पाहात होता. जमीन हुंगत होता. करुण वाटावा असा गळा काढत होता...क्वचित भुंकत होता. पण ते वासरू आलंच नाही. मला त्या कुत्र्याची विलक्षण कणव आली. त्याच्या वेदना मी जाणल्या. मीही त्याच्यासारखाच अस्वस्थ झालो होतो ना !——नकळत मी त्याला साद घातली मला नेहमी त्या विशिष्ट पाषाणखंडावर बसलेला तो बघत असावा. माझी साद ऐकताच त्यानं आपले कान उभारले. मान वळवून माझ्याकडे नजर टाकली. झेपा टाकीतच तो माझ्याजवळ आला. माझ्यापुढे उभा राहिला. शेपूट हालवून माझ्या नजरेचा वेध घेऊ लागला. किती निस्तेज वाटली त्याची नजर मला ! कुत्रा रडतो का ?——त्याच्या डोळ्यातून अश्रू गळतात का ? कुणास ठाऊक ! पण त्या कुत्र्याच्या डोळ्यातून न झरणाऱ्या अश्रूंचं प्रचंड तळं साचलेलं मला जाणवलं. क्षणभर त्यानं एक अत्यंत करुण असा स्वर काढला अन् पुन्हा लगेच झेपा टाकीत तो त्या काळवंडलेल्या माळरानाच्या दिशेनं निघून गेला...

—कदाचित रात्रभर तो तिथं घिरट्या घालीत असेल !

उदास वृत्तीनं मी घरी परत परतलो.

पहाटे जाग आली.

सूर्योदयाला बराच वेळ होता. दिवस आणि रात्र यांच्या वियोगाची ती मिठी अजून पूर्ण उलगडलेली नव्हती. संध्याकाळी असावं तसं सारं वातावरण अंधुक अन् धूसर होतं ! एकाएकी मला कालची संध्याकाळ आठवली. काल

सायंकाळी न दिसलेल्या त्या वासराची मला आठवण झाली. मित्रवियोगानं दु:खी–कष्टी झालेली त्या कुत्र्याची मुद्रा मला आठवू लागली. मला राहवेना. पायात चपला घातल्या आणि मी माझ्या त्या नेहमीच्या जागेकडे जाऊ लागलो..

––माझा नेहमीचा पाषाणखंड उदासवाणा होऊन आज बसलेला आहे असं मला उगाचच वाटू लागलं !

आणि त्या पाषाणखंडाजवळ येऊन मी पाहताच विलक्षण दु:खाचा चित्कार माझ्या तोंडून नकळत बाहेर पडला !

ते गोंडस वासरू निष्प्राण होऊन तिथं पडलं होतं ! त्याच्या कोमल शरीरावर निर्घृण प्रहार करीत तीनचार कावळे तिथं कावकाव करीत होते ! त्यांना हाकलून देऊन मी क्षणभर त्या दृश्याकडे स्तंभित होऊन बघत राहिलो...

––रात्रिचरांनी त्याचं ते सुंदर शरीर फाडून टाकलेलं स्पष्ट दिसत होतं. त्याची ती सजल मेघासारखी सावळी काया. .त्याचे डौलदार पाय. .आणि धावताना पाठीवर छत्रछाया धरू पाहणारी त्याची बारीक शेपटी...त्या माळरानावर ते परमेश्वरी शिल्प उध्वस्त होऊन पडलं होतं त्याच्या मस्तकावरचा चांदवा आता निस्तेज झाला होता. पोट कोल्ह्यांनी फाडलेलं होतं. पोटाच्या आतील मांसखंड दृष्टीला भोवळ आणीत होते. त्या वासराचे डोळे अजूनही उघडे वाटत होते...जणू अजूनही तिथं दृष्टी रेंगाळत होती !––कालपर्यंत नश्वरतेला आव्हान देणारं ते सुंदर शरीर आज मातीमोल झालं, यावर विश्वासच बसेना ! कसा बसावा !––अरे, हा जीव काल वागडत होता ना ? आपल्या सुंदर बळकट पायावर शरीराचं सुंदर मंदिर हाच जीव सावरून धरीत होता ना ? आपल्या चौखुरांवर विश्वाचा परीघ मापण्याचं कौशल्य हाच जीव प्रगट करीत होता ना ?––पण आज काय झालं ?––केवळ चोवीस तासांतच असं काय घडलं की हा सुंदर ताज छिन्नविच्छिन्न व्हावा ? ..खरोखरीच मृण्मय ठरावा ?

मस्तक कसं सुन्न झालं !––गरगरू लागलं.

घरी जावं असं वाटेना––तसाच पुढे जाऊ लागलो.

एकाएकी मला त्या कुत्र्याची पुन्हा आठवण झाली काय वाटेल त्या कुत्र्याला ?––काल केवळ त्या वासराच्या नित्य भेटीत खंड पडताच भ्रांतचित्त होणाऱ्या त्या कुत्र्याला काय वाटेल ?––दोघांच्या अतूट नात्याचा धागा आता तुटला होता...ही तुटणूक त्या वासरावर असीम प्रेम करणाऱ्या त्या स्नेहाळ प्राण्याला जाणवल्याशिवाय राहील का ?––विचारांच्या तंद्रीत मी चालत होतो. कुणीतरी माझ्याजवळ थांबल्याचं जाणवल्यानं मी दचकून पुढं पाहिलं. त्या वासराचा मित्र असलेला तो अल्सेशियन माझ्यापुढे उभा होता. मला विलक्षण

वाईट वाटलं. माझ्या पुढे केलेल्या हाताला हुंगणाऱ्या त्या मुक्या प्राण्याच्या मस्तकावर मी थोपटल्यासारखं केलं. त्यानं शेपूट हलवून परिचय दाखवला अन् तो पुढं जाऊ लागला !—मी मनात म्हटलं, वेडचा, अरे तिकडं कुठं जातोस तू ? परत फिर. तुझा तो प्रिय मित्र आता माती होऊन पडलेला तुला तिथं दिसेल. तुला बघवणार नाही ते दृश्य. फीर मागं.—तुमच्यामधल्या नात्याचा चिवट धागा आता तुटून गेला आहे रे.

कुत्रा मी आलो त्या दिशेनं जात होता.

जवळ जवळ अर्धा तास मी तसाच पुढं गेलो. मन अजूनही उदास होतं. राहून राहून ते गोंडस वासरू दृष्टीपुढे नाचत होतं. आता सूर्योदय झाला होता. दिशा उजळल्या होत्या. व्यवहार आठवला. परत फिरायला पाहिजे. घरी कुणाला सांगितलं नाही निघताना. वाट पाहातील. जावं आता. . .

उठलो.

पाषाणखंडाजवळच्या रस्त्यानं पुन्हा जाऊ नये अशी इच्छा होती पण नाइलाज होता. घरी जाण्याचा मार्ग तिथूनच जात होता.

पाषाणखंडाजवळ येताच नकळत डोळे त्याच दिशेनं गेले.

दोनचार गिधाडं तिथं दूर उभी होती. . .वाट बघत होती. . .

त्यांना हाकलावं म्हणून मी एक छोटासा दगड हाती घेतला व त्या गिधाडांना फेकून मारला. पंखांचा भेसूर फडफडाट करीत ती तिथून उठून जरा लांब गेली.—मनाला तेवढंच बरं वाटलं ! थोडासा पुढे येताच, गिधाडं दूर उभी कां होती याचं कारण कळलं. कुणी तरी त्या वासराच्या शरीराचे लचके तोडीत आपली भूक भागवीत होतं. त्या क्रव्यादाचा मचमच आवाज कानावर आदळत होता. शरीरातून विलक्षण शिरशिरी निघून गेली. वाटलं, दगड मारून त्या क्रव्यादाला हाकलून द्यावं !—खाली वाकलो. एक चांगला धारदार दगड हाती घेतला. आणि आता फेकून मारणार. .इतक्यात त्या श्वापदाला माझी चाहूल लागली असावी !—त्या वासराच्या शरीरात खुपसलेलं आपलं तोंड बाहेर काढून तो प्राणी माझ्या दिशेनं बघू लागला—

—आणि कत्री नव्हतो, एवढा मी दचकलो. . .स्तंभित झालो. तो तोच माझा परिचित अल्सेशियन होता !

त्या दोघातलं हे नवं नातं.

काही कविता

एका कवीचा मृत्यू

आमचा नव्हतास, उशीरा कळले
जगाला दिलेला होतास तू
जेरबंद पाय साऱ्यांचेच होते
जसे आम्ही होतो तसा होतास तू

माञ, आमची नजर होती पायांवर
तुझी दीठ खिळली होती कुठे तरी दूर
जागवले....खळखळ ऐकवले साखळदंड
तू माञ ऐकत होतास वेगळेच सूर.

आमचा नव्हतास उशीरा कळले
जगाला दिलेला होतास तू
थांब म्हणत असता खुशाल निघून गेलास
ज्वालांच्या जंगलात जळत गेलास तू.
कशाला या युगात जन्माला आलास
धड जगत जे नाही, धड मरतही नाही
कळसाला काहीच कुठे पोचत नाही
निकरावर कुणीच कुठे येत नाही
काळावर नजर देऊन असावे
मुजरेही तूर्त करावे काही

रीत सांगितली दाखले दिले
हतबुद्ध होऊन ऐकत होतास तू
तुझ्या आत्म्यावर फोड आले होते
काही न बोलताच निघून गेलास तू.

कशाला आलास आमच्या जातीत ?
पोट–नटांची जात आमुची
कोल्होबांच्या गर्दीत उभे राहून पुन्हा
तुकोबांची गाथा काय कामाची ?

अनुक्रमणिका

तरी तुझे तोंड खवळले नाही
हतबुद्ध होऊन ऐकत होतास तू
उथळपणे त्यांच्या बनत गेलास खोल
अगाधाच्या तळाशी शिरत गेलास तू.
रोजच्या हालअपेष्टांचे जग
रोजची दुःखे, रोजचे आवाज
रोजचे हासू, रोजचे आसू
यापासून दूर जसजसा गेलास
तसतसे वारे, ब्रह्मांड–वारे
ओसाडीचा दाब वाढत गेला
दूरची नक्षत्रे, जगाचे प्रवाह
पाहून एकाकी थकत गेलास
जगाचे लेकरू जगातच जगते
स्वतःहून मोठा किती होत गेलास
एवढया उंचीवर एकाकीपणाची–
हुडहुडी भरुनी कासावीस झालास
एकाकीपणाचा मणोगणती दाब
तरीही पिचली नाहीच छाती
आणि अकस्मात जाणवले तुला
तुझ्यातून नाडी उडते जगाची !
फुटल्या तसबिरी,. . .खचले मनोरे
निखळते युग पायाखालून
बुडती प्रदेश, वरवर येतात
नवीन भूखंड पायाखालून
कालचे संत, ते आजचे महंत
एकाच गोष्टीचे मंडन खंडन
अशा विपरीत पिसाट युगाचे
अश्रद्ध उजाड उनाड जीवन !

अशा अश्रद्धेने तुझ्यातील श्रद्धा बहराला आली
अशी विसंगती. . .विश्वात्मक मैत्री अग्नितुल्य झाली
नवानुभूतीचे भूखंड तुझिया वस्तीने जागले
तुझ्यातील प्रेम द्वेषाच्या रुपाने धुमसू लागले.

फेकली अखेर स्वार्थाची साधने, वैरागी झालास
आतबाहेरील युद्धाच्या कैफात भणंग बनलास
प्रेमाच्या द्वेषाच्या दोनही शाखांनी वाढाया लागला
पाळेमुळे खोल रोवीत रोवीत वटवृक्ष झाला !
असा कविपणा पाहिलाच नव्हता,–म्हणाया लागले
कोसळून खाली पडता पडता तुझ्या कानी आले !

असा तू, निघून गेलास, दूर गेलास, प्रतीक बनलास.
ते सौम्य व्यक्तित्व, तो भोळा भाव
आम्ही कसा विसरावा ?

अशी येत राहतात युगाची लेकरे अधूनमधून
त्यांच्या डोळयातील तो व्यथेचा भाव
आम्ही कसा विसरावा ?

नव्हे जगज्जेता, नव्हे कुणी नेता, कुणी लोकप्रिय...
जगाला उचलून, उराशी धरून––
रक्ताने नाहून निघणारा एक भावज्ञ
कसा विसरावा, कसा विसरावा, तो शूरपणा
कसा विसरावा ?

कूस घेऊन अगदी शेजारुन निघून गेलास नकळत
आमच्यातून निघून गेलेला तो एकच एक दिवा
कसा विसरावा ?

जगाने नकार नकार देऊन हद्दपार केलेच अखेर तुला
कुणी कैवार घेऊन उठला होता
साक्षात्कार कसा विसरावा ?

शरच्चंद्र मुक्तिबोध

अनुक्रमणिका

' इति अलम् '

आता काय बोलू बोल ?
बोला आधी साक्षात्चि उदेला !
हळुवार स्पर्शसुखे–
डवरली अवघी काया.
स्पर्शावीण !
गात्री गात्री—
ओथंबली रसानुभूति !
रसनेचे कामच काय तेथे ?
स्वयेच झाले परिमळित रोम रोम—
अवघ्राणावीण !
दर्शने देखिले दर्शना !
पाहणे, पाहणाराची कुठली वार्ता ?
असेच राहणे दिक्कालाद्यनवच्छिन्न !
रहावेच वाटे !
रहावेच वाटे !
छेः वाटणेही न वाटे !
आता राहतो निमूट !
अभिज्ञाहि कोठे—
निमूटपणाची ?
इति अलम् !

गुणवंत हनुमंतरांव देशपांडे

प्राक्तना !

प्राक्तना ! घाल घणाचे घाव !!
    असेन मी जर तप्त लोह जड
    उडतिल ठिणग्या तडतड तडतड
    आकाराला येइन पण धड
मिळेल मजला नाव !
    ताम्र, पितळ जर असेन मी तर
    असंख्य उठतिल निनाद सुस्वर

वातावरणी घुमतिल ते वर
ऐकिल सारा गाव !

काच बनावट असेन मी तर
तुकडे तुकडे उसळतील वर
जिकडे तिकडे जनता भरभर
करील धावाधाव !

असेन मी जर तेजोराशी
हिरा खनीतिल स्वयंप्रकाशी
सतत हाण घण, टिकेन निकषी
माझा अविचल भाव !

भवानीशंकर पंडित

वैशाखवादळ

(राजेंद्रशहा यांच्या वैशाखवादळ या कवितेचा भावानुवाद)

आंबराइ ही झुकली माझी फलभाराने
राखत बसतो तणारात या वाटे नजिकच मोसमामधे
जुनी पुरानी एक कहाणी.
एक अशी की—निर्जन सारे आसमंत हे
क्षितिजाच्यापर्यंत—नसे अन् नीरवतेला अंत
फुटलेल्या पालवीत बोले केवळ राघू
आणि कोकिळा करी मोकळा गळा आपला
नीरवतेतिल हेच फक्त रव !
हिरव्या हिरव्या वनराईतिल प्रखर किरण सूर्याचे
ऊन-सावली खेळ खेळती लपंडाव जणू ग्राम-मुलांचे
हिरव्या हिरव्या कैऱ्यांचेहि गाल लाल का ?
हां, रस भरला वैशाखाच्या आगीने जणु—
अणूअणूतिल अनलज्वाला
प्रज्वलीत या शाखांच्या पंखांचा वारा पिऊन पोटभर—
फांद्या झाल्या तृप्त-शांत या तपःफलाने !

. . .आणि अचानक सायंकाळी
सैरावैरा वादळवारा दिसे भयानक
भस्मांकित साधूच जसा की
तणारातले गवत विखुरले
आकाशाच्या उरात घुसुनी प्रचंड वेगे
पुन्हा परतले बाण वायूचे--
छिन्नभिन्न गवताच्या राशी
खोल वापिकातळातुन निघे शंखनाद अन
नवभूमीतुन निघे सारखा मृदंगध्वनि,
वृक्षांच्या ढोलीतिल नीडी
मिटलेल्या पापणीत लपवुन दुःख आपुले
लपून बसले पक्षी ?
पाय रोवुनी खडे वृक्ष धरकाप तयांना हालहालवी
फळे टपाटप पडती खाली
रुद्रापरि आकाश जरासे कृष्णझाकसे पूर्ण विरागी
कमंडलूंना अन्नपात्र ना आणि तरीहि
रुंडमाल विखुरली भूमिच्या रणक्षेत्रावर !
आकांक्षांना आणि कुणाच्या येत शून्यपण एका निमिषी
आणिक उरले
शून्य जीवनी जसे पळावे हासू
तसे हे आंब्यावाचुन सुन्न आम्रवन !
शेतधुऱ्यावर बसून बघतो नील नभाला
धूसरशा ईश्यान्य दिशेला
जीवन-विद्युल्लता लखलखे सर्व तणारांवरी
शेत-पिकांच्या वरी
आणि शुकाच्या झरती गायन सरी. .!

या. मु. पाठक

मूळ

मूळ शोधता शोधता
आता ठाकला हा अंत
प्रपंचाच्या डबक्यात
लीन माझ्यातील संत

भाऊ मांडवकर

आज अनिद्रेची रात

आज अनिद्रेची रात
हट्टी मिटेना पापणी
उभे डोळियात पाणी
नजरेत रुजलेल्या
आर्त तुझ्या आठवणी
गळ्यामध्ये दाटलेल्या
नाही हुंदक्यांना अंत
आज अनिद्रेची रात.
काळ्या काजळी घनांची
वाढतीच नभी दाटी
घुमे वाऱ्याची कर्कश
शीळ क्षितिजाच्या ओठी
आणि कासावीस चंद्र
हेलकावे वादळात
आज अनिद्रेची रात.
धारदार एकान्ताचे
शिरे काळजात पाते
नुरलेले शब्दांचे ग
आता आशयाशी नाते
गीत पेटलेले माझे
जागरणाच्या ज्वालात
आज अनिद्रेची रात !

उ. रा. गिरी

उत्सव

स्पर्शाविन झूले
देहाचा पाळणा
तान्ह्याहून तान्हा
झालो आता.
देहूच्या शरिरी
अपंगली रात
अर्घ्या उत्सवात
पायी आलो.
वेडी इंद्रायणी
आसऱ्याला आली
अभंगास न्हाली
कावडीत
तुझी तर माया
तिच्याहून भारी
अमृताच्या सरी
आंघोळीला.

शिवा राऊत

मनाई

वारा आणि शेत
यांचे नाते काय
नभ अंतराय
कुणामध्ये
डोईवर भारा
हातात कोयता
चाले एक सीता
रानामध्ये
गवताचे पाते
गुणगुणे काही
मला का मनाई
जगामध्ये

म. म. देशपांडे

आठवण

तुझी गोड आठवण
किती मधाळ बोलणे
घट्ट स्पर्शाच्या कवेत
धुंद चंद्राचे चांदणे
लाल चांफ्याची लकेर
मस्त सुखाचा एकांत
रंग विजेरी किनार
जाते मधून वेगात
खुळे भांबावते स्वप्न
मऊ रेशमी चाळ्यात
नेत्रपल्लवी तोऱ्याची
रात्र विरावी ठेक्यात
अशी गोड आठवण
तुझ्याहून हवी होते
लाख मोलाचे मीलन
चार क्षणात खुलते

मधु जामकर

मीपण

नव्हते चुकायचे तरी
अरे, चुकलेच पुन्हा
दाराशीच झाली बाई
पुन्हा माझी प्रतारणा
होते ठाऊक यायचा
होऊनिया माझा कान्हा
रोज घोकलेला पाढा
कुठे गेला कळले ना.

नाही ऐकविली शीळ
नाही केल्या खाणाखुणा
माझा साखर-झोपेचा
नाही मोडला वहाणा

आला चोर-पाऊलाने
गेला तसाच माघांरा
चार-दोनहि नाही रे
नभी मोजायास तारा.

पण घडले वेगळे
माझे मीपण अडले
आणि पुष्पशय्येवर
पुन्हा एकटी पडले !

वावा मोहोड

नव्हाळी

कधी नव्हाळी फेडतो
अंबाडीच्या भाजीवर
स्वाद चाखतो आगळा
दूर सारून साखर
घाटा-आंबीलची गोडी...

-किती वर्णू मी थोरवी
स्वाद घेऊनिया अंती
आत्मा, शरीरा सोडवी
मस्त झडीच्या दिवशी
सण किरसाना घरी
तेल-पानोळ्याचा रंग
धिःक्. .पुरणाची पोळी !

वरवट्याची भाकरी
कधी नव्हाळीची खातो
यता कसाहि वखत
सुखे निभवून नतो
बारमाही एकादशी--
पंढरीच्या यात्रे जातो
'देवा, पाव नव्हाळीला'
हेचि दान मी मागतो !

आत्माराम भोयर

झाली सारी दाणादाण
वाताहात घरदार
कुण्या निर्दयाने अशी
मुकी झोडपली वोर.
एका झपाट्यासरशी
पुसे कपाळीचा टिळा
खोल निळ्या आभाळात
सूर्य तेवता बुडाला

काळवंडे मावळती
भिने वेदना प्राणात
रक्त गोठून धावते
बर्फ दाटला देहात.
आधमुसा जीव होता
अनमान्या शब्द गेला
लाख मोत्यांच्या मोलाचा
हिचा अश्रू हारपला.

गुणाकर देशपांडे

दाभाडे

मी पाहतो माझ्या पिढीतील शिक्षित मस्तकांच्या
चिंधड्या उडताना.

वेडसर वेडसर बेकारी क्षुधित घृणास्पद नग्न.
प्रचंड दुर्दम्य शक्तींची चक्रे गरगर फिरतात फिरतात मेंदूत
कापीत जातात सर्वत्र हाडे आणि मांस चामडे शरीरावरचे

दादा दाभाडे : मी पाहतो त्याचा चेहरा क्षयी किरणात
करुणनाट्यातील नायकाच्या चेहऱ्यासारखा त्याचा चेहरा.
मेंदूतून उतरून डोळ्यात जमलेले रक्त
विश्वाचे आत्मपीडन. काळे त्रस्त रक्त.
समग्र अस्तित्वाची एकाग्रता प्रवाहित
चेहऱ्यावरच्या चामड्याखालून वाहणाऱ्या रक्तवाहिन्यातून.

तो जबडा उघडतो. प्रत्येक नस ताणलेली.
कवटीच्या विचकलेल्या दातांसारखे त्याचे दात.
आणि अजस्र स्वगत बोलत जातो कोसळत्या स्वरात :
शरीराचे तुकडे तुकडे करून त्याचा खिमा लोकांना खाऊ घालायचा.
भूत होऊन झपाटून टाकायचं साऱ्या विश्वास.

वैताग वैताग. उद्विग्न. बीभत्स. अनावर चीड.
वैताग वैताग धमन्यातून सळसळणारा.
मी पाहतो माझ्या पिढीतील शिक्षित मस्तकांच्या
चिंधड्या उडताना.

वसन्त डहाके

उषास्वप्न

क्षितिजावरती ढळल्या राती
तुझी उठावी रानपाउले
चाळवलेले स्वप्न अवेळी
जुळवित यावे धागे ओले

अंधाराला साद मिळावा
दिशादिशातुन गर्दबावरा
गोजिरवाण्या प्राचीचा या
जरा लागला पहाटडोळा.

अर्धोन्मीलित सुप्तहिमांचे गहिरे डोळे झाडित ये तू !
अर्धस्वरांची गर्भरेशमी खर्जतार झंकारित ये तू !
अनुरागाचे रंग बदलते कण अंगावर पेरित ये तू !
अर्धलाघवे स्वप्न उषेचे रक्तफुलांनी शिंपित ये तू !

अशीच यावी नयनवावरी...!

सुरेश भृगुवार

वाराणसी

कथेत निजल्यापरी चढत रात्र आली कशी
सकंप शरिरातली प्रहरवेल की स्निग्धशी
तुझ्या हृदयशक्तिची मिठित मृण्मयी धूळ ही
तमात शिरल्यावरी दुरुन हाक येते जशी,...
उदान मन येइना थकुनि झोपलेले झरे
अनाम असल्यावरी तुजसि जन्म गेला स्मरे...
किती सरल सूक्ष्म ही तमसमर्पणाची तऱ्हा
नदीत बुडली जणु लहर चांदण्यांची अशी...
तमास कुणिही नसे मरण अमृताचे जसे
तशात तुज स्वप्निचे अटळ लागलेले पिसे
सजून मनसाजणी दिसशी हंसगीतापरी
विराट तननिर्मळा वघत आर्त वाराणसी

ग्रेस

समाधि

मी माझी असते अन् मी माझी नसतेही
शब्दाच्या मायेने भावब्रह्म फसतेही
अंतरात एक ओढ शब्दांच्या पलिकडची
मुग्ध व्यथा आतुरल्या बावरल्या राधेची
निराकार परब्रह्म प्रीतीला दिसतेही.

हृदयाला कळते ते ओठांना आकळेन
स्वप्नांच्या दुनियेतिल गीत उभे संकोचुन
स्वरवेड्या कोकिळेस नादब्रह्म हसतेही

मन वेडे माझे हे मीरेचा ध्यास जणु
जनीचिया श्रद्धेचा पवित्रसा श्वास जणु
अंतरिचे गंधविश्व मूकतेत रुसतेही

उषा लिमये

रत्नदीप

विनाशाच्या संमोहक नक्षत्रधुक्यातून
तळमळत आले विच्छिन्न आयुष्य.
किती स्पंदने ओसंडली वाटेवर निरर्थक स्वप्नात
संवेदनांच्या संकीर्ण कल्लोळात नकळत.
हृदयहीन अज्ञानाने किती सजविल्या
लखलखत्या अंधारात लोकिक दिवाळच्या;
ह्याची प्राणभेदी खंत आता साहवत नाही.
झेपत नाही अर्धजागृत जाणिवेचे प्रकाशमर्म.
पण अठ्ठावीस शिशिरांच्या विरक्तिचा शेला
पांघरलेली माझी व्यथार्त प्रतीक्षासांज
का सूर्यसुक्तांचे रत्नदीप पाजळत आहे
माझ्या प्रत्येक प्रेरणेच्या पाकळीवर
मलाच नकळत ?

मनोहर वझे

परिक्रमा

अनभ्यस्त वाटेवर भयाक्षोकळ उभा मी
मायकूस हरवलेल्या अजाण अर्भकासारखा,
अभर्तृकेच्या ललाटासम शापिलेल्या आशा
विफल विषण्ण पंगिस्त पोरक्या.
आळवण करावी तर आठवत नाहीत
आदीसूर या प्रारंभशून्य परिक्रमेचे
वयातीत ही दाटवण वज्रकाळोखाची
जीत उजळत नाहीत मंदही संबंध पुढचे.
चेटुक माखलेली दिशाभुली सर्वत्र कालवलेली
शैलाकार शंकांना भोवळ देत साऽरखी
जीवनाच्या उद्देश–दफनाची शल्येही वाया जातात
ओसाडवाण्या अपरात्रीच्या दीर्घ हाळीसारखी.
भारावलेल्या अथांग अज्ञातात अशा
धापावलेल्या वैशाखासम कधीचा उभा अजून
नुसताच वाकून...झुकून कमरेपर्यंत
मस्तकी धरायला मिळेल कधी काही म्हणून.
'कधी काही' ची ही नतमस्तक धणी
पुरविली जाईल की नाही तुलाच ठाऊक !
प्रकाश पांघरलेले काही गोजिरे गोमटे
कधी आकारेल की नाही तुलाच ठाऊक !

--श्रीधर शनवारे

आम्रबहर

जागून लोचने तांबारून तारवठलेली
मिटण्यास उत्सुक जडावल्या पापण्या
दूरवर आंब्यांवर फुलोरच फुलोर
माझ्यात त्यांचा मादक सुस्त सुगंध
प्रियेच्या ओठांवर ओठ जडावून
केसामधून शिणली बोटे सुस्त फैलावून
प्रियेच्या आत बाहेर मादक आम्रबहर
गात्रावर माझ्या स्तब्ध सुस्त धुंदी लहर

--प्रभाकर सिरास

चालिव आंधळा !

चालिव आंधळ्याचे सोंग हळवे
चालिव मला हळव्या वाटे हळवासाच हात धरून.
गहिवरलेली झाडे द्रवीत वाटेवरती
वेली हव्यात भिग्यावुजऱ्या शहारल्याशा रानआडोश्याला !
आंधळ्याचे सोंग माझे वठेल इतकी रात हवी,
माझ्या अंगाच्या करवती पाहील सूर्य.
मी दिल्या मदिरेचा घोट मुखी असला तर
फेक चुळा, झाक डोळा त्या थंड्या सूर्याचा !
त्याला दाखवू नकोस वर्म माझे
त्याला सांगू नकोस षौक माझा
षौक तसला सांगू नकोस
धग्धग् वणवे लावण्याचा !
लावलेल्या वणव्यात आणि स्वतःच पेटत राहण्याचा !
सांग त्याला षौक माझा
--वेचली होती खरंच एकदा--
षौक मला आहे तसला फुलंऽ वेचण्याचा !

अजूनही तुझ्या माथ्यात तीच फुलं आहेत
म्हणून खरंच आज मी आंधळा आहे
चालिवलंस आंधळ्याचं सोंग माझं
आज खरंच आंधळा चालिव !

आता नसेल वाट हळवी
हात हळवा तुझा खरा
वेली नसतील भिज्याद्जऱ्या शहारल्याशा रानआडोश्याला !
आणि म्हणून
त्या काळ्या गर्द राती भिववणाऱ्या
माझ्यासाठी चाळव तेव्हा
तेच चांदण्याचे मोहोळ पुन्हा डंख देणारे !
चालिव आंधळा !
चालिव आंधळा !

नारायण रा. पेडणेकर

आसक्ति

वाटतं असावं अनासक्त
पण कर्म कां कुणाला चुकतं ?
असाच मी एक प्रवाह पतित
जगतो आहे अविरत निर्मित
जीवन एक आशयशून्य आवर्त.
उरात दडवून एकच उर्मी
कुठे तू अन् कुठे मी. .!

कधी वाटतं असावीस तू
किनखापी किनार या जीर्ण वस्त्राला
शब्दातीत साद विकल भैरवीला
भावुकतेचा वास भंगलेल्या स्वप्नाला.

पण. . .
या जवळपणातच व्हावा
आपल्यातील अंतराचा आभास
प्रत्यक्षाला जशी परोक्षाची आस
कर्त्याला अविश्रांत कर्माचा ध्यास

असावी सोबत तुझ्या अस्तित्वाची
अंकुराला आसक्ति वाऱ्याच्या झुळुकेची
तुझ्याचसाठी तेवतात आसवांच्या ज्योति.
आर्त मी अन् तू एक उर्मी !
कुठे तू अन् कुठे मी ?

अविनाश वरोकर

द्वंद्व

प्रभाकर धोटे

चंदू कंटाळला. प्रयत्न करूनहि त्याला पतंग उडवता येत नव्हता. पतंगाचा दोरा हातात धरूनही त्यानं धाऊन पाहिलं. पतंग फडफडला. काहीसा उंच गेला. मण धावणं थांबलं की पुन्हा खाली बसायचा. चंदु खाली बसला. आकाशात खूप रंगीबेरंगी पतंग घारीसारखे उडत होते. जणु ते वाकुल्या दाखवीत होते. रागारागानं त्यानं दोऱ्याचा रीळ टेरेसवरून खाली फेकला. तो पपांच्या मोटारीवर पडला. पपा त्याच्याकडे पाहून हसले. पण तो हसला नाही.

समोरच्या पटांगणात एक हडकुळा मुलगा पतंग उडवीत होता. पतंग डौलदार होता. त्याच्या इशाऱ्याबरोबर इकडून तिकडे, तिकडून इकडे, वरून खाली, खालून वर होत होता. चंदूला त्याच्या हुशारीचं कौतुक वाटलं.

तो खाली उतरून मैदानात आला. पण कुणी त्याच्याकडे लक्षच दिलं नाही. तो आपणहूनच त्या घोळक्यात सामील झाला. त्याचे स्वच्छ इस्त्री केलेले कपडे, व्यवस्थित बसवलेले केस, पायातले सॉक्स, बूट पाहून ती मळक्या, फाटक्या कपड्यातली मुलं दचकली. आपसात कुजबुजू लागली. चंदू त्या हडकुळ्या मुलाला म्हणाला,

'तुझं नाव काय आहे ?'

'राम.—'

'तू कोणत्या शाळेत जातो ?'

'रात्रीच्या.'

त्यावर रामने चमत्कारिकपणे पाहिलं. त्याला ह्या साऱ्या प्रश्नांचा अर्थच कळेना.

'तुला कशाला हव्यात रे ह्या उचापती ?'

रामचा फटकळपणा चंदूला आवडला. त्याला आजवर शाळेत घरी विचारलेल्या प्रश्नाला असं तोडून कधी उत्तर मिळालं नव्हतं.

'ए, मला बघू देतोस का पतंग?'

'घे.'

रामनं दोरा हातात धरला. बोटाला चांगलाच ताण जाणवत होता. बोटानं त्यानं दोरा गोल फिरवून पाहिला पण पतंग गिरक्या घेइना. राम पुढं झाला. त्यानं दोरा हातात धरताच पतंग गिरक्या घेऊ लागला. चंदूचा आदर दुणावला.

अनुक्रमणिका

'मला शिकवशील? '

'हो. उद्या ये. '

'माझा पतंग पण घेऊन येईल.'

'जरूर ये '

चंदू घरी आला. पपा, ममी आणि त्यांची दोस्त मंडळी गोळा झाली होती; त्यांचं बोलणं चंदूबद्दलच होतं. त्याची हुशारी, आज्ञाधारकपणा आदिबद्दल ते बोलत होते. उच्च शिक्षणासाठी त्याला इंग्लंडला पाठवावयाचा बेत रचीत होते. एरवी ते ऐकतांना चंदू खुष होऊन जाई पण आज त्याला वाटलं, खरं कौतुक तर रामचं व्हायला पाहिजे. त्याचा पतंग पण कसा झरझर उंच जातो, विमानासारखा. मला कुठं उडवता येतो.

दुसऱ्या दिवशी, चंदु आतुरतेनं दहा वाजायची वाट पहात होता. राजेश अंकलच्या मुली, विनी आणि डॉली आल्या. मिनी इंग्रजी कविता खड्या आवाजात म्हणायची. चंदूला त्या सारख्या ऐकव्याशा वाटत. पण आज त्यांचं त्याला आवडलं नाही. त्यामुळं तो गाल फुगवून बसला. थंड स्वरात त्यांना गुडमार्निंग केलं.

चंदूच्या आईला ते आवडलं नाही. पण पाहुण्यासमोर रागावणं बरं दिसत नाही म्हणून तिनं फक्त डोळे मोठे केले.

'चंदू चल हो तयार. आम्ही तुला पिकनिकला नेणार.'

चंदू म्हणाला '–नको मला बरं नाही.'

त्याचे पपा एकदम उठले. मग म्हणाले,

'अरे मला सांगायचं तरी—'

त्यांनी तावडतोब डॉक्टरला बोलवायला भय्याला पाठवलं. चंदू मनातल्या मनात चिडला. करायला गेला एक अन् झालं भलतंच. आता आणखी काही बोलणं म्हणजे पपांचा राग ओढवण्यासारखं होतं. पपांनी कचेरीत जाणं रद्द केलं. चंदूला झोपवून ते त्याच्या बिछान्याजवळ बसले.

अस्वस्थपणे चंदू पडला होता. त्याचं सारं लक्ष समोरच्या मैदानात गुंतलं होतं.

राम वाट पहात असेल.

थोड्या वेळानं तो म्हणाला.

'पपा मी बाहेर जाऊ? '

'कशाला '

'सहज. '

'काही नको. तुला बरं नाही. आता डॉक्टर येतच असतील.'

चंदूला दिवसभर झोपून रहावं लागलं. त्याला चीड आली. स्वतःची, पपांची अन मिनीची.

रविवार असल्यानं आज पपा बाहेर गेले होते. ममी जास्तीची कामं करण्यात गुंतली होती. चंदू बाहेर सटकला.

पटांगणात राम दोन उंच बांबूंना ठोकलेल्या आडव्या काड्यांवर पाय देऊन चालत होता. तो कितीतरी उंच वाटत होता. एखाद्या गोष्टीतल्या राक्षसा-सारखा. चंदू त्याच्याकडे कौतुकानं पाहत होता.

'राम.'—

'बोलू नकोस.'

'का रे'

'मला वाट पाहत ठेवलंस.'

'पपांनी येऊ दिलं नाही.'—

'मग आज कसा आलास.'

'पपांना न सांगता.'

'खोटं बोलतोस.'

'शप्पथ. नाही रे.'

चंदूचे डोळे भरून आले. खोटं बोलायची त्याला सवय नव्हती. पपांना न सांगताच आला म्हणून त्याचं मन त्याला खात होतं. तो परत जायला वळला.

'थांब.'

'बांबूंच्या पायांनी चलतोस.'

चंदू हसला. रामने काठ्या धरल्या. पण चंदूला तोल सांभाळता येईना. तो खाली कोसळला. स्वच्छ कपडे मातीनं भरले. ढोपरं फुटली. गुडगा खरचटला. डोळ्यातील पाणी पापण्यात लपवीत चंदू हसला.

'भ्यालास?'

'अं हं.'

'रोज सवय कर. येईल तुला. जा घरी आता.'

'चंदूला रामचा सहवास आवडत होता.

'तू कुठे निघालास?'

'करवंदाच्या जाळीत.'

'कशाला?'

'मूर्खच आहेस. करवंदं तोडायला.'

'रखवालदार आहे ना?'

'अं झोपला असेल.'

'चोरी करणार ? '

'तू घरी जा. भागुबाई.'

'मी येतो—चंदूला भागुबाई म्हटलेलं झोंबलं...'

डोंगराच्या रांगेतून ते हिंडले. चंदू खूप दमला. पण त्यानं चेहऱ्यावर तसं दिसू दिलं नाही. करवंदं खाऊन तोंड आंबटलं. काटयामध्ये अडकून शर्ट फाटला तरी चंदू आज खुशीत होता. पुस्तकं, वह्या, कॅरम, बॅडमिंटन, अभ्यास ह्या चक्रात तो गुरफटलेला असायचा. त्यामुळे करवंदं तोडताना त्याला आनंद होता. एक वेगळं विश्व तो पाहत होता, आगळा अनुभव घेत होता.

दोन्ही खिसे गच्च भरल्यावर ते घराकडे वळले.

आपणही काही करू शकतो याचा सार्थ अभिमान चंदूच्या चेहऱ्यावर होता.

रामचं घर पाहून चंदू विचारात पडला. त्याचं घर चंदूच्या घराच्या समोरच पण मैदानाच्या पलीकडे. डांबरी पिंपाच्या टिनेचं अन खोक्यांच्या लाकडाचं होतं. चंदू म्हणाला,

'इथे राहतो तू ? '

त्याचा आवाज ऐकून देवाची पूजा करणारे रामचे वडील म्हणाले,

'रावसाहेबांचा मुलगा नारे तू ?'

'हो.'

'इथ कशाला आलास बेटा' ?

'रामशी खेळायला.'

'परत जा, बाबा. नाही तर आम्हाला हाकलून लावतील. तुझा बाप भयंकर रागीष्ट आहे.'

'नाही माझे पपा असे वाईट नाहीत.'

'मी कुठं म्हणतो ? पण तू रामबरोबर खेळत जाऊ नकोस.'

चंदूला वाईट वाटलं. राम त्याचा हिरो होता. त्याला त्याच्यापासून खूप शिकायचं होतं. मग शाळेत त्याच्या मित्रांना तो करून दाखवणार होता. त्यांना चकित करणार होता. त्यांचा हिरो होणार होता.

चंदू बाहेर निघाला. राम पाठोपाठ आला. तो म्हणाला,

'वाईट वाटलं ? '

'हूं.'

'माझे बाबा तसे चांगले आहेत. आजारी असतात त्यामुळे चिडतात. तू येत जा खेळायला.'

'हो येईन.'

'चंदू एक विचारू ? '

'हं. '

'तुझे बाबा खरंच आम्हाला हाकलतील—मग आम्ही कुठं राहयचं रे ? '

'इथेच. मी पपांना सांगीन. पपा माझं ऐकतात. मी पपांना फार आवडतो.

चंदू परतायला लागला तेव्हा संध्याकाळ व्हायला लागली. वेळ कसा गेला ते कळलंच नाही. मग मात्र चंदूला भीती वाटायला लागली. पपांना असल्या उनाडक्या आवडत नसत. त्याला मनातल्या मनात चीड आली. एखादा दिवसही मनासारखं वागता येत नाही, म्हणजे काय ? निव्वळ जुलूम आहे.

चंदू आपल्याच तालात चालला होता. त्याचे वखोट कुणीतरी धरलं. चंदू दचकला आणि वळून पाहताच रागीट चेहऱ्याचे पपा उभे दिसले. त्यांनी त्याच्या पाठीत चपराक लगावली. चंदू कळवळला पण त्यानं हुंदका बाहेर येऊ दिला नाही. रस्यावर रडणं त्याला आवडत नव्हतं. कमीपणाचं वाटत होतं.

घरी आल्यावर त्याला वाटलं, ममीच्या कुशीत दडावं, सारा अपमान सांगावा, पण ममी---परक्यासारखी दूर उभी होती. नुसती बघत होती. काहीही न बोलता.

चंदूला आपलं घर परकं वाटायला लागलं. त्यानं पपानं विचारल्या एकाही प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. ममीनं जेवतोस का म्हणून विचारलं, पण तो घुम्या-सारखा बसून राहिला.

रात्र झाली, तसा त्याचा घसा दुखू लागला, खवखवू लागला. कच्च्या करवंदामुळे त्याला खोकला झाला. मुकेमुळे झोप मधेच मोडली. त्याच्या केसातून कुणीतरी हात फिरवीत होतं. त्यानं डोळे उघडले. ममी होती. त्याला वाटलं, स्वप्न असावं म्हणून त्यानं हाक मारली.

'ममी '—

'काय '—

'मला पपांनी रस्त्यावर मारलं. '

'मग तूं त्या उनाड रामबरोबर —का गेलास— '

'राम उनाड नाही. मला तो पतंग उडवायला शिकवणार आहे. '

'पतंग उडवायला आलं नाही तरी काही बिघडत नाही. तूं अभ्यास कर. उद्यापासून नाही ना जाणार ? '

चंदू बोलला नाही. मरेतोवर अभ्यास करूनही पुन्हा अभ्यास कर म्हणतात. चंदूनं तोंड फिरवलं. ममीनं पुन्हा कळवळून विचारलं.

'नाही ना जाणार ? '

'उद्या सांगेन.'

चंदूनं होकार द्यायचं टाळलं. ममी नाराज होऊन निघून गेली.

परंतु रात्री उत्तर द्यायचं चंदूनं टाळलं पण त्याला पपांना टाळता आलं नाही. आज ते त्याच्या खोलीत आले. करड्या आवाजात म्हणाले,

'चंदू उद्यापासून बाहेर एकटं जाणं बंद.——सोबतीला भय्या राहत जाईल.'

भय्याचा पहारा म्हणजे शुद्ध गुलामगिरी आहे. चंदू मनातल्या मनात धडपडला.

पपा भय्याला सांगत होते.——

'भय्या पोलीस येतील. मी फोन केला आहे त्यांना. रामचं घर दाखव. माझ्या जागेत बेकायदा झोपडं बांधलं आहे. ते फेकून दे. त्याच्या बापावर चोरीचा वहीम आहे.'

चंदू घावरला. आजारी रामचे वडील कुठं जातील ? राम आपल्याला काय म्हणेल ? किती विश्वासानं त्यानं रामला सांगितलं होतं, माझे पपा वाईट नाहीत.

'पपा ?'

'काय आहे.'

'मी रामबरोबर खेळणार नाही.'

'शाब्बास बेटे.'

'पण माझी विनंती आहे.'

'बोला बेटा.'

'रामची झोपडी राहू दे.'

वकिली डावपेचात मुरलेल्या रावसाहेबांनी चंदूकडे पाहिलं, मग हसले व म्हणाले,

'मला तुझी विनंती मान्य नाही.'

पपा खरंच रामचे वडील चोर नाहीत. पण पपांनी दुर्लक्ष केलं. चंदूचा चेहरा रागानं लाल झाला. त्याच्या शब्दाला त्याच्या ह्या घरात काहीही किंमत नव्हती. पपा ममींच्या लेखी त्याला सुंदर खेळण्याइतकीच किंमत होती. एकदा तर त्याला वाटलं घर सोडून जावं. पण कुठे हा प्रश्न असल्यानं, त्यानं तो विचार बदलला.

दुसऱ्या दिवशी चंदूच्या डोळ्यादेखत रामची झोपडी उध्वस्त झाली. तो बघण्याशिवाय काहीही करू शकत नव्हता. त्याला फार वाटलं. रामला भेटावं. पण रामनं त्याच्याकडे पाहिलंही नसतं. तरी चंदू मागच्या दारानं सटकला. त्यानं इकडं तिकडं बघितलं. पिंपळाच्या पारावर राम बसला होता.

अनुक्रमणिका

'राम.'

'काय आहे रे आता?' रामनं चिडून विचारलं.

'झालं ना तुझ्या मनासारखं.'

'माझ्यामुळं तुझ्यावर संकट आलं—'

'बरं, बरं आता कुठं जायचं रे आम्ही—सांग ना?'

'तुझा बाप दुष्ट आहे. चोर आहे.'

पपांना शिव्या दिल्यामुळं चंदूला राग येत होता पण चूक पपांची होती. त्यामुळे तो चूप राहिला.

राम रागारागानं खूप शिव्य देत होता.

चंदूला त्या सहन होत नव्हत्या. तो घरी परतला.

आठ दिवस झालेत तरी चंदू खिन्नच होता. होणाऱ्या अन्यायाची त्याला चीड येत होती, पण त्याचा नाइलाज होता. राम कुठे राहत असेल, कुठं अभ्यास करत असेल, कुठं झोपत असेल? त्याचे आजारी बाबा उघड्यावर झोपत असतील. त्यांची प्रकृती तर आणखी विघडणार नाही ना? त्याच्या मनासमोर असंख्य प्रश्न उभे राहत. आणि त्याला वाटायचं ह्या साऱ्यांना आपण जबाबदार आहोत. त्याच्याबरोबर खेळलो नसतो, तर त्याच्यावर संकटं येती ना. उशीत डोकं दाबून त्यानं हुंदके दाबले.

रात्री तहान लागल्यानं चंदूला जाग आली. सारीकडे सामसुम होती. पपांच्या खोलीतून आवाज येत होता. रामच्या वडिलांसारखा. चंदूला नवल वाटलं. उत्सुकता वाढली. तो स्वतःला आवरू शकला नाही. पायात सपाता अडकवून तो बाहेर आला. रामचे वडील पपांना म्हणत होते,

'लवकर काढ.'

चंदू दाराशी आला. दार बंद होतं. त्यानं दार ठोठावलं आणि हाक मारली

'पपा, कोण आलं आहे?'

चंदूला उत्तर मिळालं नाही. आत खूप धडपडण्यासारखे आवाज आले. काय होत होतं काही कळत नव्हतं. चंदू गोंधळला आणि जोरांनी हाका मारायला लागला.

भय्या, पपा, ममी—

सारे गोळा झाले. भय्यानं दाराला जोरात धक्के दिले. दार सताड उघडल्या गेलं. हातात सुरा घेऊन रामचे वडील उभे होते. कोचावर पपा पडले होते. ते विव्हळत होते. भय्या दारात उभा राहिला, त्या आधी त्यानं रामच्या वडलांचा सुरा हिसकावून घेतला होता.

चंदू दारातून आत आला. त्याच्याकडे कुणाचं लक्षच नव्हतं. तो पपांच्या जवळ गेला. पपांचं डोकं रक्तानं माखलं होतं. मम्मीनं त्यांना बसतं केलं. ते म्हणाले,

'भय्या आधी चोराला पळून जाऊ देऊ नकोस. तिजोरीच्या किल्ल्यां मागत होता.' मग ते धडपडत उभे राहिले. डोळे चोळत म्हणाले,

'मला दिसत नाही. काहीच दिसत नाही. लवकर डॉक्टरला बोलवा' आणि ते उभ्या उभ्या कोसळले.

पपांना असं पडतांना पाहून त्याला गहिवरून आलं. त्याचे पपा त्याचा किती लोभ करायचे? त्यानं मागितलं ते आणून द्यायचे. त्याला त्यांनी कितीतरी गोष्टी सांगितल्या होत्या. मागं आजारी असताना कसे सारखे जवळ बसून राह्यचें. केसामधून हात फिरवायचे. पाच पाच मिनिटांनी विचारायचे--

'चंदू कसं वाटतय रे— '

चंदूला सारं आठवलं आणि त्याला हुंदका आवरला नाही. आणि अशा पपांशी त्यानं गेले आठ दिवस अबोला धरला होता. त्यांच्याजवळ सुद्धा फिरकला नव्हता. आणि तोही रामसाठी, रामच्या वडिलांसाठी. त्यांनी बोलवलं तरी त्याकडे दुर्लक्ष केलं आणि त्याच रामच्या वडिलांनी पपांना जखमी केलं. त्याला स्वत:चाच राग आला. पपा होतील ना बरे? पपांना पुन्हा परत दिसू लागेल ना?

आणि ह्या साऱ्यांना तो स्वत: जबाबदार होता. हात जोडून म्हणाला 'देवा पपांना बरं वाटू दे. ते सांगतील ते ऐकेन.' त्यानं रामच्या वडिलांकडं पाहिलं. त्याला रामचे शब्द आठवले. तुझे बाबा दुष्ट आहेत, चोर आहेत. रागानं चंदूचे ओठ थरथरले. तो ओरडला--'माझे पपा नाही, तुम्ही दुष्ट आहात--चोर आहात.

आईला न जुमानता तो त्यांच्याजवळ गेला.

'बोला, का मारलंत तुम्ही माझ्या पपांना?'

पण तो बोलेना.

'बोला, नाही तर मी--'

चंदूनं रागारागानं मुठी वळल्या. आणि हातात सापडेल ती वस्तु त्यांच्या अंगावर भिरकावयाला सुरवात केली.

मग पपांच्या अंगावर पडून तो म्हणाला,

'पपा मला माफ करा—माझ्याशी बोला—तुम्ही सांगाल ते मी ऐकेन—हट्ट करणार नाही.'

आणि तो ढसढसा हमसून हमसून रडू लागला. मनातल्या रागाला आणि चिडीला ह्यापेक्षा दुसरी वाट नव्हती.

कृष्णा मास्तर

ॲड. मधुकर श्रीधर मंगरूळकर

मला वाटते ते १९३४ किंवा ३५ साल असावे. शहरात हिस्लॉप कॉलिजच्या दिवाणखान्यात रसिकवृंद दाटीवाटीने बसला होता. मास्तर कृष्णरावची बैठक चालू होती. मास्तर पूर्ण रंगले होते. डोक्यावरची फरची टोपी त्यांनी नकळत काढून ठेवली होती. मास्तरांचा विपुल केशभार जो आतापर्यंत आत दडला होता तो मुक्तपणे स्कंधापर्यंत रुळला. एखाद्या सुकेशिनीनेही हेवा करावा असे होते त्यांचे ते कुंतल–सौंदर्य !!

मुंदरीऽऽ–मोरी कांऽऽ···' अडाण्यातली द्रुत लयेतील चीज रंगत होती. त्या सुमारास त्या रागाची त्यांची ध्वनि–मुद्रिका खूपच लोकप्रिय झाली होती. मास्तर त्या भूमिकेशी तद्रूप झाले होते. मास्तरांची त्यावेळची अंगलट एकंदर गोलसरच. सुखासीन स्त्रियांच्या भूमिकांत रंग भरायला योग्य असे सौष्ठव ते खचितच होते. मुक्तपणे विहरणाऱ्या कचपाशाकडे त्यांचे लक्ष नव्हते. कृतक कोपाने आपल्या प्रियकराला विचारणारी प्रियतमा जणु त्यांचे जागी होती. ही साऱ्या श्रोत्यांची भावना—

'—मुंदरी मोऽऽरी ! कांहे को छिनऽलियोऽऽरेऽऽ–'

माझी अंगठी का बरं हिसकावून घेतलीस ! कितीतरी प्रकारांनी ती सखी प्रियकराला विचारत होती त्याला सुमार नव्हता. अभिनय तर अंगोपांगात दडलेला. ताडताड वाग्बाण सोडावे तशा त्या लहरी फेकल्या जात होत्या. स्थायी स्वर सारखा तारषड्जावर हिंदकळवलेला. काय वहारीची ती बंदीश होती ! कमळाभोवती भुंग्याने रुंजी घालावी त्याप्रमाणे तारषड्जाभोवती जणु साऱ्या स्वरलहरी फिरकत होत्या.

मास्तरांच्या गळयाचा खरा धर्म म्हणजे, ढाला स्वर. खर्ज किंवा मध्य सप्तकामध्ये दिलखुलासपणे फिरणारा. पण तारषड्जाला स्पर्श करताना अगदी मुलायम, सहजपणे स्पर्शून येईल असा. जरा चोरूनच पण त्यात धिटाई होती लाडिक नखरेलपणाची. अस्पष्ट अर्थ बोटांनी फिरत दाखवून स्पष्ट करायची त्यांची लकब.

—मी तर तुझी छेडखानी काढत नाही आणि तरी तू मला त्रास देतोस ?

काऽऽरे कियो मैं तोऽऽराऽऽ मुंदरी मोरी¯¯काहेऽऽ.....एखाद्या नर्तिकेनं आपल्या पदन्यासानं मनातील भाव, कोमल पैंजणाच्या निनादात स्पष्ट करावेत, तशीच गोड करामत मास्तरांच्या गाण्यात होती. त्यांचा आवाज फिरून फिरून तापला म्हणजे स्वरांचे कारंजे थुई थुई उडताना पहावे. समेची जागा यायला अर्धी मात्रा असो, पाव असो, झेप घेणाऱ्या घारीसारखे समेला यायचे. रसिकांनी वा दिलीच पाहिजे.

मास्तरांच्या गाण्यात स्वर–धारा सारखी वहात रहात नाही. तुकड्या-तुकड्यांनी त्यांचे गायन वहात जाते. भीमसेन जोशीसारखी संतत स्वर–भरत नाही....पण त्यातही त्यांनी वैशिष्टच कमाविले होते. लग्नाची वरात दुरून गाजत वाजत जात असावी, सुरेल शहनाईचे स्वर मंदपणे कानाला स्पर्शून जात असावेत, काळचाशार रंगाची रात्र आसमंतात पसरली असावी, मध्येच सुरकांडी मारून एखादी चंद्रजोत वर जावी, एक क्षणभर स्तब्ध राहून रंगीत ठिणग्या आसमंतात विराव्या आणखी विझल्यावरही, ज्योतीची प्रखरता आभाळात नसूनही, डोळ्यां-समोर तरळत रहावी. तसे मास्तरांचे गाणे––अजूनही माझ्या कानात रेंगाळत आहे.

त्यानंतर मास्तरांच्या अनेक बैठकी मी ऐकल्या, त्यातल्या काही चिजा अजूनही माझ्या मनात अमर झाल्या आहेत. सुगृहिणीचा पाक एखाद्या वेळी सहज जमून जातो तसे सहज जमलेले गाणे. फक्त त्यांची तब्येत लागली पाहिजे. ती लागली होती १९४८ साली, नागपूर नभोवाणीच्या उद्घाटन प्रसंगी ते आले होते तेव्हा. मुक्काम होता महालात श्रीमंत बाबूराव देशमुखांचेकडे. त्यावेळी आमचे ललितकला मंडळ ऐन भरात होते. सीताकांत लाडांच्या मार्फत त्यांना शब्द टाकला. त्यांनी कबूल केलं. पण एक अट होती. गाणे व्हायचे तर त्यांची साथ हवी. आजूबाजूला श्रीमंत बाबूरावजी नाहीत असे पाहून, हळूच मिस्किलपणे, एक डोळा बारिक करून मास्तर म्हणाले,

"अहो ! आपलं 'ऑर्गन' आपल्याजवळ पाहिजे, त्याचेशिवाय मजा नाही. आणि हळूच आपल्या उजव्या हाताचे बोट मुडपून आपल्या कपाळाच्या मध्यभागी टेकवले आणि टाळीसाठी हात पुढे केला. त्यांची ही लकब मला ऐकून माहिती होती. बाबूराव अत्रे आणि मास्तरांच्या गप्पा रंगल्या असता टाळी देता देता अत्रे थकून गेले होते. त्यावेळची गोष्ट ओघाओघानं आठवली म्हणून सांगतो. मास्तर आठवण काढायचे आणि प्रत्येक वेळी अत्र्यांना टाळी मागायचे. हे टाळी मागण्याचे प्रकरण इतके वाढले की, अखेरीस न राहवून अत्रे म्हणाले,

"मास्तरा, माझा हा हात आता पसरून ठेवला आहे. तुम्हाला जेव्हा जेव्हा हवी असेल तेव्हा तेव्हा टाळी वाजवून घेत जा––"

याच चालीवर आमचेपासून टाळी घेऊन मास्तरांनी हरिभाऊ देशपांड्यांना तार केली ?

"Come with organ" हरिभाऊ जर, कार्यक्रम जाहीर करून आले नाही, तर श्रोत्यांची टाळी आमच्या कपाळी पडूं नये ही आमची विवंचना होती. पण तशी पाळी आली नाही.

मास्तरांची ती बैठक जवळ जवळ एक तपानंतर ऐकत होतो. "देऽऽव देऽऽवे" अशा शब्दपंक्तीचा शुद्ध कल्याणातील ख्याल सुरू झाला होता.

तीच तुटक पद्धति अजूनीही कायम होती. रंग भरत नव्हता. आमचे कान तर श्री. भीमसेन जोशींनी बिघडवले होते. श्रोतृसमुदाय चुळबुळ करीत होता. पण मास्तरांची ढंगदार गायक ही ख्याति माहित असल्यामुळे ते तपश्चर्या करायला तयार होते. मास्तरांनी थोड्याच वेळानी गवळणी, भजने गायला सुरवात केली. 'परब्रम्ह निष्काम तो हा—' सुरू झाला. रंग जमायला वेळ लागला नाही. नवनीत चोरणाऱ्या कृष्णाच्या, बाळकृष्णाच्या लीला श्रोत्यांना रिझवू लागल्या. एका तपानंतर मास्तरांच्या गाण्याचा हा नवा आविष्कार होता. नंतर मीराबाईची भजने—'जो पिया जोडू कवण संग तोडू पिया—' हेहि भजन त्याच्या बंदिशीमुळे तर अतिशयच रंगले. मध्यंतरात बाहेर आलो. अंधारलेल्या कोपऱ्यातून आवाज आला म्हणून गेलो. कै. गुणवंतराव वाकेकर आणि पं. नारायणराव व्यास बोलताना उभे दिसले. नारायणराव म्हणत होते,

'मास्तर गवळणींना गोंजारायला लागले. शोभते काय त्यांना ? अहो ! बाळकृष्णबुवांचे गाणे यांनी जर आजच्या पिढीला ऐकवायचे नाही तर कुणी ? गुरूचं पुण्य कसं फेडायचं ? लोकांच्या कलानं घ्यायचं म्हणजे असंच व्हायचं—"

त्यांचे म्हणणे अगदीच खोटे होते असे नाही. पण मास्तरांनी काय गावे आणि काय नाही हे त्यांना सांगायचा आपल्याला काय अधिकार ? त्यांचे गाणे सुखविते हे काय थोडे होते ! मास्तरांनी स्वतः रचलेल्या मध्यमातील अनेक चिजा त्यांनी ऐकविल्या. ब्रज भाषेवर त्यांची हुकमतहि चांगली दिसली.

मध्यंतरानंतर त्यांनी 'अचानक आऽऽये' अशी अडाण्यात साद घातली तेव्हा अंगावर काटा आला. कोमल निषादावरून पंचमापर्यंत उतरून पुन्हा तार षड्जावर समेवर 'आऽऽये' मधील सम अशी जोरदारपणे घेतली की लगेच रसिकांनी त्यांना पावती दिली. जणू रंगही अचानक आला होता. माझा लाल अचानक आला, मी आपल्यातच मग्न होते, त्याचेकडे लक्षही नव्हते. माझा लाल असा यावा आणि माझे मात्र लक्षही नसावे नं?—स्वतःला धिक्कारण्याची वृत्ति त्यांनी अगदी हुबेहुब उभी केली. त्रितालातला तो संथ ख्याल चालू झाला.

हरिभाऊ देशपांडे ऑर्गनवर स्वरभरणी करीत होते. अगदी सहीसही जे त्यांचे गळयात ते यांच्या सुरात. मास्तरांची तुटक कल्पना त्यांनी स्पष्ट करावी. शार्टहॅण्ड-मध्ये घेतलेले लेखन टंकलिखित पूर्णपणे करून दाखवावे त्याप्रमाणे. रसिक पुढे सरकत होते. सारंग अंगाने धैवत आणि निषाद हलत हलत रंग भरत होता. आणि ही उत्सुकतेची तार ताणली असतानाच एकदम 'घघरी मोरी भरन नही दे' ही छोटी द्रुत लयीची चीज सुरू झाली. या चिजेचे वजन पहाण्यासारखे ! लाघवी पण तालाला वाकडे तोंड असलेले.–जिथं जाते तिथं तुझा त्रास आहे व मला तुझं हे लाडिकपण आवडत नाही–तुझ्याशी माझं कसं रे जमणार अशानं–घागर काही भरू देत नाहीस. आडवा अंगलटीला येतोस···काही वाटते का···लाडिकपणे पण वरवर त्रासिक मुद्रा करून विचारणारी राधा मास्तरांनी खूपच रंगवली. मास्तरांचे शब्द आणि ऑर्गनचे स्वर यांची लपेटी सुरू होती. मास्तरांच्या ह्या चिजेचा ताज-महाल माझ्या मनात अजूनहि थिजलेला, जसाच्या तसा आहे.

या मैफिलीनंतर मास्तरांची एक अविस्मरणीय अशी मैफिल ऐकली. श्रीमंत बाबूराव देशमुखांच्या वाड्यात. मास्तरांना सुग्रास प्रिय होता. श्रीमंतांच्या वाड्यात काही कमी नव्हते. मास्तर म्हणायचे " खवैय्या सो गवय्या—" पण गाणे ठरले त्या रात्री अनशन. रात्री नवाला मांडी घातली ती पहाटे साताला मोडली. बाहेर आलो तो रहदारी सुरू झाली होती. त्या बैठकीतल्या एका चिजेने आम्हाला मोहून टाकले होते. आजही सुरलटी कानावर आदळतात आणि मन धुंदकारून उठते.

'झिंझोटी' राग फारसा उच्च जातीचा समजला जात नाही. खमाज थाटातून उत्पन्न झालेला तो एक शूद्र राग. मंद्र आणि मध्य सप्तकात त्याचा विस्तार विशेष, चिजेचे तोंड सुंदर होते. इतनाऽऽ संदेसाऽऽ मोरा माऽ नोऽ पियरवाऽ अशी आर्त विनवणी चालली होती. 'मोऽऽ रा' आणि 'संदेसवा' या शब्दांत विलक्षण जादू होती. ती चीज ऐकूनच समजण्यासारखी गोड होती. साखरेची चव सांगून कशी कळणार ? एक तास ती चीज रंगली. त्या चिजेपुढे सर्व बैठक तुच्छ होती. आम्ही धुंदीने भारले गेलो होतो. दिवसभर कानात ती घोळत होती. मी सायंकाळी वाड्यात गेलो. श्रीमंत बाबूरावजी हॉलमध्ये एकटेच बसले होते. टेबलावर धिम्म्या त्रितालाची लय धरून अन् तोंडाने गुणगुणत होते, 'इतनाऽऽ संदेश वाऽऽ—" आणि ती कानाशी ती ओळखीशी वाटणारी सुरावट नीट उतरली नाही की मान हालवायचे. अंहं असे नाही.

मला ते म्हणाले,

'मधुकरराव, त्या चिजेचे तोंड घ्या बरे.'

मला ध्रुवपद तर पाठच झाले होते. ते लगेच म्हणाले 'हं असेच. पुन्हा एकदा—पुन्हा एकदा'—आणि ती ओळ चारपाच वेळ म्हटली. ते म्हणाले, 'राम॰

भर ते गाणे कानात गात आहे. मास्तरांची सारी बैठक एकीकडे आणि ही चीज. बस. मास्तर म्हणजे मास्तर—' खरेच होते. मास्तर अगदी रंगून ती झिंझोटी गायले. गोडीतला अगदी आखरी शब्द. त्या शब्दाशब्दात देखील 'सिमेट्री' होती. जशी महिरपीची वळणे एकमेकाला तोलत असतात! त्या बैठकीला हजर असलेले श्रोते धन्य. मास्तरांच्या अनेक मैफिली ऐकल्या. पण त्यांची ती शेवटची बैठक— हो, नागपुरातील शेवटचीच. त्यानंतर ते इथे गायले नाहीत. न गायले तर बरे असे वाटते. न जाणो तो एकेकाळी रंगलेला रंग पुन्हा जमला नाही तर--आपल्या माणसाने, न कळतही दोषी होऊ नये असे मनात वाटत असते. मास्तरांना लोखंडाचे सोने करण्याचा किमया होती. क्षुद्र रागाचे सोने करण्याचे सामर्थ्य होते— ही आठवण आजही आम्हाला धुंद करते. त्या मैफिली आजही आठवतात. डोळे लावून घ्यावे. ध्यानधारणा करावी आणि केव्हाही मास्तर गातात,

--इतनाऽऽ संदेसाऽऽ मोऽऽराऽऽ मानो पियरवाऽऽ.

अनुक्रमणिका

रशियाचा अग्रगण्य युवक कवि—

एव्हजेनी एव्हटुशेंको

पां. व. गाडगीळ

रशियन जनतेला संगीताचे अपार वेड आहे. संगीताच्या भक्तीतूनच रशियन जनतेला काव्यवाचन व काव्यश्रवण यांची गोडी लागली. आपल्याला आवडलेली कविता कंठस्थ करावयाची, ती गायची ही आवड रशियन जनतेत दिसून येते. चैकॉव्हस्कीपासून आजच्या द्मित्री शास्ताकोव्हिच्पर्यंत संगीताची अखंड परंपरा चालू आहे. पुष्किन, लर्मान्टॉव्ह, ब्लोक, येसेनिन्, मायकोव्हस्की, पॅस्टरनॅक यांची परंपरा आज एव्हटुशेंको, वोझ्नेसेन्स्की, व्हिनोकुरॉव्ह, स्लुट्स्की ही तरुण कवि-मंडळी चालवीत आहेत. रशियन जनता अपरंपार नादसमुद्रात अवगाहन करीत असते. कविता गाऊन दाखवायची म्हणजे ती प्रासादिक व नादानुकूल असलीच पाहिजे. रशियन कवींची रचना नादपूर्ण आहे याचे कारण हेच होय. पॅस्टरनॅकची अंत्ययात्रा जेव्हा पेरेडेल्किनो खेड्यात निघाली तेव्हा आजुबाजूच्या शेतकऱ्यांनी त्याच्या कविता गाण्यास सुरुवात केली. कृषिवल जनतेला त्याचे काव्य रुचले व त्यांनी ते पाठ केले याच्यात त्याच्या काव्याचे सामर्थ्य आहे. मायकोव्हस्की तर रस्त्याने जाता येता कविता गुणगुणत फिरत असे. जाहीर काव्यवाचनानी प्रथा मायकॉव्हस्कीनेच प्रथम सुरू केली. शब्दांचे माधुर्य ताल व संगीत संभाळून त्याने काव्यरचना केली व म्हणूनच ती लोकप्रिय झाली. (आमच्याकडे लोकांना आवडणारी भावकविता रचणारा 'गीतकार' ठरतो व अपद्यागद्य शैलीत दुर्बोध रचना करणारा 'कवि' ठरतो.) मायकोव्हस्कीने केवळ संगीतप्रधान कविता रचली नाही तर मानवी हृदयात हेलावणाऱ्या भावलहरींना नादमय केले. समाजाच्या दुःखाला, अन्यायाला वाचा फोडली. त्याचे काव्य जनतेच्या हृदयाला जाऊन भिडले. त्याच्या 'लेनिन' या कवितेच्या लक्षावधि प्रती खपल्या. रशियन कवि 'समाजाच्या जागृतीचे साथीदार' झाले याचे कारण त्यांनी लोकांची भावना शब्दांकित केली. 'We the children of Russia's terrible years' म्हणणारा ब्लोक 'let us to our fatherland devote, the noblest upsurge of our spirit' म्हणणारा पुष्किन या कवींपासून ते आजच्या वोझ्नेसेन्स्की, एव्हटुशेंकोपर्यंत साऱ्या रशियन कवींनी समाजाच्या भावनांचे, सुखदुःखांचे, आकांक्षांचे पडसाद आपल्या काव्यात घुमविले आहेत.

अनुक्रमणिका

अशा गौरवशाली परंपरेत वसणारा आजचा युवक कवि एव्हटुशेंको आज विचारनियंत्रणाचा बळी झालेला आहे. त्याचे वय आज केवळ ३२ वर्षांचे आहे. त्याने आपल्या काव्यरचनेची सुरुवात करण्यापूर्वी सैबेरियातील लोकगीतांचा अभ्यास केला. लोकगीतांच्या संकलनामुळे व लोकगीतांच्या गायनामुळे त्याला काव्यरचनेची स्फूर्ति झाली. लोकगीतांच्या चालीवर त्याने कविता रचण्यास सुरु-वात केली. सैबेरियातील जानपद जीवनात त्याने ऐकलेली कविता त्याच्या काव्य-रचनेची जननी ठरली. त्याच्या आईला आपला मुलगा कवि होणार या कल्पनेची धास्ती वसली कारण कवि म्हणजे एक अस्थिर, दुःखी, व्यवहारशून्य व एकलकोंडा विक्षिप्त गृहस्थ अशीच सर्वसामान्य जनतेची कल्पना होती. पुष्किन व लर्मान्टॉव्ह द्वंद्वयुद्धात मेले. ब्लोकने आपल्या जीवनाला काडवात लावून दिली होती. येसेनिन् व मायकोव्हस्की यांनी आत्महत्या केली आणि अनेक कवींचे स्टॅलिनने शिरकाण केले. या साऱ्या गोष्टींमुळे त्याच्या आईला मुलाच्या भविष्यावद्दल चिंता वाटू लागली.

परंतु एव्हटुशेंकोला काव्याची वेहोषी चढली होती. रशियन लोकगीतांतील संगीत समजून घेऊन त्याने तालवद्ध संगीतमय काव्यरचना सुरू केली. पाश्चात्य कवींच्या गद्यप्राय रचनेवर त्याने टीका केली आहे. नादपूर्ण कविता करणे म्हणजे मागासलेपणाचे लक्षण आहे आणि धड ना पद्य, धड ना गद्य अशा तऱ्हेची कविता करणे म्हणजे आपण अत्याधुनिक ठरतो या कल्पनेवर त्याने टीका केली आहे. आज त्याच्या काव्यगायनाला लोक हजारोंनी जमा होतात व त्याच्या गायना-वरोवरच तेही ताल धरू लागतात याचे कारण त्याच्या काव्यातील वाखाणण्या-सारखी नादपूर्णता. काव्यांतर्गत संगीताचे मर्म आता अनेकांना पटू लागले आहे. सुप्रसिद्ध फ्रेंच कम्युनिस्ट कवि लुई अरॅगॉन याने अलिकडे फ्रान्समधील जानपद गीतांचा अभ्यास करून त्या जानपद गीतांच्या चालीवर जानपद गीतांचेच संगीत वापरून, काव्यरचना केलेली आहे. तो आपली कविता जेव्हा विशाल जनसमु-दायापुढे वाचून दाखवितो तेव्हा जनतेत संगीताची एक लहर फिरते व लोक त्याची कविता गुणगुणू लागतात. (पाश्चात्य साम्यवादी कविश्रेष्ठ आता संगी-ताची व लोकगीताची कास धरू लागले आहेत. परंतु आमच्याकडे अजून लोकांच्या जिभेवर नाचणारी प्रासादिक तालवद्ध कविता ' प्रगतिशील ' ठरलेली नाही.)

एव्हटुशेंकोची कविता केवळ प्रासादिक नाही. ती जनतेच्या अंतःकरणाचा ठाव घेते, कारण एव्हटुशेंकोने आपल्या काव्यात मानवाचे अपार दुःख, युद्धासारखे अनर्थ आणि त्यामुळे मानवी जीवनाला आलेली अस्थिरता, झोटिंगशाहीचा क्रूर जुलूम व असंख्य लोकांचे हनन वर्णन केलेले आहे. साम्यवादी समाजातच त्याचे बालपण गेले असल्यामुळे इतर देशांतील लोकशाही समाजरचना व जीवनमूल्ये यांची ओळख त्याला होणे शक्य नव्हते. परंतु भावनाशाली कविमनाने जे मानवी

दुःख जाणले ते त्याने आपल्या काव्यात ग्रथित केले. ज्यू-द्वेष रशियात वाढीस लागला होता. झारच्या काळात ज्यू-द्वेष रशियन जनतेत पसरविण्यात आला होता आणि स्टॅलिननेही ज्यूंचे शिरकाण सुरू केले होते. स्टॅलिनच्या मृत्यूनंतरही ज्यूंचा द्वेष चालूच होता. ज्यू लोकांच्या अन्याय्य छळाबद्दल तीव्र विषाद कवि-मनाला झाला आणि Babi Yar या कवितेचा जन्म झाला. कविता जरी दुसऱ्या महायुद्धात कीव्हजवळच्या बाबी यार येथे जर्मनांनी केलेल्या ज्यूंच्या कत्तलीसंबंधी असली तरी तिच्यात सध्याच्या रशियात असलेल्या ज्यूद्वेषाचा उल्लेख आहे—

I plead with the pogrom thugs in vain
To roars of " Beat the Yids, and save Russia "
A shopkeeper is beating up my mother
O my Russian people !
I know that you are really international
But those with unclean hands
Have often loudly taken in vain
Your most pure name...

एव्हटुशेंको कविता फार प्रभावी तऱ्हेने म्हणतो. खणखणीत आवाजात, समरसतेने, कवितेतील भावनांचे उद्घाटन करतो. कवितेतील प्रसंगाशी, तो एकरूप होऊन जातो. जसा एखादा कुशल नट आपल्या भूमिकेशी तन्मय होऊन जातो तसा एव्हटुशेंको आपल्या कावतेतील भावनांशी एकरूप होऊन जातो. प्रचंड जनसमुदायापुढे तो आपली कविता गातो.

" Let the Internationale ring out
When the last anti-Semite on earth is buried
There is no Jewish blood in mine
But I am hated by every anti-Semite as a Jew
And for this reason
I am a true Russian
Today I am as old as the Jewish people
It seems to me now that I am a Jew..."

'बाबी यार' या कवितेने एव्हटुशेंकोला उदंड लोकप्रियता लाभली. मायकोव्हस्की स्मारकाजवळ झालेल्या एक अभूतपूर्व काव्यवाचन-प्रसंगी त्याला ही कविता सहा सात वेळा म्हणावी लागली. तो जिथे जिथे जाई तिथे तिथे त्याला ही कविता म्हणण्याचा आग्रह होई. वोझनेसेन्स्की, एव्हटुशेंको, व्हिनोकुरॉव्ह, बोरिस स्लुट्स्की

अनुक्रमणिका

व बेला अख्मादुलिना (एव्हटुशेंकोची प्रथम पत्नी) यांनी काव्यवाचनाला नाटचप्रयोग, संगीतिका अगर नृत्य यांची लोकप्रियता प्राप्त करून दिलेली आहे. बेला अख्मादुलिना ही तर वर्षातून कमीत कमी २५० काव्यवाचनाचे कार्यक्रम करते. मायकोव्हस्कीने जाहीर काव्यगायनाची प्रथा पाडली. मायकोव्हस्की एकदा ओडेसा बंदरात उभा असताना त्याच्या भोवती खलाशांची व गोदी कामगारांची एकच गर्दी उसळली. गोदी कामगारांनी त्याला सांगितलं की, मित्रा ! तुझी कविता आम्हाला फार आवडते परंतु तुझी पुस्तके आम्हाला परवडत नाहीत. जरा किंमती कमी ठेवीत जा. मायकोव्हस्कीप्रमाणेच एव्हटुशेंकोच्या कवितांचा खप जबर आहे. रशियासारख्या खंडप्राय विशाल देशात त्याची कविता गाईली जाते. 'बाबी यार' या कवितेने तरुण कवींना स्फुरण चढले आणि वोझ्नेसेन्स्की, स्लुट्स्की यांच्या प्रभावी स्फोटक कवितेला भरती आली. शब्दाचे सार्वभौम स्थान मान्य झाले, विचार स्वातंत्र्याचा झेंडा फडकविला गेला. प्रचलित रशियन समाजातील विषमताजन्य अन्याय, जनतेची सांस्कृतिक कुचंबणा, जीवनाला आलेली क्षुद्रता व सामान्यता या सर्वांचा स्फोटक उद्गार नवीन रशियन काव्यात उमटला. 'बाबी यार'ची लोकप्रियता इतकी वाढली की, महान् संगीतज्ञ द्मित्री शास्ताकोव्हित्र यांनी आपल्या तेराव्या Symphony करिता तिची निवड केली. शास्ताकोव्हिच् यांनी तिचे संगीतीकरण केले. याच सुमारास निकिता क्रुश्चेव्ह यांनी या तरुण कवींवर, चित्रकारांवर, संगीतज्ञांवर टीकेचे हत्यार उपसले. वोझ्नेसेन्स्की व एव्हटुशेंको यांची लोकप्रियता, जनतेमध्ये निर्माण झालेली निर्भय बंडखोरी पाहून, रशियात हंगेरीप्रमाणे एखादे 'पेतोफी सर्कल' निर्माण होते की काय याची त्यांना भीती वाटू लागली. हंगेरियन क्रांतीचे पुढारी पेतोफी मंडळाचे सभासद होते. त्यांनी जसा शासनाविरुद्ध जनतेत प्रतिकार निर्माण केला तसा प्रकार रशियात होऊ नये म्हणून क्रुश्चेव यांनी टीकेचा भडिमार केला. (या प्रकरणाची संपूर्ण हकीकत पुढील अंकी देऊ). शास्ताकोव्हिच् व एव्हटुशेंको यांची अवहेलना करण्यात आली.

एव्हटुशेंकोची दुसरी अतिशय प्रसिद्ध कविता म्हणजे 'स्टॅलिनचे वारसदार' ही होय. या प्रक्षोभकारी कवितेत जुलुमाचा प्रतिकार करा, अन्यायापुढे मान वाकवू नका, निर्भयता स्वीकारा असा संदेश कवीने दिलेला आहे. ५ मार्च १९५३ रोजी स्टॅलिनचा मृत्यु झाला. एका तमोयुगाचा अंत झाला, आधुनिक काळातील नरमेधाचा विधाता अंत पावला. जगातील अत्यंत नीच क्रूरतेचा मेरुमणी अंतर्धान पावला. ही घटना भयंकर होती. रशियन जनतेवर कोसळलेल्या संकटकालाची समाप्ति झाली. स्टॅलिन गेला, परंतु स्टॅलिनचे वारसदार अजून जिवंत आहेत. त्यांचा बीमोड केला पाहिजे असे निर्भय आवाहन एव्हटुशेंकोने केले. स्टॅलिनच्या समाधीवर जबरदस्त पहारा बसवा नाही तर 'lest Stalin

rise again and with Stalin the past'. एका ठिकाणी कविनेच त्याने म्हटले आहे 'Not for nothing do Stalin's heirs have their share of heart attacks.' कोझलॉव्ह या जुन्या स्टॅलिनवादी पुढाऱ्याच्या हृदयविकाराचा हा स्पष्ट उल्लेख आहे. 'स्टॅलिनचे वारसदार' या कवितेत एव्हटुशेंकोने झोटिंगशहांच्या जुलुमाचा प्रतिकार करा असा संदेश दिलेला आहे.

'The Prospectors of the Future' या कवितासंग्रहाने एव्हटुशेंकोच्या काव्याचे प्रकाशन सुरू झाले. १९५२ पासून आजतागायत एव्हटुशेंको अनिर्बंध काव्यरचना करीत आहे. वोझ्नेसेन्स्की व तो अखंड काव्यगायन करीत आहेत. त्यांच्या प्रतिभाशक्तीचा आविष्कार सुरू आहे. मानहानीचे, अपमानाचे प्रसंग त्यांच्यावर येऊन गेलेले आहेत. त्यांच्या काव्यावर प्रशंसेचा जसा पुष्पवर्षाव झालेला आहे तसाच टीकेचा प्रहारही झालेला आहे. परंतु पॅव्हेल ॲन्टोकोल्स्की प्रमाणे ते म्हणतात,

"You will not win the debate against us:
We are humanity
Such as you must now become."

रशियन काव्याची उज्ज्वल परंपरा त्यांनी पुढे चालू ठेवलेली आहे. जनतेशी ते समरस झालेले आहेत. जनतेच्या भावभावना, तिची सुखदुःखे, आशानिराशा आपल्या काव्यात शब्दांकित करीत आहेत. जातिवंत भावनांचा उद्रेक त्यांच्या काव्यात झालेला आहे. रशियन जनतेला कवि हा केवळ साहित्यकार अगर गायक वाटत नाही. कवि म्हटला म्हणजे बंडखोर योद्धा हीच त्यांची कल्पना आहे. रशियाच्या जुलमी राज्यसत्तेला कवींचे भय नेहमीच वाटत आलेले. आहे. पुष्किन नंतर लर्मान्टॉव्ह, नेक्रासॉव्ह, ब्लोक यांची राज्यसत्तेला भीती वाटत आलेली आहे. मायकोव्हस्की म्हणत असे "I want the pen to be equated with the bayonet" जुलुमी राज्यसत्तेला कवींनी नेहेमीच विरोध केलेला आहे. राज्यसत्तेविरुद्ध जनतेचा प्रक्षोभ वाढवून, जनतेला बंडखोर बनवून प्रतिकारास तयार करण्याचे कार्य कवींनी केलेले आहे. एव्हटुशेंको अशी प्रभावशाली काव्यरचना करतो की जी लोकांच्या कानात दुमदुमत राहावी. त्याची विद्रोही, विप्लवी कविता जनतेच्या अंतःकरणाला जाऊन भिडलेली आहे. जुलूमशहांनी कितीही बंधने घातली, कवींचा उपमर्द केला, त्यांचे कबुलीजबाब घेतले तरी त्यांच्या कवितेला आता जनमनात कायमचे स्थान मिळाले आहे. वाङ्मयाचे सार्वभौमत्व त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. त्यांच्यावर कितीही बंधने घातली तरी त्यांची

Art has always been reborn
From execution and torture
And has been sparked anew...

(व्होझ्नेसेन्स्की)

अशी भावना आहे. एव्हटुशेंको म्हणतो,

' Comrades,
You have to give words back
Their original meanings. '

शब्दांच्या सामर्थ्यावर त्याचा अपरंपार विश्वास आहे. याशिन्ने म्हटले आहे,

Let us be truthful
From now on
In everything,
Till the end
In the name of future
Let us not try to embellish.

(अपूर्ण)

मराठी नाटक : सद्यःस्थिति

वामन कृष्ण चोरघडे

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मी जे विचार व्यक्त करणार आहे त्यांचे स्वरूप काहीसे जुजबी आणि स्थूल असेल. काळाची मर्यादाहि या विचारांना आहे. महाराष्ट्र सरकारने गेल्या १२ वर्षांपासून एक नाट्यपरीक्षण मंडळ नेमले. महाराष्ट्र सरकारच्या रंगभूमीवर नाटके, तमाशे, मेळे, विविध मनोरंजनादि जे कार्यक्रम होतात त्यांची हस्तलिखिते या मंडळाकडे परीक्षणासाठी पाठविली जातात आणि मंडळाने प्रयोगाला योग्य ठरविलेले कार्यक्रमच रंगभूमीवर येतात. या मंडळाचा सदस्य या नात्याने गेल्या पाच वर्षात हस्तलिखिते मला वाचावी लागली. याशिवाय मराठी–हिंदी नाटकांचे अवांतर वाचन मी केले. या वाचना-मध्ये जो संतोष लाभावयास हवा, तो लाभला नाही. आजची मराठी नाट्यसृष्टी प्रगतीच्या दृष्टीने कितपत पाऊल उचलू शकली यासंबंधी काही वस्तुस्थितिदर्शक अंदाज मला व्यक्त करावयाचे आहेत.

एप्रिल १९६४ ते मार्च १९६५ पर्यंत नाट्यपरीक्षण मंडळापुढे रंगभूमी-वरील प्रयोगासाठी जी हस्तलिखिते आली त्यांचे आकडे खालीलप्रमाणे:––मराठी नाटके ४५६, गुजराती ११९, इंग्रजी २२, हिंदी ६३, कोंकणी ९६, मल्याळम् ३१, तामीळ २९, कानडी २८, तेलगू १२, उर्दू ३, बंगाली २२, ईस्ट इंडियन मराठी ४, तुळू १, संस्कृत ६, राजस्थानी ६, गोंडी १, सिंधी १, जर्मन २; तमाशांची संख्या ३०६; मेळ्यांची संख्या २०२; आणि विविध कार्यक्रम १८९.

या अवधीमध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी नाटके मला वाचावी लागली; त्यांची संख्या सुमारे २११, तमाशे ६९, मेळे ६२ आणि विविध मनोरंजनाचे कार्यक्रम ७४. अवांतर हौसेने जी नाटके वाचली त्यांचा अंतर्भाव यात केला नाही. सुमारे २००–२५० नाटके वाचल्यानंतर मराठी नाट्यसृष्टीचे जे चित्र मला दिसले ते फारसे उत्साहवर्धक नाही.

नाट्यप्रयोग पूर्वीसारखे रंगत नाहीत, असे सर्वत्र आज बोलले जाते. नाट्य-लेखन सदोष आहे की प्रयोग दिग्दर्शन ? की मराठी प्रेक्षक वर्ग काही उच्च आकांक्षा नाटकासंबंधी बाळगतो आणि त्याची आकांक्षा पूर्ण होत नाही ? तसे पाहिले तर आज नाट्यतंत्र पुष्कळ पुढे गेले आहे. नवे नवे तांत्रिक प्रयोग यशस्वी रीतीने हाताळले जातात. दिग्दर्शनाच्या बाबतीत काही कसूर होते असे

म्हणता येत नाही. नाटक बसविण्यासाठी भरपूर मेहनत घेतली जाते आणि तरीही नाटकाचा रंगभूमीवरील प्रयोग प्रेक्षकांच्या दृष्टीने यशस्वी होत नाही. गेल्या वर्षी काही नाटके कसून मेहनत घेऊन बसविण्यात आली आणि अयशस्वी ठरली. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी नाट्यव्यवसायिकांना जुनी, रुळलेली पूर्वपरिचित अशी नाटके रंगभूमीवर आणावी लागली. आजचे यशस्वी नाटककार श्री. वसंत कानेटकर यांचे 'जेव्हा रायगडाला जाग येते' हे नाटक खूप गाजले. पण ती लोकप्रियता त्यांच्या 'मोहिनी' व 'मत्स्यगंधा' या नाटकांना मिळाली नाही. श्री. पु. ल. देशपांडे यांचे 'तुझे आहे तुजपाशी' हे हमखास यश देणारे नाटक एखादेच. रांगणेकरांची नाटके सहसा पडत नाहीत पण त्यांनी नुकतेच लिहिलेले 'पतित एकदा पतित का सदा' या नाटकाने जोर धरला नाही. 'तानसेन', 'बहुरुपी हा खेळ असा' यांच्यासाठी खूप परिश्रम करण्यात आले, पण प्रेक्षक मात्र तृप्त झाले नाहीत.

कधी असे वाटते की प्रेक्षकांची अभिरुची एकसंध अशी राहिली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण, व्यवसाय इत्यादींच्यामुळे जो नवा प्रेक्षकवर्ग अस्तित्वात आला त्याला अति–आधुनिक, नैतिक आणि सामाजिक कल्पनेवर आधारलेले नाटक हमखास रुचेल, अशी स्थिती नाही. नवल असे की जुन्या सोज्वळ, सांस्कृतिक कल्पनेचा आधार घेऊन मानवी मनाचा कारुण्यपूर्ण दुबळेपणा दर्शविणारे श्री. बाळ कोल्हटकर यांचे 'वाहतो ही दुर्वांची जुडी' हे नाटक कमालीचे यशस्वी झाले. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा या दृष्टीने अभ्यास उद्बोधक होऊ शकेल.

एखादे नाटक प्रेक्षकांना आवडले म्हणजे ते नाटक चांगले, असे समजणे धोक्याचे आहे आणि प्रेक्षकाला आवडेल तसे नाटक लिहिण्याची प्रवृत्ती होणे हे तर त्याहून धोक्याचे आहे. प्रेक्षकांच्या आजच्या अभिरुचीचा अंदाज रंगभूमीच्या बाबतीतच अस्थिर आहे, असे नव्हे. चित्रपट सृष्टीतही तीच स्थिती आहे. प्रगतीच्या दृष्टीने श्रेयस्कर मार्ग म्हणजे नाटके उत्तम लिहिली जावीत, उत्तम बसविली जावीत आणि त्यामुळे प्रेक्षकांच्या अभिरुची वाढीला लागाव्यात.

या दृष्टीने विचार केला म्हणजे मराठीच्या नाट्यप्रगतीची जबाबदारी मुख्यतः नाटककार आणि दिग्दर्शक यांच्यावरच येते. नाटक लिहून यशस्वी झाले तर लेखकाला इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारापेक्षा आज आर्थिक प्राप्ती अधिक होते. हे खरे आहे. यशस्वी नाटककार दर प्रयोगाचे मानधन ४०, ५० किंवा त्याहून अधिक असे घेतो. वर्षभर नाटक उत्तम चालले तर कादंबरी, कथा यापेक्षा नाट्यलेखक अधिक द्रव्यार्जन करतो. त्यामुळे प्रत्येक लेखकाला आज नाटक लिहावेसे वाटते. ही वस्तुस्थिती आशाजनक असली तरी तिच्यात अनर्थाची बीजे आहेत. आज मराठी नाटक त्याच अवस्थेतून जात असावे.

काही नाटके आणि नाटककार यांची उदाहरणे घेऊन चर्चा करण्याचे येथे प्रयोजन नाही. त्यातून काही निष्पन्न होण्याऐवजी वादच निर्माण होईल. मराठी नाटके वाचल्यानंतर मला जे जाणवले त्यांचा सारांश असा:—

(१) उत्तम नाटके शेकडा १ किंवा २ पेक्षा अधिक प्रमाणात मला आढळली नाहीत. काही नाटके आवडली पण ती प्रयोगदृष्ट्या यशस्वी झाली नाहीत.

(२) बहुसंख्य नाटकांचे लेखक नाट्यतंत्राचा गंध नसलेले दिसतात. काहीतरी लिहावे, कोठे तरी त्याचा प्रयोग व्हावा आणि त्या नाटकाचे मग नाव निशाण दिसू नये, असे प्रकार अधिक दिसून येतात.

(३) परकीय भाषांतील भाषांतरे, रूपांतरे यांचे प्रमाण अधिक आहे. आणि रूपांतर करताना जो साक्षेप बाळगायला हवा तो अभावानेच दिसून येतो.

(४) प्रेक्षकांना गंभीर नाटक नको, विनोदी खुसखुशीत नाटक हवे, अशी कल्पना नाटककारांनी उगीच करून घेतल्यामुळे खालच्या दर्जाचा विनोद, अश्लील मानला जाईल इतका पाचकळपणा, विविध राजकीय पक्षांची टिंगल–टवाळी ! राजकीय–सामाजिक पुढाऱ्यांना विनोदविषय करणे इत्यादि प्रकार बहुतेक हस्तलिखितांतून आढळून आले. विनोदाचे प्रयोजन काय, यासंबंधीची प्राथमिक कल्पनादेखील बहुतेक हस्तलिखितांतून आढळून येत नाही.

(५) प्रेक्षकांना हसविण्यासाठी निंदानालस्तीचा सवंग मसाला आपण वापरतो त्याचे सामाजिक अभिरुचीवर दूरगामी परिणाम काय होतील यासंबंधी यत्किंचितही विचार बहुसंख्य नाट्यलेखकांनी केलेला आढळला नाही. गांधीजी, पंडित नेहरूंपासून तो प्रांतीय मंत्री, निरनिराळ्या अधिकारावर काम करणारी मंडळी यांची टिंगल हीन पातळीवरून केली जाते. 'वेळेवर न यायला मी काही मुख्यमंत्री थोडाच आहे', इतक्या सवंग रीतीने नाटकात विनोदासाठी मसाला वापरला जातो.

(६) कथानके ठराविक साच्याची. कुणाचे तरी कुणावर प्रेम किंवा कुणाचा तरी कुणाला द्वेष, अशासारखी कथानके अधिक प्रमाणात दिसतात. गाजलेल्या नाटकांची भ्रष्ट नक्कल त्याच त्याच साच्यात वाचायला मिळते. नानावटी प्रकरणावर लिहिलेली कितीतरी नाटके गेल्यावर्षी वाचावी लागली. समाजात जे घडते ते जसेच्या तसे संवादात लिहून काढले की नाटक झाले, अशीच बहुसंख्य लेखकांची नाटकासंबंधीची कल्पना दिसून येते. भाषेचे अज्ञान, शब्दांचे अर्थ न कळणे, अशुद्ध वाक्प्रचार यांची आता इतकी सवय निदान मला तरी झाली आहे की आपण जे लिहितो–बोलतो तेच मुळी चूक आहे, असे वाटू लागले आहे. या

भाषने काही वेळ करमणूक होते पण पुढे किळस वाटू लागते. 'विशय' (विषय), 'वेक्ती' (व्यक्ती), 'रागाणे' (रागाने) असले शब्द ऐंशी टक्के हस्त-लिखितांतून वाचावे लागतात.

या वस्तुस्थितीचा परिणाम म्हणजे आपल्याला वाङमय आणि प्रयोग या दोन्ही कसोटीला उतरणारे एखादे चांगले नाटक यापुढे वाचायला किंवा पहायला. मिळणार की नाही अशी शंका येऊ लागली आहे.

बहुसंख्य लेखक नाटक लिहायचे मनात आले म्हणूनच आपण नाटककार व्हायला लायक आहोत, असे मानतात की काय कोण जाणे !

प्रथितयश लेखकांमध्ये दुसरी एक प्रवृत्ती दिसून येते; ती देखील भयप्रद आहे. कथा, कादंबरी, काव्य या क्षेत्रात आपण यश मिळविले; आता एखादे नाटक लिहून टाकू; आहे काय त्यात ? अशा वृत्तीने नाटचलेखनाला ते प्रवृत्त होतात. पण कथा, कादंबरी यांच्या यशाचे गमक आणि नाटकाच्या यशाचे गमक सर्वस्वी भिन्न आहे, हे नाटक लिहून झाल्यावर त्यांना कळून येते. पण तेव्हा उशीर झालेला असतो. रंगभूमीच्या मखमली पडद्यावर डाग पडायचा तो पडून जातो.

आजच्या नाटचसृष्टीचे हे चित्र असे निराशाजनक आहे. शोधूनच बघतो म्हटले तर एक आशाकिरण आहे. नाटक लिहावे, या इच्छेने प्रेरित होऊन लेखणी उचलणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. कोणी सांगावे, त्यांच्यातून एखादा जिद्दीने पेटून मी उत्तम नाटक लिहीनच लिहीन, अशी प्रतिज्ञा तडीस नेणारा निघून जाईल. आजची रंगदेवता अशाच अनन्यभक्ताची आतुरतेने वाट बघत आहे.

मराठी रंगभूमीची परंपरा सांभाळणारा दमदार नाटककार निर्माण व्हावा आणि मराठीचा नाटचवेडा प्रेक्षक त्याच्या नाटचाने बेहोष व्हावा अशी अपेक्षा करणे येवढेच आपल्या हाती आहे. निराशेच्या झटक्यात सबंध जीवन काळेवेरे करून घेणे परवडण्यासारखे नाही.

तथास्तु !

दिनकर नीलकंठ देशपांडे

—एक निर्विकार सायंकाळ.

अशावेळी—

माझी आजी मला आठवते. ती आम्हा मुलांना सांगायची—

सायंकाळी वाईट गोष्टींचं चिंतन करू नये, कारण त्यावेळी इच्छादेवी भ्रमण करीत असते, ती म्हणत असते—

तथास्तु ! तथास्तु !!

आपण कुणाचं वाईट चिंतायचं अन् त्याचवेळी तिनं म्हणायचं—

तथास्तु !

या गोष्टीचा पगडा माझ्या मनावर फार जबरदस्त आहे. म्हणून मी कुणाचं वाईट चिंतीत नाही.

माझा एक जानी दोस्त आहे—मोठा लफडेबाज, लोक त्याला फसव्या, लवाड म्हणतात—

मी जी सभ्य मित्रांची यादी केलेली आहे त्यात या मित्राचं नाव अगदी ठळक अक्षरात वर लिहिलेलं आहे !

" × × × " !!

हा मला नेहमी पैशानं गंडे घालतो. फसवितो. थापा मारून पैसे नेतो. अहोरात्र खोटं बोलतो. माझ्या सिगारेटस् स्वतःच्या समजून पितो. दुसऱ्यांनाही ऑफर करतो. आपुलकीच्या भावनेनं ! तरीहि मी त्याच्यावर चिडत नाही, रागावत नाही. कावत नाही. कारण मला रागावताच येत नाही. हा मित्र हसतो मोठा छान ! निर्मळ हसतो. याचे दात स्वच्छ आहेत. मी याचं—वारशा नंतरचं नाव बिलंदर ठेवलेलं आहे ! त्याला ते फार फार आवडलं नि आवडतं—आजच्या ग्रामीण कथातून येणारे " × × "..." × × × " ह्या शब्दांची विशेषणं लावून मी त्याच्याशी बोलत असतो. तरीहि हा आपले शुभ्र दात काढतो. ह्या बिलंदराजवळ मी हजारो रुपये पाहिले आहे. तेव्हाही—तो मटन-मुर्गीसाठी माझी संगत करतो. आणि दीड दमडीला महाग असताहि तो मजकडे न चुकता करोडो रुपयाच्या योजना सांगतो.

'गीता' नावाचा एक आपला पवित्र ग्रंथ आहे. आजच्या पिढीला तो ऐकून माहित असेलच...त्यात स्थितप्रज्ञाची लक्षणं सांगितली आहेत......बस् हीच

लक्षणं ह्या मित्राला लागू आहेत. त्याने ही स्थितप्रज्ञाची स्थिति कुठे आत्मसात केली हे मला माहीत नाही, पण तो आहे मात्र संयमी ! स्थितप्रज्ञ ! !

'गाढवा'ची ओळख सर्वांना या ना त्या कारणाने असते—उपमेने, वृद्धीने, चित्राने किंवा रस्त्यावर प्रत्यक्ष पाहिल्याने.—गुळ आणि गुळाचे कागद तो एकाच चवीनं चघळत असतो.—

बस्स् ! याच चवीनं—भावनेनं निर्विकार चेहऱ्यानं माझा बिलंदर स्नेही सुखदु:ख खातो, पितो... ! म्हणूनच तो मला आवडतो.

अशा बिलंदराचे मी कधीहि वाईट चिंतीत नाही. माझ्या लाडक्या आजीला ही गोष्ट सांगितली असती तर तिचे डोळे आनंदानं भरून आले असते.

पण ! !

हा आनंद आता अनंतात विलीन झाला आहे. आमच्या पिढीनं आजी अनुभवली आहे— आजच्या पिढीनं आजी ऐकली आहे !

'आजी' हा सृजनशील संप्रदाय नष्ट होऊ पाहात आहे...जवळ जवळ झालाच आहे !

—निर्विकार समयी मला आजी आठवते.

गोलाकार बसून गोष्टी ऐकण्याचा तो काळ आठवतो. 'शुभं करोति'चे दिवस अजूनहि नजरेपुढून हलत नाहीत. आजीचं जुनेरं अंगावर घेऊन झोपण्याचा तो ऊबदार काळ आठवतो. त्या जुनेऱ्यासाठी केवढे भांडणं–तंटे व्हायचे आमचे !

आज माझ्या भांडणाच्या मर्यादा वाढलेल्या आहेत. पण ह्या भांडणाला त्या आत्मीयतेचं तेज नाही. ती आपुलकी नाही. भांडणासाठी भांडण आहे. 'तत्त्व' नावाच्या तकलुफी वस्तूला समोर ठेवून आजचा भांडणाचा काळ आहे !

—माझी आजी स्थितप्रज्ञ होती.

आमच्या घरात माझे आजोबा जमदग्नी म्हणून अवतरले होते.

आजा–आजीचं मरेपर्यंत पटलं नाही. आजोबांच्या चिडण्याची कारणं अतिशय क्षुद्र आणि क्षुल्लक असायची ! आम्हाला बुढा–बुढीच्या भांडणात गंमत वाटायची. आजोबा कामानिमित्त फिरतीवर गेले म्हणजे घरात स्मशान शांतता पसरायची, चुकल्या चुकल्यासारखं वाटायचं !

अशा वेळी आजी नेमानं एकदाच जेवायची—भांडणाशिवाय दोन वेळा जेवण घेणं तिला जमत नसे !

मी आजीला पुष्कळ वेळ रडतांना पाहिलं आहे. मी काही विचारलं तर मला पोटाशी धरायची—कुरवाळायची 'तुला काही समजत नाही' म्हणायची !

मी पितृत्वाच्या पदाला पोचलोय परंतु मला माझ्या आजीच्या रुदनरहस्याचा उलगडा अजूनहि झाला नाही—त्यावेळी भारत ब्रिटिशांचा गुलाम होता

अन् भारतीय स्त्री—"गुलामांची गुलाम होती." एवढं मला कळतं, पटतं नि आठवतं मात्र—पुसट रेघेसारखं !

विलंदर आणि आजी ह्या दोन पिढीतील स्थितप्रज्ञांना पाहून मला एका संताची आठवण म्हणा मुलाखत म्हणा, आठवते. तुम्हाला ती आवडेल—

आवडणारहि नाही पण ती न सांगण्याचा मोह मला आवरता येत नाही !

मोह आहे...! मोहच तो !! मोहावर विजय मिळविण्याच्या परमोच्च बिंदूवर माझी झेप गेली नाही, कारण माझ्या 'संयमी' पंखातील ताकद अजून चिवचिव नि मांसल आहे ! अगदी अंड्यावाहेर पाहणाऱ्या अजाणता एवढी !

जो साधतो तो साधु ! साधूचे प्रकार अनेक—संसारातील संधिसाधु आणि सदा इश्वराकडे नजर अन् काही साधतं काय यात मन रमलेले !

माझ्या 'साधू'ची अवस्था मला नीट उलगडली नाही ! मी प्रयत्न केला नाही अन् करणार नाही !

मी एकदा भजनाच्या कार्यक्रमाला गेलो होतो. श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. माझं वंडखोर मन उगाचच प्रेक्षकांतून फिरत होतं. फार वाईट खोड आहे माझ्या मनाची ! भजनाचे शब्द रसाळ होते पण. .चाल. . .कुठेतरी–'पाहता, पाहता' ऐकल्यासारखी वाटत होती. "निर्माल्याच्या हाराचा दोरा काढून त्यात ताजी टवटवीत गुलाबगेंद ओवण्याचा हा खटाटोप पाहून मनाला उद्वेग आला."

साध्या चाली मनाला गोड वाटतच नाही का ? एक शंका मनाला स्पर्शून गेली.

पंढरीच्या रखरखीत वाळवंटात हरिनामाचा गजर किती साध्या चालीत होत असतो.

रामदासांचे श्लोक पाळण्यावर वसून आजोबांनी आपल्या भरड्या आवाजात आळविलेले मी ऐकले आहे. . .त्यावेळी माझ्या भावना का उचंबळून येत होत्या ?

अनेक प्रश्नांच्या खोड्यात माझी मान सारखी अडकत होती. म्हटलं साधुलाच विचारावं—

'भजन संपलं तसा मी समोर झालो. साधूचा गैरसमज असा झाला की, मी त्याच्या पायावर डोकं टेकायला येत आहे. ते आशीर्वादाच्या पवित्र्यात सरकले—

भारतातील तमाम संतांबद्दल आदर असूनहि मला माणसांनी माणसाच्या पायावर डोकं ठेवण्याची पद्धत अमानुष, रानटी वाटते !

मन कुठून तरी आक्रंदून उठतं— ही आपल्यासारखीच हाडामासाची नि आपल्याच सारख्या मरणांनी मरणारी माणसं—! यांना हे साधुत्व आलं कुठून ? कुठल्या अवयवात वाढ झाली यांच्या ! ही आमच्या पासून आगळी कशी ?

माझ्या अंतर्यामातील अनेक कप्यांची दारं उघडी पडतात. एक विशाल प्रश्नचिन्ह डोळ्यापुढे उभं राहतं--जगात श्रेष्ठ कोण ?

'? ? ?' !

ईश्वर निर्मित साधा माणूस की,

ईश्वराच्या शोधाला निघालेला 'साधु' माणूस

'बुद्धि हे ब्रह्म आहे' .! युद्धाच्या रणकंदनात पार्थाच्या कानात कुज-बुजलेला हा मूलमंत्र आम्ही विसरलो. विसरतो.

माणसांनी माणसाच्या पायावर डोकं ठेवायचं ही अमानुषता की आदराची अतिशयोक्ति–की आम्ही आमच्यातील 'मी'ला विसरलो—

मला वाटतं—माझ्यातील माणूस हरवतो तेव्हा असं घडत असावं. माणसा-तील माणूस हरवल्यावर माणसाजवळ उरतं काय ?

एक सरळ साधा प्रश्न !

अनेक व्याधींचा मांसल सांगाडा की, अचेतन वृत्ति !—जो आपसातील मानव्य सहजगत्या विसरतो मग तो साधुत्वाच्या मागे का लागतो ? तो सरळपणे देवाच्या पायावर डोकं का टेकीत नाही--"साधु" म्हणजे 'मोक्षा'चा सौदा साधून देणारा दलाल काय ?

"दगड–धोंड्याच्या–कापूर–शेंदराच्या ह्या दगडी वास्तूवर 'ईश्वर' म्हणून त्याची श्रद्धा नाही की, त्याला इश्वराचं इश्वरत्व नामंजूर आहे ? "

लबाड आणि समंजस माणूस याचं उत्तर देतो—

'तुला हे गम्य नाही !'

आमचा गुंता आम्हालाच सोडविता येत नाही !

अशा वेळी मला माझी आजी अन् माझा बिलंदर मित्र आठवतो.

दुःख–सुख एका चवीनं खाणारी स्थितप्रज्ञ माणसं--सामान्याच्या जगात वावरून 'साधुत्वा'ला पोहचलेली दोन शरीरं !

म्हणून कोणत्याही पोहचलेल्या 'साधू'पेक्षा मला ही आदरणीय आहे—वयाचा मोठेपणा विसरून मी माझ्या बिलंदर मित्राच्या पायावर डोकं ठेवलं आहे !—आजीच्या चरणी तर माझं सर्वस्व अर्पण केलेलं आहे !

—निर्विकार सायंकाळी अनंत विचार माझ्या मनात येत असतात—

'माणसातील माणूस जागा केला पाहिजे !'

आजीच्या म्हणण्याप्रमाणे इच्छाशक्ति जिवंत असेल तर ती म्हणेल—

तथास्तु ! तथास्तु !! तथास्तु !!!

एक तपस्वी चित्रकार—

"चूप राहूनहि खूप बोलता येते" हे वाक्य त्यानंतर मी कधीच विसरू शकलो नाही. त्या वाक्यावर नेहमी—विशेषतः जेव्हा मी एकटाच असतो, विचार करीत राहतो. जितका जास्त विचार करतो तितकी त्या वाक्यातील गंभीरता आणि सखोलता जास्त जास्त जाणवते. जणु हे वाक्य म्हणजे श्री. विनायक मासोजी यांच्या जीवनातील रस आहे—त्यांच्या जीवनाची फलश्रुति आहे.

त्यांच्या त्या उंच, सरळ, काळाने झुकविलेल्या तरीहि तितक्याच विनम्र आकृतीकडे पाहिलं की आपल्या मनावर एकदम छाप पडते; आपण त्यांच्याकडे सहजपणे आकृष्ट होत जातो. प्रथम दर्शनी ही छाप जरी त्यांच्या व्यक्तित्वाची असली तरी जसजसा त्यांचा सहवास वाढत जाईल तसतसे त्यांच्या गुणाचे दालन उघडत जाईल. त्यांचा अबोलपणाच जास्त बोलका होतो आणि त्यांच्या कलाकृती-तून जणु त्यांचे रूप आपण पाहात जातो. त्यांच्या चित्रकृति साक्षात बोलत जातात.

"विद्या विनयेन शोभते" असं म्हणतात. ते खरंहि आहे. परंतु या सूत्राची प्रत्यक्ष सांगड किती महाभागात आढळते? विनयाचं खरं दर्शन घ्यायचं असेल तर एकदा श्री. विनायक मासोजी यांच्या सानिध्यात काही काळ घालवा म्हणजे आपणास गंगोत्रीत न्हाल्यासारखं वाटेल. विशेषतः त्यांच्या हिमालयातील प्रवासाचं

श्री. विनायक मासोजी



भांजीभाई पाटणकर,
बी. ए., बी. टी.

रसभरित वर्णन त्यांच्याच तोंडून ऐकलं की ऐकणारा भारावून जातो आणि त्याला त्यावेळी तरी त्यांच्या बरोबर हिमालयाचा प्रवास करतो आहोत अशी अनुभूति होते.

या प्रवासात त्यांच्याबरोबर त्यांचा एक फोटोग्राफर जपानी मित्र होता. ते दिवस दुसऱ्या महायुद्धाचे. जपानी माणूस म्हटला की त्याला कुठे थारा मिळणं अशक्यच ! अशाहि परिस्थितीत श्री. मासोजींनी शेवटपर्यंत त्याची साथ केली; आणि " राम–लखनका जोडा " या साधु–वाक्याची सत्यता पटविली. 'Believe me to the end' हे वाक्य त्या जपानी फोटोग्राफरच्या जपानी लिपीत अगदी उठून दिसते. यावरून हे स्पष्ट होते की मासोजी केवळ आंतरदेशीय ख्यातीचे चित्रकारच नाहीत तर ते एक अव्वल दर्जाचे मित्र पण आहेत.

या सर्व प्रवासाचा साक्षात्कार त्यांची चित्र–मालिका पाहिल्यावर अगदी उत्कटपणे होते. त्यांच्या जीवनातील पावित्र्य, तपस्या, निष्ठा, विनयशीलता, श्रद्धा या सर्व गुणांचा संगम त्यांच्या चित्रात आढळतो. अखेर असं वाटतं की मासोजी सारख्या सन्यस्त वृत्तीच्याच माणसांनी हे अचाट कृत्य करावं–येरा गबाळ्याचे काम नोव्हे !


स्वर्गीय रवीन्द्रनाथ टागोरांचे ते आवडते शिष्य. त्यांच्या विषयीचा नितांत आदर पाहिला म्हणजे गुरुभक्ती कशी असावी ह्याचंहि शिक्षण त्यांच्याकडेच घ्यावं असा मोह पडतो; आणि वाटतं आता ते गुरूहि गेले आणि शिष्यहि !

रवींद्रनाथांबद्दल आणि शांतीनिकेतनबद्दल बोलताना तर त्यांच्या स्मृती इतक्या भावनांकित होतात की अक्षरशः त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या ओलावतात व श्रोत्यांची हृदये पण ! आणि ते साहजिकच आहे. त्यांची कर्मभूमी म्हणजे शांती-निकेतनच्या खुल्या, पवित्र व विश्वबंधुत्वाच्या वातावरणात त्यांनी आयुष्याची तीस वर्षे प्रथम विद्यार्थी, शिक्षक आणि शेवटी व्हाईस प्रिन्सिपॉल ह्या नात्याने घालविली. १९२१ साली शांतीनिकेतनमध्ये प्रवेश मिळवून देण्यात व कलाक्षेत्रात मार्गदर्शन व उत्साहित करण्यात श्री. सॅम्युअल जोशी ह्यांना ते श्रेय देतात. वास्तविक बाल-पणात चित्रकलेत जशी त्यांची प्रगती तशीच संगीतातहि. या काळात वरचढ कला कोणती याचा निर्णय घेणं कठीण. परंतु पुढे जरी चित्रकलाच त्यांच्या जीवनाची सर्वस्व ठरली तरी संगीताची कास त्यांनी कधी सोडली नाही. आजहि त्यांना 'इसराज' वाजविताना ऐकलं की याची प्रचीति येते. संगीताने त्यांच्या चित्रकलेत भावविव्हल गोडवा ओतलेला आढळतो. कलेबरोबरच त्यांचे खेळातील प्राविण्य वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी 'चॅम्पीयनशिप' कधी सोडली नाही. असा हा अष्टपैलू चित्रकार आपल्या विद्यार्थी जीवनात सर्वांचा लाडका असावा हे साहजिकच आहे.

एवढ्यावरच त्यांची गति थांबली नाही तर त्यांना विश्वभारतीला नवीन युग निर्माण करण्याचे श्रेय आहे—हे सध्याचे कलाभवनचे प्रिन्सिपॉल श्री. व्ही. आर. चित्रा यांच्या उद्गारावरून स्पष्ट होईल.

'Under Nandlal Bose as Principal and Vinayak S. Masoji as Vice-Principal Kala-Bhavan developed certain characteristics which later on came to be known as the hallmark of the Shantiniketan school of art. Amongst factors which contributed to the development of such a school were freedom from academic and traditional bais, influence of the personality of Rabindranath Tagore and the intimacy of the social and natural environments—all of which made for the school a congenial atmosphere. By slow degrees the faculty came to have its own art language, its own particular style.'

टागोरांची त्यांच्याबद्दलची अपेक्षा मासोजींनी आपल्या चित्रसाधनेने अक्षरशः खरी करून दाखविली आहे. १९५१ साली जेव्हा विश्वभारती मध्यवर्ती सरकारने चालविण्यास घेतली त्याच वर्षी श्री. मासोजींनी आपल्या आवडत्या शांतीनिके-



राजगृह (बिहार) बुद्धतपश्चर्येची गुंफा—मागील प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर टेकड्यांचा आकार 'बुद्धपरिनिर्वाण'

तनाला रामराम ठोकला. उद्देश हा की आतापर्यंत मनात धगधगत असलेले चित्रविषय प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यास एखादे निवांत स्थान असावे. त्यांना नागपूर हे आपल्या साधनेस योग्य स्थान वाटून त्यानंतर ते नागपूरला स्थायिक झाले.




" Forgetting everything we embraced each other. "—हिलरी

एवरेस्ट विजय व हिलरी-तेनसिंग

हा तपस्वी चित्रकार समाजकार्यांत आणि देशकार्यातहि कधी मागे राहिला नाही. सर्वोदयात श्रमदान करण्यात जसे ते अग्रेसर राहिलेत तसेच १९३४च्या मुंबई कॉंग्रेस अधिवेशनात. तसेच १९३६च्या लखनौ अधिवेशनात रात्रंदिवस

खपून कला ह्याहि क्षेत्रात किती भरघोस कार्य करू शकते ह्याचा जनतेला प्रत्यय आणून दिला. तोहि अशा काळात की ज्या काळी काँग्रेसला स्वखुषीने काम करणारे कलाकार मिळणं दुर्मिळ असे. त्यांच्या खांद्याशी खांदा लावून काम करणारे महाभाग आज फळे चाखण्यात दंग आहेत आणि हा तपस्वी एका झोपडीत अज्ञातावस्थेत काळ कंठीत आहे.



विनोबा 'a woodcut'

१९२७ सालची गोष्ट ! लखनौ कलाभवनाचे त्यावेळचे प्रिन्सिपॉल श्री. अशितकुमार हलदार हे होते. त्यांचेकडे त्यावेळचे यु. पी.चे गव्हर्नर एक ट्राफी करण्यास आले. त्यापूर्वी ट्राफीचे डिझाईन परराष्ट्रातून तयार होऊन आले होते. पण गव्हर्नर साहेबांना त्यात भारतीय संस्कृतीचं काहीच चिन्ह आढळलं नाही

बँडचे सूर थांबले तसे नृत्य पण थांबले. टाळयांचा कडकडाट झाला व पेयाचे चषक रिते होऊ लागले.

"ज्यो परत कधी यायचा आहे ?" एका टेबलाशी बसत अशोकने विचारले.

"ते आता काय सांगणार ? पण काम खूप महत्वाचं आहे एवढंच तो बोलला," क्लारा हातातील चषकाशी खेळत म्हणाली, "तुम्ही इथे कोण कोण असता ?"

"अजून तरी एकटाच आहे मी."

"सुखी आहेस तू."

"तो कसा ?"

"विमानदलात शिरणाऱ्यानं मागे पाश जोडू नये. त्याने माणसाच्या हिंमतीला मर्यादा पडतात."

ती म्हणाली व जाण्यासाठी उठली. तिचा निरोप घेताना तिने पुढे केलेला हात त्याने आपल्या हातात घेतला. थोडया वेळाने त्याच्या लक्षात आले की त्याने तिचा हात खूप वेळ आपल्या हातात ठेवला आहे. शरमेने लाजून त्याने आपला हात तिच्या हातातून अलगद काढून घेतला.

क्लारा निघून गेली. हॉलमधील मंडळी हळूहळू पांगली. तो पण बाहेर आला व कठडयावर हात ठेवून तो कितीतरी वेळ अस्मानाकडे पहात राहिला.

"हॅलो, लकी बॅचलर, कसला विचार चाललाय्." त्याच्या तंद्रीचा भंग करीत, त्याच्या पाठीवर जोराने थाप मारीत जतीन म्हणाला.

"जीवनाचा विचार करतोय्."

"जीवन हे क्लाराचं दुसरं नाव दिसतंय्."

"जतीन !" अशोक त्याच्यावर जवळ जवळ ओरडलाच.

"रागाऊ नकोस यार. पण ती खरोखर सुंदर आहे. मला ज्योची कीव येते व तुझा मत्सर वाटतो."

"जतीन, ज्योचं तिच्याशी लग्न झालेलं आहे. ती त्याची बायको आहे. आपल्या कमांडरची बायको आहे. आज ती माझ्याबरोबर नाचली म्हणून उगीच पराचा कावळा करू नकोस !"

"तुला वाटतं तसं हा केवळ योगायोग नव्हता. ती तुझ्यावर मोहित झाली होती. ज्योचं आणि तिचं लग्न झालेलं असलं तरी ते विजोड जोडपं आहे."

"जतीन, ह्या जगात विजोड नाही कोण ? प्रत्येक जण misfit आहे. भलत्याच जागी बसवलेला आहे. या अथांग सागरात जीवनाची नाव भरकटतच कुठे तरी थांबते आणि तोच किनारा होतो. जीवनाचे ध्येय होते."

"वा वा, बहुत खूब. अच्छा मी चलतो. डोन्ट माईंड माय वर्डस्. गुडबाय."

जतीन निघून गेला. पुन्हा अशोक एकटाच उरला. हातातील सिगारेट संपेपर्यंत तो तेथेच उभा होता.

जळकी सिगारेट पायाखाली चिरडून तो बाहेर पडला. बाहेर हवेतला कुंदपणा हलकेहलके नाहीसा होत होता. गार वारे वहात होते. त्याच्या अंगावर एकदोन पाण्याचे थेंब पडताच त्याने आपली पावलं भराभर टाकायला सुरुवात केली, कारण त्याचा क्वार्टर कँटोनमेंटच्या अगदी टोकाला होता. तो थोडे अंतर चालून जात नाही तोच पावसाची एक सर आली. आसऱ्यासाठी तो बाजूच्या झाडाखाली उभा झाला. तेवढ्यात बाजूने एक मोटार येताना त्याला दिसली. त्याने हात हलवून मोटारला थांबण्याचा इशारा केला.

मोटार त्याच्यासमोर येऊन थांबली व समोरचे दार उघडून कुणीतरी त्याला मार्ग मोकळा केला. पावसाचा मारा चुकवीत तो उघड्या दारातून आत शिरला. आत शिरताच सेंटचा उग्र वास नाकात शिरून त्याचं मस्तक भिनल्यासारखं झालं. त्याने चमकून बाजूला बसलेल्या व्यक्तीकडे पाहिले व आश्चर्याने तो म्हणाला, "कोण ? क्लारा तू ?"

"ओह्, हॅलो कॅप्टन. या पावसात काय करीत होतास ?"

"भिजत होतो. आज तुझी मोटार नसती तर कठीण प्रसंग आला होता माझ्यावर. मला क्वार्टरवर पोचवतेस !"

"ते आपण मग पाहू. मघा नाचताना मी तुझ्या हातात होते, पण आता तू माझ्या हातात आहेस बरं !" क्लारा मोटार सुरू करीत खट्याळपणे म्हणाली.

अशोक तिच्याकडे पहातच राहिला.

मोटार आवारात शिरताच त्याच्या लक्षात आले की आपण तिच्या बंगल्यात आलो आहोत. यापूर्वी तो अनेक वेळा आपल्या सहकाऱ्यांसह या बंगल्यावर आला होता व ज्योच्या आतिथ्यशीलतेचा लाभ त्याने घेतला होता. पण आजची वेळ वेगळी होती. आज तो एकटाच होता व बरोबर फक्त क्लारा होती. पोर्चमध्ये गाडी थांबताच ती खाली उतरली. तो मात्र तसाच बसून राहिला.

त्याला बसलेला पाहून ती म्हणाली, "असा बसून काय राहिलास ! खाली उतर."

"ते आता माझ्या हातात आहे." अशोक मिस्किलपणे हसत म्हणाला, "मोटार होती म्हणून तू इथवर मला आणलंस. आता तू काही मला उचलून आत नेऊ शकत नाहीस. खरं की नाही ?"

" यू प्रेटी ब्रूट. फालो मी, " लटक्या रागाने त्याच्यावर ओरडत ती म्हणाली व मागे वळून पायऱ्या चढू लागली.

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात अशोक पण जागेवरचा उठला व तिच्या पाठोपाठ आत गेला.

सकाळी जेव्हा त्याला जाग आली तेव्हा त्याचं मस्तक जड झालं होतं. आपण कुठे आहोत याचा अंदाज घेताना त्याच्या लक्षात आलं की आपण आपल्या घरीच आहोत. क्लाराबरोबर तिच्या बंगल्यात शिरल्याचं त्याला आठवत होतं. तिनं आणून दिलेलं पेय घशाखाली लोटलेलं त्याला आठवत होतं. त्या पेयानं त्याचा घसा जळला होता. त्यापुढचं मात्र त्याला नीटसं आठवत नव्हतं. पुढे कुठे धुंदी होती. कुठे स्पर्शाचं पान देहावर फिरत होतं. कुठे गालावर उष्ण चटके बसत होते. वेगवेगळी क्षणचित्रे वाऱ्यासारखी इतस्ततः विखुरली होती. त्या विखुरलेल्या तुकडयांना एकत्र आणण्याच्या धडपडीत ते एकजीव होण्याऐवजी त्यांचे असंख्य तुकडे मात्र होत होते.

धडपडत तो उठला व भिंतीवरील आरशात त्याने आपला चेहरा पाहिला. त्याच्या गालावर, ओठावर लाल रंगाचे ओरखडे अजूनहि दिसत होते. जे काही घडलं त्याची साक्ष ह्या खुणा देत होत्या. त्यावरून बोटं फिरवतांना तो सुखावला.

कालच्या रात्रीसारखा पाऊस त्याने पाहिला नव्हता व रात्रीसारखे सुख उधाणदेखील अनुभवले नव्हते. त्या उधाणाच्या लाटेवर त्यानंतर कितीतरी दिवस तो तरंगत होता.

* * *

रोजच्या फ्लाईटसाठी तो एअरपोर्टवर दाखल झाला तेव्हा तेथे त्याला वेगळीच गडबड दिसली. जतीन दिसताच तो त्याला म्हणाला,

" कसली गडबड सुरू आहे ? "

" म्हणजे तुला ठाऊक नाही ? " आश्चर्याने त्याच्याकडे पहात जतीन म्हणाला.

" काय झालं ? "

" पाकिस्तानने आपल्या फौजा काश्मीरात घुसवल्या आहेत. आज आपल्याला आघाडीवरच जायचे आहे. " जतीन म्हणाला.

अशोकने विमानाकडे नजर टाकली. सगळ्या विमानांचं चेकींग सुरू होतं. अम्युनिशनच्या गाड्या विमानाजवळ उभ्या होत्या. त्यातून दारूगोळा विमानात चढविला जात होता. फ्युएल टँकरमधून इंधन भरलं जात होतं.

त्या दृश्याकडे पाहून तो भांबावला.

गले सात आठ दिवस तो वेगळयाच सृष्टीत होता. त्यामुळे बाहेर क्षणाक्षणाला बदलत असलेल्या परिस्थितीचे अंधुक ज्ञानसुद्धा त्याला झाले नव्हते. तो ज्या सृष्टीत वावरत होता, तेथे होते फक्त–सुख. सुखाची अनंत रूपे. क्लाराने जीवनाच्या रंगात त्याला रंगवून टाकले होते. जीवनाचा अर्थ त्याला आता कुठे कळायला लागला होता व इथे तर अनर्थ होत होता. युद्धाच्या कल्पनेने तो कावरावावरा झाला.

तेवढयात ज्यो आला व 'हॅलो ओल्ड पाल' असे म्हणून त्यानं त्याचा हात प्रेमभराने जोरात दाबला.

ज्योला अशोकविषयी सहानुभूती वाटायची. काही तरी अघटित करण्याच्या इर्ष्येने विमानदलात दाखल झालेल्या त्या कोवळया तरुणाकडे पाहिले की विविध भावतरंग त्याच्या मनात उचंबळून यायचे.

"तू इतके दिवस कुठे होतास ?" अशोकने त्याला विचारले.

"ते लष्करी गुपीत आहे, पण इतके दिवस बाहेर काढावे लागतील याची मलासुद्धा कल्पना नव्हती."

"क्लारा तुझी वाट पहात होती."

"पाहणारच. फार प्रेम आहे तिचं माझ्यावर. इतके दिवस तिला एकटीला जडच गेले असतील असं मला वाटलं होतं. कारण ती स्वच्छंदी मुलगी आहे. तिच्या नवऱ्याने तिच्याभोवती सारखा पिंगा घालीत असावा असं तिला वाटतं. पण यावेळी ती आनंदी दिसली. तिनं असंच वागायला हवं खरोखरी." ज्यो त्याला सांगत होता.

त्यावर अशोक गप्प राहिला. तो बोलणार तरी काय होता ? ज्योच्या क्लारावरील निस्सीम प्रेमाचा आविष्कार पाहून त्याला अपराध्यासारखं वाटत होतं व त्यामुळे ज्योच्या नजरेला नजर भिडविणे त्याला जड झालं होतं.

सायरनच्या आवाजात ज्योचा आवाज बुडून गेला. सगळयांची एकच धावपळ सुरू झाली. 'फॉल इन' झाल्यावर ज्यो वैमानिकांना योजना समजावून सांगू लागला.

"आपल्याला जम्मूच्या पश्चिमेस आपल्या हद्दीत घुसलेल्या शत्रूंची आक्रमक फळी मोडून काढायची आहे. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी ते सज्ज आहेत. शिवाय शंभरएक रणगाडयांचे संरक्षण घेऊन शत्रुसेना पुढे घुसत आहे. त्यांची आगेकूच थोपवून त्यांच्या लष्करी साहित्याचं जितकं नुकसान करता येईल तितकं आपल्याला करायचं आहे." ज्यो सांगत होता व असीम उत्साहाने प्रत्येकाची मनं भरून गेली होती.

अनुक्रमणिका

हुकूम मिळताच प्रत्येकजण आपापल्या विमानाकडे धावला. कॉकपिटमध्ये बसताच अशोकने आपल्या सहकाऱ्यांकडे हात हलवला व वरचे झाकण ओढून घेतले. कानावर हेडफोन्स चढवून तो उडण्याच्या प्रतिक्षेत बसला.

हळुहळू एकेक विमान धावपट्टीवरून पुढे सरकू लागले. उन्हात त्या विमानांचा पृष्ठभाग चकाकत होता व चांदीचा रस त्या धावपट्टीवरून ओघळत आहे असा भास होत होता. कंट्रोल टॉवरवरून संदेश येत होते, त्यांची नोंद घेत विमानं धावपट्टी सोडून अंतराळाकडे झेप घेऊ लागली. आकाशात गेल्यावर सहा सहा विमानांची चार फॉर्मेशन्स तयार झाली व त्यांनी वेगवेगळ्या दिशा धरल्या.

बाजूंनी ढगांचे पुजके मागे जात होते. हवा स्वच्छ होती, त्यामुळे समोरचे, खालचे सारे स्पष्ट दिसत होते. खालचा प्रदेश रम्य वाटत होता व तेथे थोड्याच वेळात आगीचे डोंब उसळणार होते.

ज्यो त्यांना मार्गदर्शन करीत होता. त्याने आर्टिलरीशी रेडिओ कम्युनिकेशन साधले. विमानांची मदत येताच आर्टिलरी पुढे सरकली व त्यांनी शत्रूवर आग ओकायला सुरुवात केली. खाली नजर टाकावी तिकडे सैनिक दिसत होते. रणगाड्यांच्या तोफा धडधडत होत्या. जमिनीवरून धुराची, आगीची कारंजी उडायला लागली होती.

इषारा मिळताच सारी विमानं खाली उतरू लागली. फायरचा इषारा मिळताच त्यांनी बॉम्बिंग सुरू केले. त्याबरोबर रणगाड्यांच्या विमानविरोधी तोफांनी आकाशाकडे आपली तोंडं वळवून विमानांवर दारुगोळा टाकायला सुरवात केली.

'धूमधडाड' असा आवाज करीत एक बॉम्ब अशोकच्या रोखाने आला. त्याने त्वरेने विमान वळवून त्या बॉम्बचा आघात टाळला व त्वेषाने त्या रणगाड्यावर हल्ला चढवून त्याचे तोंड बंद पाडले. त्यावेळी तो जमिनीपासून चारपाचशे यार्डांवर आला होता. खाली उडालेला गोंधळ त्याला दिसत होता. विमानांचा मारा चुकविण्यासाठीं रणगाड्यांची धुडं गरागरा फिरत होती. त्यांचा आधार तुटलेले सैन्य मागे हटून आडोसा शोधीत होते. मैदानावर उरले होते फक्त रणगाडे. विमानांच्या व तोफांच्या माऱ्यात सापडून त्यांची पूरी कोंडी झाली होती. केवळ नष्ट होण्यापलीकडे त्यांच्याकडून काहीच कार्य होत नव्हते.

तितक्यात समोरून शत्रूच्या जेट विमानांनी सपाट्याने हालचाल करून ज्योच्या विमानाला जवळ जवळ घेरले. ज्योने त्यापैकी एका विमानावर सरळ चाल केली व त्याची तेलाची टाकी फोडून टाकली. त्यासरशी ते विमान पेटले व धुराचा पुंजका मागे सोडीत खाली आपटले. त्याच्या ज्वाला व धूर अंतराळात

जिरू लागला. त्यांच्या स्क्वाड्रनमधील इतर विमानं वेगवेगळ्या दिशेने आली. त्यांना पाहताच शत्रूची विमानं वेगाने आपल्या मागाकडे निघून गेली.

शत्रूची आक्रमक फळी मोडून काढून व त्यांचे जबरदस्त नुकसान करून त्यांची विमानं जेव्हा एअरपोर्टकडे परतली तेव्हा सगळ्यांची अंतःकरणं अभिमानाने भरून आली होती. आजचा दिवस हा त्यांचा विजयाचा दिवस होता.

विमानतळावरून अशोक घरी परतत असताना त्याचे लक्ष ज्योच्या घराकडे गेले तेथेच खिळले.

क्लारा ज्योच्या बाहुपाशात होती व तो व्हरांड्यातच तिचे चुंबन घेत होता. तिचे लक्ष अशोककडे जाताच तिने ज्योच्या खांद्यावर ठेवलेला हात उचलून त्याला निरोप दिला. त्याने हसून त्या अभिवादनाचा स्वीकार केला व तो आपल्या क्वार्टरकडे वळला.

रात्र झाली. व्हरांड्यात आराम खुर्ची टाकून डोळे मिटून तो स्वस्थ पडून राहिला. आजचा दिवस देवाने त्याला पाहू दिला याबद्दल त्याने मनोमन आभार मानले. इतक्यात त्याच्या पायावर कुणीतरी वेगाने बसले व त्याच्या गळ्याभोवती हात पडले व त्याने डोळे उघडण्यापूर्वीच क्लाराचे ओठ त्याच्या ओठावर टेकले.

"क्लारा तू इथे ? आणि ज्यो कुठे आहे." तिचे हात दूर करण्याचा प्रयत्न करीत अशोक म्हणाला.

"डॅम हिम." आपले हात त्याच्या गळ्याभोवती आवेगाने टाकीत क्लारा म्हणाली, "तो गेला क्लबात. आज त्याने शत्रूचे एक विमान पाडले ना ! आता रात्री येईल मस्त पिऊन आणि मला नुसता छळेल !"

"पण त्याचे तुझ्यावर प्रेम आहे."

"माझे तुझ्यावर आहे." त्याच्या खांद्यावर मान टेकीत ती म्हणाली, "आज परमेश्वराने तुझा सांभाळ केला. ज्योने तुझा नंतरचा पराक्रम मला सांगितला बरं."

"नको क्लारा मला मोहात पाडू नकोस. तू ख्रिश्चन तर मी हिंदू. तू लग्नाचे बंधनं असलेली तर मी बंधनातीत. शिवाय ज्यो तुझ्यावर अपार प्रेम करतो."

"त्याचा आडदांडपणा मला बिलकुल आवडत नाही." त्याच्या छातीवर डोके घुसळीत क्लारा म्हणाली, "मला तू हवा आहेस. मी डायव्होर्स घेईन व तुझ्याशी लग्न करीन. चालेल तुला ?"

तिच्या प्रश्नावर तो काहीच बोलला नाही. त्याचे उत्तर देणे त्याला अवघडच गेले असते. कारण त्यादृष्टीने त्याने कधी विचारच केला नव्हता. भरतीची लाट आली होती व त्याबरोबर तो वाहवत गेला होता. प्रतिकाराचं बळ नव्हतं

म्हणून प्रवाहाबरोबर जाणं त्यानं पसंत केलं. पण त्याची अगतिकता हा संकेत समजला गेला होता. त्यावर आक्षेप कसा घ्यावा हे न सुचून त्यानं आपलं तोंड तिच्या केसात खुपसलं व सुगंधाच्या दर्पात तो डुंबून गेला.

*　*　*

"आज आपल्याला या ठिकाणी हल्ला करायचा आहे." नकाशावर बोट ठेवीत ज्यो म्हणाला.

रात्रीची वेळ होती. विमानतळावर शांतता होती. आजच्या उड्डाणाची सूचना अगदी वेळेवर मिळाली होती व त्यासाठी जतीन, ज्यो व अशोकची निवड झाली होती. ज्योजवळ कार्यक्रमाची रूपरेषा होती व ती तो त्या दोघांना समजावून सांगत होता. कार्यक्रमानुसार शत्रूच्या प्रदेशात शंभर मैल आत घुसून त्यांना हल्ला करायचा होता.

"हा विमानतळ हेच शत्रूचे खरे सामर्थ्य आहे. यातील हॅंगर्स धावपट्टीच्या खाली बांधलेले आहेत. हॅंगरमधून विमानं वर येण्याचा मार्ग आपल्या हेरांकरवी ज्ञात झाला आहे. तो मार्ग व शत्रूची रडारची साधनं उध्वस्त करणं ही आजची आपली कामगिरी आहे. यापूर्वी दोन वेळा आपल्या फोर्सनं हा तळ उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला पण चार दोन इमारतींचं नुकसान करण्यापलिकडे त्यांना काही करता आलं नाही." ज्योने त्यांना कार्यक्रमाची एकंदर रूपरेषा समजावून सांगितली.

क्षणभर हॉलमध्ये गंभीर शांतता पसरली. घड्याळाचा टिक् टिक् आवाज कानावर येत होता व तो असह्य होत होता. 'ठण्' एकचा टोला झाला तशी सगळ्यांनी चमकून घड्याळाकडे पाहिले व एकमेकांकडे कोरडे हसून पाहिले.

"वेल, बी चिअरफुल बॉईज." त्या शांततेचा भंग करीत ज्यो म्हणाला, "हिअर वुई गो," व तो जाण्यासाठी उठला.

"व्ही फॉर—" जतीन ओरडला.

"व्हिक्टरी" तिघंही एका सुरात म्हणाले.

"उद्या क्लबांत भेटू." ज्यो हसत म्हणाला. त्या हास्यात उत्स्फूर्त आनंद नव्हता तर मृत्यूची चाहूल दडपून टाकण्याचा तो प्रयत्न होता.

हॉलमधून विमानाकडे जाताना कुणीच बोललं नाही.

ज्योचे विमान धावपट्टीवरून पुढे झाले. पाठोपाठ जतीनचे व शेवटी अशोकचे. धावपट्टीच्या दोहोबाजूस असलेले दिवे सावधगिरीसाठी वरून झाकलेले होते व त्यांचा मंद प्रकाश तेवढा धावपट्टीवर पडलेला होता.

विमानांनी जमिनीवर टेकलेले आपले पाय अलगद उचलले व अंतराळाकडे झेप घेतली.

अवकाशातून पंधरा हजार फूट उंचीवरून वेगाने त्यांची विमानं जात होती. नेव्हीगेटर मॅग्नेटोमीटरच्या साह्याने दिशा दर्शन करीत होता व व्ही च्या फॉर्मेशन-मध्ये ती विमानं शत्रूच्या हद्दीत वेगाने पुढे जात होती.

" कस काय वाटतंय, अशोक. " ज्योने माईकवरून अशोकला विचारले.

" ठीक आहे. "

" घाबरला नाहीस ना ?"

" तू आहेस ना बरोबर. "

त्यावर ज्यो हसल्याचे अशोकला ऐकू आले. जरा वेळ कुणीच काही बोलले नाही. थोड्या वेळाने ज्यो म्हणाला, " अशोक. "

" हं !"

" जागा आहेस ना ?"

" झोप पार उडाली आहे. "

" आज निघताना क्लाराचा चेहरा तू पाह्यला हवा होतास. मोठी हळवी, भाबडी पोर आहे. माझीच काय पण तुझीसुद्धा तिला काळजी वाटते आहे बरं ?"

हीं त्याच्याजवळ काय बोलली असावी या कल्पनेनं त्याचं हृदय लकलकलं. त्याच्या तोंडातून अस्पष्ट हुंकार बाहेर पडला.

" मला म्हणाली, ' अशोककडे लक्ष दे. कोवळा पोर आहे. अननुभवी आहे.' व्हाट अ बिग हार्ट—"

ज्यो बोलायचा थांबला. त्याचं नियोजित स्थळ जवळ आलं होतं. त्याने आपलं विमान खाली उतरविण्यास सुरवात केली. जतीनने व अशोकने त्याचे अनुकरण केले.

खालचा विमानतळ स्पष्ट दिसत होता. बाजूला पडक्या इमारती होत्या. धावपट्ट्या मोकळ्याच होत्या व एका बाजूला विशिष्ट तऱ्हेने बसविलेले रडारचे राक्षसी जाळे होते.

अचानकच खालून विमानवेधी तोफा धडधडू लागल्या. रात्री अंधारात जमिनीवरून आकाशात तेजाचे पिवळे पट्टे रेखाटले जात होते. त्या तोफांचा मारा चुकवीत त्यांची विमान वेगानं खाली आली व बॉम्बचा वर्षाव करीत वेगाने वर निघून गेली. अशोकने जमिनीतील हँगर्समधून विमानं वर येण्याचा मार्ग हेरून त्यावर बॉम्बस् टाकले. पाहता पाहता त्या मार्गातून धुराचे लोटच्या लोट वर निघू लागले व दुसऱ्या क्षणाला वरच्या धावपट्टीला भेगा पडून ती खाली

खचली. जतीन व ज्योने रडारवर लक्ष केंद्रित हल्ला चढविला पण त्यातून ते केंद्र सुरक्षित राहिले. त्यावर पुन्हा हल्ला चढविणे धोक्याचे होते. शत्रूची जेट विमानं कोणत्याही क्षणी पाठलागावर येण्याची शक्यता होती. ज्योने विमानांना परतण्याचा इशारा दिला.

त्याक्षणी अशोकच्या मनात विचारांचं वादळ उठलं. अखेर हा तिसरा हल्ला पण अपेशी ठरला होता. विमानतळ व त्याखालील विमानं उध्वस्त झाली असली तरी विमानांची नोंद घेणारे रडारकेन्द्र तिसऱ्यांदा सुरक्षित राहिले होते व दिमाखाने गरागरा फिरत होते. त्यांना हिणवीत होते.

त्याला ज्योचा परत फिरण्याचा निर्णय भित्रेपणाचा वाटला. 'क्लारासाठी जीव टाकतोय बेटा' तो मनातल्या मनात म्हणाला व त्याने आपले विमान मागे फिरविले.

तो परतला असता तर सुखरूप राहिला असता खरा. पण पुन्हा क्लाराच्या मोहपाशात अडकला असता. तिचे पाश झुगारून देण्याची ही अखेरची संधी होती. जीवनाचे त्याला मर्त्य जगाशी बांधून ठेवणारे असे पाश नव्हतेच व क्लाराचा अखेरचा पाश मृत्यूला कवटाळून तो झुगारून देणार होता. त्याच्या बलिदानाने त्याच्या कामगिरीची सफलता त्याच्या सहकाऱ्यांना अनुभवायला मिळणार होती व स्वत:चे जीवन सार्थकी लागल्याचा आनंद त्याला मिळणार होता; त्याच्या जीवनाचा किनारा त्याला गवसला होता.

"अशोक, मागे फिर", हेडफोन्समधून ज्योचा आवाज येत होता. पण त्या आवाजाकडे त्याचे लक्ष नव्हते. रडारचा गरागरा फिरणारा पिंजरा त्याला खुणावत होता, खिजवत होता. त्याने वेगाने आपले विमान खाली आणले व जोराने त्या रडारला धडक दिली.

ज्यो ने खाली नजर खाली टाकली तेव्हा मोडून पडलेले रडार केंद्र त्याला दिसले व अशोकचे धगधगून पेटणारे विमान त्याला दिसले.

मोठ्या प्रयासाने त्याने आपली आसवं रोखली व नजर समोर करून निर्विकारपणे विमान चालविण्यास सुरुवात केली.

युद्ध : शाप आणि वर

श्रीकान्त राय

'युद्धस्य वार्ता रम्या' हे विधान त्रिकालाबाधित सत्याची कसोटी उतरले आहे. महाभारतीय युद्ध असो वा 'राम रावणयोर्युद्धम् रामरावणयोरिव' असे अद्वितीयत्वाचे वर्णन केलेले रामायणीन युद्ध असो. त्यातील समरप्रसंगांची मोहिनी पुराणकालापासून आजतागायत तशीच कायम राहिली आहे आणि ती यावच्चंद्रदिवाकरौ तशीच राहील. ट्रॉयच्या कथांचीहि तीच अवस्था आहे कारण त्या युद्धकथा आहेत. इतिहासातील लहानमोठी युद्धे वाचताना सुरस वाटत आली आहेत. एवढयानेच 'युद्धस्य वार्ता रम्या' या त्रिकालाबाधित सत्याची व्याप्ती संपली नाही; तर गृहकलहापासून तो संहतिकलहापर्यंत कुठल्याही युद्धाची वार्ता दंतकथेपासून तो ऐतिहासिक कथेपर्यंत रम्य म्हणून मानवाने चघळली आहे. अगदी आधुनिक जगाच्या इतिहासात पहिल्या आणि दुसऱ्या जागतिक महायुद्धांच्या रोमांचकारी कथांनी वाङ्मयाचे एक दालन समृद्ध केले आहे आणि 'पश्चिम सीमेवर सारे शान्त' पासून तो 'प्रेम करण्याची वेळ आणि मरण्याची वेळ' या दोन महायुद्धांवरील दोन कादंबऱ्या एकाच एरिक मारिया रिमार्केच्या लेखणीतून उतरल्या आहेत. नव्हरोनेच्या तोफा, क्वाइ नदीवरील पूल, एरिक् लिंकलेटरच्या युद्धकथा अशा कितीतरी कथांनी लोकाना वेडे केले आहे. फील्ड मार्शल मॉंटगॉमेरी ते फील्ड मार्शल रोमेल यांच्या चरित्रांनी लोकांच्या मनाची पकड घेतली आहे. प्रिन्स ऑफ वेल्स या युद्धनौकेच्या धुराडचात आपल्या यानासकट झेप घेणारा जपानी वीर, घोडदौड करून मृत्यूच्या जवडचात शिरलेले 'वेडे सात मराठे वीर', क्रीमियन युद्धात 'चाल करून गेलेले सहाशे' यांच्या कथांचे पैलू 'युद्धस्य वार्ता रम्या' या सत्याच्या झिलईनेच उजळून निघाले आहेत. खडर्याची लढाई, पानिपतची युद्धे, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, भारतीय स्वातंत्र्ययुद्ध, इंडोनेशियाचा स्वातंत्र्यसंग्राम, नेपोलियनची रशियावरील स्वारी, स्टालिनग्राडचा संग्राम, वॉटर्लूची लढाई, कोरियाचे युद्ध, सुएझचा लढा, टिचभर सायप्रसमधील यादवी ते काँगोची यादवी, व्हिएतनाम ते भारताच्या उत्तुंग उत्तर सीमेचे युद्ध आणि कच्छ ते छांब अघोषित युद्धे यांच्या कथांनी कोटयवधि शरीरांवर काटा उभा केला आहे.

आणि 'युद्धस्य कथा रम्या' हे निर्भेळ सत्य मान्य करीत असतानाही युद्ध कोणालाच नको आहे. युद्धाची प्रवृत्तीच रानटी आहे, पाशवी आहे. युद्ध हा मानवतेला लागलेला शाप आहे. युद्ध अटळ आहे का, जागतिक शांती शक्य आहे का, केवळ युद्धच जागतिक शांतता प्रस्थापित करू शकेल, युद्धाशिवाय जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी शांततापूर्ण सहजीवनाचा पंचशीलमय प्रयत्न आम्ही करू, अशा अनेक परस्परविरोधी विचारप्रवाहांनी मानवाच्या मनात कल्लोळ उडवून दिला आहे. आणि तरी पापमय, शापमय युद्धे लढली जात आहेत, धर्मयुद्धे ठरत आहेत, पार्थाच्या भूमिकेतून 'कर्मण्येवाधिकारस्ते'ची आरोळी ऐकून 'कर्तव्ये' म्हणून स्वीकारली जात आहेत आणि संस्कृतीचे अस्तित्व व राष्ट्राची अस्मिता उजळून निघत असताना सोनाराच्या मुशीसारखी हीच युद्धे वरदान म्हणून ठरत आहेत. पुढच्या पिढयांच्या अस्तित्व–अस्मितांची चिंता वाहात आहेत, दैत्यांच्या नि दुष्टांच्या निर्दालनाची, देवांच्या नि सुष्टांच्या पुनर्वसनाची, अधर्माच्या क्षयाची नि धर्माच्या जयाची, अमंगलाच्या होळीची नि मंगलाच्या जोपासनेची, राक्षसतेच्या संहाराची आणि मानवतेच्या आधाराची गाठोडी पाठीवर पेलणारी युद्धे मानवतेला वरासारखी लाभत आहेत.

आणि म्हणूनच युद्ध–शाप की वर ?—असा प्रश्न नसून युद्ध शाप आणि वर हे सत्य आहे. शाप आणि वर या नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे युद्धाच्या दोन बाजू आहेत. आणि युद्ध असेल तोवर त्याच्या या दोन बाजू उरणार आहेत; गुळगुळीत न होता, पुसून न जाता !

● ● ●

काळाच्या आधुनिकतेत भारताने महायुद्ध पाहिले नव्हते. भारतीयांनी ते पाहिले असले तरी ते मध्यपूर्वेच्या रणांगणावर वा अतिपूर्वेच्या युद्धभूमीवर. परंतु भारताच्या काश्मीर ते कन्याकुमारी आणि कच्छ ते कामरूप या चार 'क'कार सीमांच्या आत महायुद्ध लढले गेले नव्हते. तोफांचे फूत्कार झडले नव्हते. कोणत्याही गटात किंवा गोटात न रुतता अलिप्तपणे पंचशील, शांततापूर्ण सहजीवन, निर्मिती–समृद्धी–प्रगतीचे सृजनप्रधान जीवन जगण्यासाठी धडपडणाऱ्या आधुनिक भारताच्या जीवनाला हादरा बसला हिमालयाच्या शांत, हिमल सीमांवर. आणि कठोर वास्तवाने मंगल-स्वप्नाला दचकून जागे केले न केले तोंच 'धाकटा भाऊ' म्हणून पाठीशी घातलेल्या पाकिस्तानाने हिंदुस्थानाच्या पाठीत खंजीर खुपसण्याची घाई केली. आणि भारतच काय, उभे जग, जागतिक महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. भारताच्या पुरुषार्थाला आव्हान मिळाले, त्यागाला वाव मिळाला. झेलमची युद्धकथा, भारताची हवाई कामगिरी, भारतीय

वीरांची पाकी रडारवरील आत्माहुतीची पतंग झेप, लाहोरवरील फेरफटका या चुणुकींनी भारताच्या अस्मितेची जाणीव भारताला स्वतःला व जगाला झाली. नवे महाभारत लिहू शकणारे रक्त भारतात आजही सळसळत आहे याची संजीवन–जाणीव भारताला झाली आणि 'आम्ही कुठे आहोत ?' 'सारेच कसे मिळमिळीत झाले आहे !' 'तेच ते, तेच ते' असे वाटत वैफल्याच्या कोषात गुरफटणाऱ्या सुरवंटांना या युद्धाने नवे पंख फुटले, नवे जीवन लाभले. प्रचंड गरुडाच्या चितेतून उद्याच्या जीवनाच्या आशेची वैनतेय शावके निर्माण करण्याचा पराक्रम भारतही करू शकतो याची जाणीव शांतीची कबूतरे सोडणाऱ्या भारताला आणि भारताकडे दांभिक तुच्छतेने पाहणाऱ्या जगाला झाली. भाषा आणि प्रांत यांच्या सीमांनी आपापसात टकरत राहिलेला भारत एकात्मतेने भारत म्हणून उभा ठाकला व 'कुणाची माय व्याली आहे ?' असले आव्हान देऊन आपले गांडीव कंपरहित, स्थिर हातात सरसावू लागला.

इतिहासपूर्व कालापासून मानवतेची व शांतीची स्तोत्रे आणि सूक्ते गाणाऱ्या भारताला युद्धाच्या खाईत उतरावे लागले हा एक दैवदुर्विलास आहेच, परंतु जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत मानवतेने ओथंबलेली प्रेम आणि प्रगतीची भारतीय संस्कृती पसरवीत 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' या निश्चयाने मानवताधर्म पसरविणाऱ्या भारताला पंचशीलाची होळी पेटत असताना, शांतिसूक्ते 'जपण्या'साठी जगात दुसऱ्या कुठल्याही राष्ट्राची सोबत मिळविणे कठीण वाटावे व अशी 'मैत्री' सावण्यात अपयश यावे ही या दैवदुर्विलासाची परिसीमा होय. वेद हाती घेऊन मध्यपूर्वेपासून हिंदेशियापर्यंत जनसंहतीची एकात्मता प्रस्थापित करू शकणाऱ्या भारतीय संस्कृतीवर तलवारीच्या आणि तागडयाच्या संस्कृतींनी मात करावी आणि 'सत्यमेव जयते' या श्रद्धेची मुळे हलून जावी, अशा प्रकारे असत्याचा नि अपप्रचाराचा विजयाभास का होईना, होत असतांना सद्यःपरिस्थितींतील आत्मचिंतनाचे, अंतर्मुखतेचे सावट कुठल्याही भारतीयाच्या मनात आजच्या घटकेला पडल्यास त्यात नवल काहीच नाही.

● ● ●

जगाचा पृष्ठभाग मर्यादित आहे, शास्त्रांच्या प्रगतीने निर्मितीची परमावधी गाठता आली तरी त्या परमावधीला मर्यादा आहेत. त्यामुळे अन्न–वस्त्र–निवारा या जीवनाच्या तीन मूलभूत गरजांचा कुठल्या ना कुठल्या अवस्थेत तुटवडा पडणारच आहे. सृजन हे निसर्गाचे कार्य आहे, त्यावर मर्यादा घातल्या तरी गणित-श्रेणीने वाढत जाणाऱ्या जगाच्या लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात थोडा फार बदल करता येईल; तथापि ही वाढ थांबविता येणार नाही आणि त्यामुळे जीवनकलहाचा मूलभूत पाया 'अस्तित्वासाठी धडपड' हाच राहणार

आहे. या अस्तित्वावर जे घाले अटळपणे पडणार आहेत त्यात काही नैसर्गिक व काही स्वभावजन्य राहणारच आहेत. त्यामुळे सर्व सुश्रद्धा आणि शोभनतत्त्वे लक्षात घेऊनही माल्थसच्या लोकसंख्येच्या सिद्धांताकडे काणाडोळा करता येत नाही. दुष्काळ, रोगराई, अग्नी व जलप्रलय, ज्वालामुखीचे स्फोट, धरणीकंप, संहतिकलह, षड्रिपूंचा प्रभाव या सगळ्या आवर्तात सापडलेल्या लोकसंख्येला अखेर उचिततमाच्या जीविततत्त्वाचा दंडक (The law of survival of the fittest) अपरिहार्यपणे पाळावाच लागणार आहे आणि अखेर सुदृढ मनाच्या व निरोगी शरीराच्या व्यक्ती व अशा व्यक्तींच्या संहती जीवनकलहात टिकाव धरून उरणार आहेत. त्यामुळे युद्ध टाळण्याची कल्पना काव्याइतकी रम्य असली तरी युद्ध अपरिहार्य आहे, निश्चित आहे.

युद्ध हा मानवतेला लाभलेला सहज शाप आहे. परंतु जीवनक्षम राहाण्यासाठी, उचिततमाच्या जीविततत्त्वाची कसोटी उतरण्यासाठी आवश्यक असे संहतिगुण आत्मसात करण्यासाठी युद्ध हा वर आहे. पोट नसते तर भूक नसती, आणि भूक भागविण्याचा प्रश्न नसता तर त्यासाठी धडपड नसती, काम नसते, चळवळ नसती. युद्ध नसते, तर युद्धाची भीती नसती आणि या भीतीवर मात करण्यासाठी तयारी करण्याची गरज नसती आणि जीवनक्षमता, पौरुष, आव्हान झेलण्याची मनाची तयारी नसती. हे पुरुषोत्तमाचे गुण जोपासण्याची व जीवनकलहात तगून राहण्याची संधी व्यक्तीलाच नव्हे तर संहतीला प्राप्त करून देणारे युद्ध हे निसर्गाच्या चौकटीची वास्तवता लक्ष्यात घेता, वरदानच नव्हे काय ?

युद्धाच्या कथा वाचण्यापेक्षा त्या कथा जगणे अधिक रोमांचकारक आहे. बर्लिनच्या युद्धाच्या अनेक कथा वाङ्मयात जमा झाल्या आहेत. तथापि बर्लिनमधील एका वहात्तर वर्षे वयाच्या वृद्धाने आपल्या 'बर्लिनवर बॉंब पडले' या पुस्तकाचे हस्तलिखित मला वाचून दाखवले, तेव्हा कुर्फुस्टन डामच्या एका अंगास पसरलेल्या विल्मर्सडोर्फच्या पडक्या हवेलीच्या तिसऱ्या मजल्याच्या खिडकीतून सभोवार साफ झालेल्या जागेच्या व पडक्या इमारतींच्या दृश्यांचा अधिक वास्तव अर्थ माझ्या लक्ष्यात आला. माझे मन गद्‌गद हलून गेले आणि त्यावेळी रुद्ध कंठाने आपल्या पुस्तकाचे हस्तलिखित वाचून दाखविणाऱ्या पेर्सीच्या जीवनानुभूतीतील वास्तवतेच्या अधिकतेची जाणीव मला अधिकच प्रकर्षाने झाली.

युद्धात सर्वस्व पणाला लावून लढणाऱ्या जर्मनीतील युवक न् युवकच नव्हे तर पुरुष अन् पुरुष युद्धआघाडीवर गुंतला असताना राष्ट्राचा संसार चालविणाऱ्या, आपत्ती भोगणाऱ्या, तळघरात कंठापर्यंत पाण्यात अडकून उपासपोटी, कुडकुडत मरणाऱ्या व जगणाऱ्या स्त्रियांच्या कथा भयंकर होत्या. परंतु ही पुरुषांची आणि स्त्रियांची जीवने आणि मरणे उमलणाऱ्या पिढीनंतरच्या न उमललेल्या पिढीच्या

जगण्याच्या हमीसाठी होती. युद्धात हानी होते म्हणजे काय, याचा अर्थ वाचण्यापेक्षा पाहून अधिक समजतो. लंडनमध्ये कुठे एखादी जमीनदोस्त झालेली इमारत पाहून 'अरेरे' म्हणणाऱ्या जिभेला शहाण्णव टक्के जमीनदोस्त झालेल्या व्हूर्झबुर्ग शहराच्या उध्वस्ततेकडे बघून उच्चारण्यासाठी शब्दच उरत नाही. तरी जर्मन जेव्हा म्हणतो, "न्यूर्नबर्गच्या आम् प्लेअरची, एसेनची, बर्लिनची गगनभेदी आधुनिक शिल्पे उभी राहिली त्याचे श्रेय महायुद्धातील उध्वस्ततेला आहे. नाही तर आम्ही त्याच जुनाट इमारतीतून पिढयान् पिढया संसार करीत राहिलो असतो!" किंवा जेव्हा तो सांगतो, "लंडनच्या बकिंगहॅम राजवाडयासमोर १९२८ सालच्या घडणीच्या मोटारगाडया गोगलगायीसारख्या रेंगाळतांना आढळतील परंतु जर्मनीतल्या सगळया गाडया कोऱ्या आहेत. कारण युद्धाने जुन्या गाडया शिल्लकच ठेवल्या नाहीत." तेव्हा त्याच्या 'गंभीर' विनोदबुद्धीचे कौतुक करावे की या वर्णनाने हळहळून जावे तेच समजेनासे होते.

परंतु तेवढयात ऐन उमेदीतील तरुणी म्हणून जिने युद्धाची आच सोसली अशी जर्मन माता अंगावर शहारे आणून सांगत असते, "माझ्या मुलाने काही करावे, भटारखाना चालवावा पण सैन्यात जाऊ नये; मी त्याला सैन्यात जाऊ देणार नाही;" आणि त्याच वेळी जेव्हा ओठावरील जार न सुकलेला, मिसरूड न फुटलेला किंवा नुकतीच फुटलेला जर्मन तरुण जेव्हा बलवान जर्मनीची स्वप्ने रंगवताना युद्धाच्या हालअपेष्टांच्या वर्णनांनी गलबलून जात नाही, तेव्हा फिनिक्स पक्ष्याच्या चितेचे खरे रहस्य कळते. कारण शहारे आणणारा शाप वाटणारे युद्ध त्याच वेळी रोमहर्षक वर असल्याची प्रचीती एकाच वेळी, एकाच ठिकाणी त्याच डोळयांना पहावयास मिळते!

● ● ●

कांजरकोट, सरदारकोट येथील युद्धकथांचे शब्द विरण्यापूर्वी जेव्हा छांब-जौरियन, हाजीपीर खिड-पूंच, सियालकोट-लाहोर या युद्धकथांतून पॅटन रण-गाडयांचे फटाके फुटतात आणि अंतराळात भारतीय कॅनबर व नॅट विमाने सेबरजेट विमानांचा मत्स्यवेध करतात तेव्हा अंबाला, अमृतसरवर आग वर्षत असताना, रडारशिखेवर ऐन उमेदीतील भारतीय पतंग आत्मार्पणाची झेप घेत असताना, 'गोळी लागेल पण ती पाठीत लागणार नाही छातीत घुसेल' असे आत्म-विश्वासाचे उद्‌गार वज्रासारखे कठीण बनून वृंदावनावर सजत असताना अस्तित्व-अस्मितेच्या लढयासाठी भारत एकत्र येतो आणि कोटिकोटी कंठातून प्रतिज्ञा बाहेर पडतात आणि कोटिकोटी हात शस्त्रसज्ज होतात, तेव्हा नव्या विश्वरूप-दर्शनाची किमया घडविणारे धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे उभे ठाकविणारे युद्ध राष्ट्राला वरदानासारखे लाभते; जेव्हा मने स्फूर्तीने भारतात, हात काम करू लागतात,

कंठ स्वातंत्र्यस्तोत्र गातात ! परंतु शब्द भाषणांतच झिजले, हात निष्क्रियतेत भिजले आणि सद्बुद्धीचे दीप विझले तर अमोल हौतात्म्ये मातीमोल होतात आणि युद्ध असेही शाप ठरते व तसेही शापच ठरते !

आशा–आकांक्षा दुर्दम्य असतात, कामाचा उत्साह अदम्य असतो, श्रद्धेची मुळे खोल रुजलेली असतात, निश्चयाचे बळ अमर्याद असते, तेव्हा सत् आणि श्लील पावित्र्यात उभा ठाकलेला एकाकी युयुत्सू सिंकियांग ते वॉलाँग आणि कारगिल ते कांजरकोट आघाड्यांवरील आव्हान स्वीकारू शकतो; कारण युद्धानेच त्याला ताकद दिलेली असते, त्याला अस्तित्व–अस्मितेचे कोडे सोडवायचे असते, सत्य–शिव–सुंदर जतन करण्यासाठी, मानवतेचे पुष्प उमलविण्यासाठी, संहतीच्या श्रेयसाचे शिल्प उभविण्यासाठी, मानवताधर्माचा आविष्कार प्रस्फुरत ठेवण्यासाठी, शांतिसूक्ताचा मंगल आणि प्रसन्नपाठ विश्वमंदिरात निनादत ठेवण्यासाठी, विश्वाच्या अखेरच्या प्रलयाच्या वेळी पिंपळपान तरंगत ठेवणारा अश्वत्थाचा वृक्ष जतन करण्यासाठी !

चांगले टिकावे म्हणून वाइटाचे निवारण, सुजनांच्या जीवनासाठी दुर्जनांचे निर्दालन, शोषणातून मुक्तता व्हावी म्हणून पिपासू वृत्तीचा निःपात, स्वातंत्र्य अबाधित रहावे म्हणून आक्रमक वृत्तींचा विशम हाच वरदान असलेल्या युद्धाचा भारताला अभिप्रेत असलेला अर्थ. युद्ध म्हणजे इडापिडा जाळणारे यज्ञकुंड.

म्हणून मानवतेचा शाप म्हटले गेलेले युद्ध हे धर्मयुद्ध म्हणून वर ! कुरुक्षेत्राचे धर्मक्षेत्र करणाऱ्या पार्थाचे हेच धर्मयुद्ध; हेच जीहाद !!

महाराष्ट्राचे भावनात्मक ऐक्य

'केदारनाथ'

महाराष्ट्र राज्य निर्माण झाले तेव्हा म्हणजे पाच वर्षांपूर्वी, महाराष्ट्राचे भावनात्मक ऐक्य कसे साधेल, कोणत्या दिशेने, कोणत्या प्रकारे प्रयत्न व्हावयास हवेत, यासंबंधी बरेच चर्वितचर्वण होत असे. सध्या या भावनात्मक ऐक्याची वाटचाल कुठपर्यंत झाली आहे आणि अद्याप कोणते प्रयत्न व्हावयाचे आहेत, याबाबत कोणी काही विचार करीत असल्याचे दिसत नाही. त्यावरून 'महाराष्ट्राचे भावनात्मक ऐक्य सिद्ध झालेलेच आहे आणि त्यासाठी आता काही करण्याची—विचारसुद्धा !—गरज नाही'—असे समजावयाचे काय ? तसे गृहीत धरून चालावयाचे असेल, तर मग हा ऐक्याचा प्रश्नच शिल्लक उरत नाही. पण वस्तुस्थिती तशी आहे काय? खरोखरच महाराष्ट्र राज्याचे भावनात्मक ऐक्य सिद्ध झालेले आहे काय ? माझ्या मते ते अद्याप सिद्ध झालेले नाही. ते सिद्ध करावयासाठी सहेतुकपणे सर्वांनाच—म्हणजे राज्य सरकार, विरोधी पक्ष, मराठी जनता, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक किंवा साहित्यिक संस्था यांना बरेच प्रयत्न करावे लागणार आहेत. या प्रयत्नांची दिशा कोणती असली पाहिजे, याचे थोडक्यात सर्वसामान्य विवेचन करण्याचे येथे योजिले आहे.

महाराष्ट्र राज्य बलवान व्हावयाचे असेल, तर या राज्याचे भावनात्मक ऐक्य होणे आवश्यक आहे. या राज्यातील सर्व विभागातील लोकांना विकासाची समान संधि मिळाली पाहिजे. या राज्यातल्या कोणत्याहि भूभागातील लोकांना आपली कोणत्याहि प्रकारे पिळवणूक होत आहे किंवा इतर भूभागातील लोक आपल्या हितासाठी आपणास राबवीत आहेत, अशा प्रकारची अन्याय होत असल्याची भावना शिल्लक उरता कामा नये. आम्ही आपला विकास करू शकतो, पण महाराष्ट्र राज्याच्या अमुक विभागातील लोक आमच्या विकासाच्या, प्रगतीच्या आड येत आहेत, अशी भावना या राज्यातील कोणत्याहि विभागामधल्या लोकांच्या मनात दृढमूल होता कामा नये. महाराष्ट्र राज्याच्या सर्व विभागामधील लोकांचा सर्व क्षेत्रात विकास होत असून त्यामुळे महाराष्ट्र राज्याचा विकास होत आहे, ते अधिक बलवान बनत आहे, असे दृश्य दिसले पाहिजे. महाराष्ट्र राज्यातील लोक एकमेकांचे पाय खाली ओढण्यात मश्गूल आहेत, असे दृश्य दिसता कामा नये. म्हणूनच मराठी जनतेच्या भावनात्मक ऐक्यासंबंधी विचार होणे आवश्यक आहे. हे ऐक्य साधलेलेच आहे, त्यासंबंधी विचार करण्याची गरज नाही किंवा ऐक्य

साधले नसले तरी ते आपोआप कालक्रमाने साध्य होईल, त्यासाठी सहेतुकपणे प्रयत्न करण्याची गरज नाही, ही सध्याची रूढ प्रवृत्ती अनिष्ट आणि भयावह आहे. त्यामुळे इमारतीच्या पायातन सुरुंग कायम राहातील, अशी भीती वाटते.

भावनात्मक ऐक्य साधण्यासाठी काही प्रमुख गोष्टींचा क्रमाक्रमाने विचार करावा लागेल. राज्यकारभाराच्या, शासनाच्या दृष्टीने ते ऐक्य साध्य झालेले आहे काय ? मारूनमुटकून ते ऐक्य साध्य झाल्यासारखे दिसते. पण ती प्रक्रिया सर्वच दृष्टींनी अनिष्ट आणि दोषपूर्ण होती आणि आहे. मराठवाडा, विदर्भ यांच्यासह पहिल्याप्रथम संयुक्त झालेल्या महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी अशी घोषणा केली होती की, कायद्यांचे एकीकरण करताना पूर्वीच्या मुंबई राज्यातील कायदे विदर्भ–मराठवाड्यावर लादण्यात येणार नाहीत. विदर्भ–मराठवाडा येथे रूढ असलेल्या कायद्यातील अनेक उत्तम, प्रगतिपर तरतुदींचा समावेश करून नवे कायदे अमलात येतील. त्यावेळी विदर्भ–मराठवाड्यातील लोकांना दिलासा मिळाला होता. माजी मुंबई राज्याचे सर्वच कायदे जसेच्या तसे, पादाक्रांत केलेल्या विभागांना लागू करण्यात येतात, तसे लागू करण्यात येणार नाहीत, प्रगतिपर तरतुदी कायम ठेवून कायद्यांच्या निर्मितीत विदर्भ, मराठवाडा या विभागांना समान भूमिकेवरून वागविण्यात येईल, हा तो दिलासा होता. पण प्रत्यक्षात काय झाले ? महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर नागपूरला विधिमंडळाच्या झालेल्या पहिल्याच अधिवेशनात मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याच नेतृत्वाखाली पूर्वीच्या मुंबई राज्याचे अनेक कालविसंगत, अनावश्यक, नोकरशाहीप्रधान कायदे जसेच्या तसे विदर्भ आणि मराठवाडा या विभागांना लागू करण्यात आले. या दोन्ही विभागातील अनेक उत्तमोत्तम कायद्यांना त्याच वेळी मूठमाती देण्यात आली ! मराठवाड्यातील त्या वेळचा सर्वोत्कृष्ट असलेला ग्रंथालयविषयक कायदा लेखणीच्या फटकाऱ्यासरशी रद्द करण्यात आला ! त्यावेळी ग्रंथालयविषयक नवा सुधारलेला कायदा विधिमंडळासमोर येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. पण ते आश्वासन अद्याप पूर्ण व्हावयाचे आहे ! —अशा अनेक कायद्यांची त्या वेळी वाताहत झाली. त्यावेळी, मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले आश्वासन अचानक कसे बारगळले, याचे लोकांना आश्चर्य वाटले. मंत्रिमंडळाच्या लोकाभिमुख धोरणाऐवजी नोकरशाहीला सोयिस्कर असलेले धोरणच अमलात येते, प्रभावी ठरते असा लोकांना अनुभव आला मुंबईच्या नोकरशाहीची वारंवार स्तुती करण्यात येते. ब्रिटिशांच्या काळात नोकरशाहीचे ते धोरण कदाचित योग्य असेल. पण महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यापासून विदर्भ आणि मराठवाडा विभागामध्ये लोकांना या नोकरशाहीचा फार वाईट अनुभव आला व अद्यापही येत आहे. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर कायद्यांची पुनर्रचना

करण्याची संधि सरकारने गमावली आहे. मजूरविषयक कायद्यांची मात्र पुनर्रचना करण्यात येऊन तो अमलात आलेला आहे. पण त्या कायद्यांचे नाव असे ठेवण्यात आलेले आहे की जुन्या मुंबई राज्यातील कायद्यातच थोडीशी सुधारणा करण्यात आल्याचा भास व्हावा ! तो पुनर्रचित कायदा आहे, अशी तिळमात्र शंकामुद्धा येऊ नये यासाठी ही केवढी दक्षता !! मुंबई पोलिस कायदा जसाच्या तसा अमलात आहे. एका प्रमुख पोलिस अधिकाऱ्याकडे पोलिस कायद्याची पुनर्रचना करण्याचे काम सोपविण्यात आले होते आणि त्यांनी ते चोखपणे बजावलेही. पण ही पुनर्रचना मुळात पोलिस–प्रमुखांना नापसंत होती म्हणून ते प्रयत्न वाया गेले, असे कळते. अशा अवस्थेत सर्वच कायद्यांच्या पुनर्रचनेची भूमिका डावलण्यात येत असेल तर नवल वाटावयास नको. कायदे तेच ठेवण्यामागे त्या कायद्यातील स्वतःच्या नैपुण्याचे भांडवल करून प्रभुत्व गाजविण्याची ईर्ष्याच दिसून येते, हे सूक्ष्म विचारांशी सहज लक्षात येईल. मुंबई उच्च न्यायालयाचे नाव अद्यापहि 'महाराष्ट्र उच्च न्यायालय' असे ठेवण्यात आलेले नाही. या गोष्टी तशा फार सामान्य भासतात. पण त्यामागे एक मनोवृत्ती आहे, हे विसरता येत नाही.

आर्थिक विकासाच्या बाबतीत सर्वांना–सर्व मराठीभाषी लोकांना—महाराष्ट्रात राहाणाऱ्या तमाम जनतेला समान संधि मिळत आहे, ती समान संधि मिळण्याआड दुसऱ्या विभागातील लोक येत नाहीत अशी खात्री पटणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या पंचवार्षिक योजनांत विदर्भ मराठवाडा या विभागांना किती प्रमाणात प्राधान्य मिळाले, हा एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. पण त्या बाबतीत न्याय मिळत नाही, ही एक सार्वत्रिक भावना आहे.

येथे प्रामुख्याने नोकऱ्यांचा विचार करावयाचा आहे. "सरकारी नोकऱ्या अथवा सरकारनियंत्रित व्यवसायात सर्व दर्जाच्या नोकरांची भरती करताना प्रत्येक घटकातून लोकसंख्येच्या प्रमाणात भरती केली जाईल," असे एक कलम नागपूर करारात आहे. सध्या पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या तीन घटकांतील नोकरांचे किंवा नोकरीभरतीचे प्रमाण काय आहे, ते लोकसंख्येच्या प्रमाणात आहे काय, आणि तसे नसेल तर किमान त्या प्रमाणात आणण्यासाठी कोणते प्रयत्न होत आहेत, हे समजावयास कोणताच मार्ग उपलब्ध नाही. या प्रमाणाबाबत आकडेही उपलब्ध नाहीत. अशा स्थितीत महाराष्ट्र राज्यामधील किमान सरकारी नोकऱ्यांत विदर्भ–मराठवाडा या घटकांना समान न्याय किंवा समान संधि मिळते, असे म्हणता येईल काय ? किंवा मिळत असेल, तर तसे पटवून देण्यासाठी तरी सरकारजवळ आकडे उपलब्ध आहेत काय ? महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आहे आणि नोकऱ्यांचे एकीकरण झाले, त्याच वेळी

तीन घटकातील नोकरांचे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणात नाही, विदर्भ मराठवाड्यातील नोकऱ्यांचे प्रमाण कमी आहे, असेच मानण्यात येत असे. महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर हे प्रमाण आणखी घसरले असण्याचीच शक्यता आहे. कारण मुंबई राजधानी झाल्यामुळे रोजगार किंवा नोकऱ्या मिळण्याचे सुद्धा क्षेत्र स्वाभाविकच राजधानीभोवतालच्या विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित बनले. मुंबई–पुणे विभागांतील नोकऱ्यांचे क्षेत्र केवळ सरकारी नोकऱ्यांपुरतेच मर्यादित नाही, तर त्या विभागात उद्योगधंद्यांचा विकास झालेला किंवा होत असल्यामुळे रोजगाराचे क्षेत्र विदर्भ–मराठवाडा विभागाच्या मानाने बरेच व्यापक आहे. या दोन घटकांची तशी स्थिती नाही. यांचे रोजगाराचे क्षेत्र प्रामुख्याने किंवा शंभर टक्के सरकारी नोकऱ्यांपुरतेच मर्यादित आहे. अशा स्थितीत या घटकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा नोकऱ्यात त्यांचे प्रमाण अधिक असणे आवश्यक आहे. जीवनकलहाच्या रगाड्यात हे प्रमाण अधिक नव्हे, तर किमान लोकसंख्येच्या प्रमाणात तरी मिळणे आवश्यक नाही काय ? तसे ते मिळते काय ? सध्या हे प्रमाण कोणते आहे, हे कळण्यासाठी तरी काही सोय आहे काय ? नसेल तर ती निर्माण करणे हे शासनाचे कर्तव्य नव्हे काय ? हे प्रमाण राखण्यासाठी सहेतुक प्रयत्नांची गरज नाही काय ? की जनमानसांतील हा असंतोष, ही शल्ये, ही बोचणूक कायम ठेवून भावनात्मक ऐक्याला खुशाल पोखरण्याची संधि द्यावयाची ?

बढत्या, श्रेणींचे एकीकरण, श्रेणी ठरविण्याच्या कसोट्या, याबाबतीत तर इतके घोटाळे, घालमेली झाल्या आहेत की, त्या कोणालाही लांछनास्पद वाटाव्यात. पण जुन्या मुंबईच्या परंपरेत वाढलेल्या नोकरशाहीला त्याचे काय होय ! आजही चालू असलेल्या बढत्या पाहिल्या म्हणजे या बढत्यासाठी फक्त पश्चिम महाराष्ट्रातील लोकच पात्र आहेत व मराठवाडा–विदर्भ विभागातील लोक अपात्र आहेत, असेच ठरविण्यात आले आहे की काय, असा समज दृढमूल होईल, इतका उघडउघड पक्षपात चालू आहे. पश्चिम महाराष्ट्रातून नागपुरात आलेल्या खातेप्रमुखांची, उच्च अधिकाऱ्यांची यादी पहा. येथे त्या व्यक्तींना दोष देण्याचा किंवा दोषी ठरविण्याचा उद्देश नाही. पण त्यामागची यंत्रणा कशा रीतीने कार्य करते, हे मात्र जरूर पाहिले पाहिजे. विदर्भ आणि मराठवाडा या घटक विभागात पश्चिम महाराष्ट्रातून बढती मिळून आलेल्या खातेप्रमुखांची किंवा बड्या अधिकाऱ्यांची यादी आणि विदर्भ–मराठवाड्यातून बढती मिळून पश्चिम महाराष्ट्रात गेलेल्या खातेप्रमुखांची किंवा बड्या अधिकाऱ्यांची यादी यांची तुलना, त्यांचे प्रमाण अवश्य पाहण्यासारखे आहे. वर्चस्व गाजविण्याच्या राजकारणाशिवाय दुसरी कोणतीही कसोटी पहाण्यात येत नाही ! पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या अधिकाऱ्यांचा अहंगंड, हा तर सर्वांत मोठा अडथळा आहे. "संपूर्ण महाराष्ट्र आता एक झालेला

आहे, तेव्हा अशा 'संकुचित' दृष्टीने पाहून कसें चालेल ?"—असा प्रश्न कोणी विचारील. पण तशा रीतीने विचारच होऊ नये, असे वाटत असेल तर हेच प्रमाण उलटे झाले पाहिजे. समान संधीचा अर्थ न्याय्य रीतीने लावावा लागेल.

सांस्कृतिक आणि साहित्यविषयक संस्थांतही निराळे वातावरण दिसत नाही. भाषाविषयक भूमिकेत सहिष्णु वृत्तीची फार आवश्यकता आहे. भाषाशुद्धीचा, साहित्याचा, वाङ्मयाचा पश्चिम महाराष्ट्रातून विदर्भ—मराठवाड्याकडे असा प्रवाह सामान्यपणे चालू असल्यामुळे भाषाविषयक भूमिका, वाक्यरचना, शब्दप्रयोग यासंबंधी विदर्भ मराठवाडा विभागात सामान्यतः सहिष्णु वृत्ती आढळते. तशी वृत्ती पश्चिम महाराष्ट्रात आढळत नाही. तिकडे सामान्यतः टिंगल करण्याची वृत्ती अधिक प्रमाणात आढळते. या बाबतीत 'कोणतीहि मूळ भाषा ही शुद्ध स्वरूपाचीच असते' ही डॉ. कोलते यांची भूमिका मान्य करावी लागेल. नाही तर तथाकथित पुढारलेल्या विभागाला, तथाकथित मागासलेल्या विभागांची पिळवणूक करण्याच्या कार्यात भाषा हे एक साधन होऊन बसणार आहे ! क्रमिक पुस्तके तयार करताना सर्व विभागातील लेखकांना न्याय मिळाला पाहिजे व व्यापक दृष्टीने विचार करून महाराष्ट्राच्या भावनात्मक ऐक्यास पोषक ठरेल, अशा धोरणाने ती पुस्तके तयार करण्यात आली पाहिजेत. व्यापक दृष्टीच्या अभावी, महाराष्ट्र राज्य एक होऊनही सांस्कृतिक क्षेत्रात एकेक विभागाचा सवता सुभा निर्माण होण्याची भीती आहे.

विदर्भ—मराठवाडा या विभागाचे प्रश्न हे आता केवळ त्या त्या विभागापुरते प्रश्न उरले नसून आता ते महाराष्ट्राचे प्रश्न बनले आहेत. पण या वस्तुस्थितीची जाणीव सरकारला तसेच विरोधी पक्षांनाही नाही. विदर्भाचे, मराठवाड्याचे प्रश्न हे आपले प्रश्न आहेत, असे समजून विरोधी पक्षांनी ते धसास लावण्याचा प्रयत्न केला, तर भावनात्मक ऐक्याची भूमिका भक्कम बनणार आहे. पण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आघाडीवर असणारे विरोधी पक्षनेते देखील प्रत्यक्ष व्यवहारात धुळे—अमळनेर पलिकडे महाराष्ट्र आहे, असे समजत नाहीत ! सरकार, विरोधी पक्ष, इतर संस्था यांचे पश्चिम महाराष्ट्रात आपसात विळ्याभोपळ्यासारखे सूत असले तरी विदर्भाच्या किंवा मराठवाड्याच्या एखाद्या विशिष्ट प्रश्नाबाबत त्यांचे मतैक्य होते,—किंवा समान हितसंबंधामुळे म्हणा,—त्यांचे वैचारिक दृष्ट्या सहमत होते. अभावितपणे विभागीय पातळीवर समान हितसंबंधाची ही जी युती किंवा ऐक्य निर्माण होते, त्याऐवजी ती युति संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या पातळीवरून झाल्यास ती भावनात्मक ऐक्यास पोषक ठरेल. अशा प्रकारे, परस्परविरुद्ध हिताची विभागीय पातळीवर होणारी युती तुटून ती राज्यपातळीवर विकसित होणें आवश्यक आहे.

अनुक्रमणिका

विदर्भात विदर्भवादी आंदोलन होते, त्यामुळे सरकारवर थोडा वचक होता. विदर्भातील संयुक्त महाराष्ट्रवाद्यांचा स्वतंत्र विदर्भाला किंवा त्या चळवळीला प्रखर विरोध असला तरी त्यांच्या मनात तीबद्दल नरम वृत्ती होती. कारण तिची उपद्रव देण्याची शक्ती अनेक वेळा सरकारला नमावयास भाग पाडीत असल्याचे प्रत्यक्ष व्यवहारात दिसत असल्यामुळे विदर्भाच्या बाबतीत काहीही ठरविताना सरकारला विचार करावा लागत असे. स्वतंत्र विदर्भाची चळवळ आता नामशेष झाल्यामुळे राज्यकर्त्यांना मोकळे रान सापडणार आहे, असे इकडे अनेकांना वाटते. ही चळवळ फार मोठ्या प्रमाणात फोफावू नये, पण पूर्णपणे मरताही कामा नये, असे त्या चळवळीच्या विरोधकांनाहि वाटते, याचे मर्म लक्षात घ्यावे लागेल. मराठवाड्याच्या बाबतीत तर 'हाक ना बोंब' असा प्रकार होता व आहे. त्यामुळे अनेक बाबतीत मराठवाड्यावर बळजबरीने एकीकरण साधण्याचा वरवंटा फिरला आणि अद्यापही फिरत आहे !

महाराष्ट्राच्या भावनात्मक ऐक्याआड येणाऱ्या अडथळ्यांपैकी काहींची येथे थोडक्यात चर्चा किंवा काहींचा केवळ निर्देश केला आहे. आणीबाणीच्या अवस्थेत त्यांची जाणीव होत नसली तरी नित्य व्यवहारात आणि शांततेच्या काळात मनात ते सलतात, बोचतात आणि अस्वस्थ करतात. हे अडथळे दूर करण्यासाठी सहेतुक प्रयत्न झाले पाहिजेत. ते दूर करण्याबाबत कितपत प्रगती झाली आणि किती प्रगती व्हावयाची आहे, यासंबंधी मूल्यमापनही झाले पाहिजे. त्यासाठी एखादी यंत्रणा किंवा कमिशन नेमावयाला हरकत नसावी. अर्थात् ऐक्याबाबत पोटतिडिक असेल, तरच हा प्रश्न उद्‌भवतो ! डोळ्यावर कातडे ओढून घेऊन भावनात्मक ऐक्याचा प्रश्नच शिल्लक उरलेला नाही, अशी समजूत करून घेणे इष्ट नव्हे. त्यापेक्षा वस्तुस्थिती सरळ मान्य करून प्रश्न सोडविण्यातच मुत्सद्दीगिरी आहे.

अनुक्रमणिका

नाट्य आणि संगीत कार्यक्रम

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

शनिवार दि. ९ नोव्हेंबर १९६५ रात्रौ ८–३० वाजता

सौ. सुहासिनी मुळगावकर यांचा एकपात्री प्रयोग

'संगीत स्वयंवर'

तिकीट दर—रु. १०, ७, ५, ३, २ व १ रुपया

शनिवार दि. २० नोव्हेंबर १९६५ रात्रौ ९ वाजता

श्री. भीमसेन जोशी यांचे

गायन

तिकीट दर—रु. ७, ५, ३, २ व १ रुपया

दि. ६, ७ आणि ८ डिसेंबर १९६५

बहुरुपी, कलकत्ता तर्फे उत्कृष्ट बंगाली नाटके

● दशचक्र ● कांचनरंग ● पुतुलखेला

तिकीट दर—रु. १०, ७, ५, ३ व २

दि. ११ डिसेंबर ते १७ डिसेंबर १९६५

श्री. व सौ. पु. ल. देशपांडे, मुंबई प्रस्तुत करणार

राजमाता जिजाबाई आणि **असा मी असा मी**

तिकीट दर–रु. ७, ५, ३, २ व १. तिकीट दर–रु. १०, ७, ५, ३ व २

याशिवाय दोन व्याख्याने तिकीट दर–रु. ३, २, १ व ५० पैसे (प्रतिदिन)

स्थळ – धनवटे रंगमंदिर : वि. सा. संघ

मुद्रक : भा. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता,
सीतावर्डी, नागपूर १.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका